मासिक वार्तापत्र • अंक 23 • डिसेंबर 2021 • सहयोग मूल्य - रु. 5 • 16 पाने



# कामगार बिगुल

नव्या समाजवादी क्रांतीचा उद्घोषक


पी.एम. केअर्स निधी घोटाळा 5

तेलंगणा शेतकरी सशस्त्र संघर्षाची 75 वर्ष 12

आरक्षणावर अस्मितेच्या राजकारणाचा मथितार्थ 14


## तीन शेती कायदे रद्द, धनिक शेतकऱ्यांची कॉर्पोरेट भांडवलावर सरशी

### हमीभावाच्या मागणीने पुन्हा एकदा आंदोलनाचे कामगारविरोधी चरित्र उघड

### शेतकरी-कामगार एकतेचे नारे देणारे धनिक शेतकरी आता कामगारांसाठी लढणार का?

संपादक मंडळ

गेले वर्षभर चालू असलेल्या धनिक शेतकरी धार्जिण्या आंदोलनासमोर उत्तर प्रदेश आणि पंजाबातील निवडणुकांच्या दबावाखाली अखेर केंद्रातील मोदी सरकार झुकले आणि गेल्या वर्षी पारित केलेले तीन शेतकरी कायदे मागे घेतले आहेत. या आंदोलनाचे धनिक शेतकरी धार्जिणे चरित्र आम्ही सतत उघड करत आलो आहोत आणि चालू असलेल्या घडामोडींनी पुन्हा एकदा ते चरित्र सिद्ध केले आहे. मोदी सरकारची ही माघार औद्योगिक-वित्तीय कॉर्पोरेट भांडवलदार वर्ग आणि धनिक शेतकरी वर्गामधील संघर्षात धनिक शेतकरी वर्गाचा तात्पुरता विजय आहे. या विजयाला शेतकरी-कामगार वर्गाचा एकत्र विजय संबोधण्याचा, लोकशाहीचा विजय संबोधण्याचा, कुडमुड्या भांडवलदाराविरोधात विजय संबोधण्याचा प्रयत्न पुन्हा एकदा या आंदोलनाचे प्रणेते, उदारवादी आणि भांडवली पक्ष करत आहेत, परंतु कामगार वर्गाने याबद्दल कोणत्याही भ्रमात राहणे आत्मघातकी ठरेल.

#### मोदी झुकण्याचे कारण: निवडणुकांची मजबुरी

हे अगदी स्पष्ट आहे की हमीभावासाठी चाललेल्या या आंदोलनाचा देशाच्या बहुसंख्य भागात नाही, तर पंजाब, हरियाणा आणि पश्चिम उत्तरप्रदेशामध्ये जनाधार बनला होता. गेल्या महिन्यात लखीमपूर खेरी येथे भाजपचे केंद्रिय गृहराज्यमंत्री अजय मिश्र यांच्या मुलाने कारखाली चिरडून शेतकऱ्यांना मारल्याचे पडसाद देशभर उमटले होते. कामगार बिगुल मधूनही या हत्याकांडाचा निषेध करत शेतकरी आंदोलनाच्या लोकशाही अधिकाराकरिता आम्ही आवाज उठवला होता. मोदी सरकारने गेले वर्षभर या आंदोलनाचे विविध मार्गांनी दमन चालवलेच होते. अशात आंदोलन वर्षभर टिकलेले असताना तोंडावर पंजाब आणि उत्तर प्रदेशातील निवडणूका आल्यामुळे मोदी सरकारसमोर गंभीर राजकीय प्रश्न निर्माण झाला. उत्तरप्रदेशातील 2022 ची निवडणूक जिंकणे आणि त्यायोगे मोदीची फसवी छबी बनवून ठेवणे हे 2024 च्या लोकसभा निवडणूकीच्या दृष्टीने भाजपसाठी महत्वाचे आहे आणि उत्तरप्रदेशच्या निवडणूकीत भाजपच्या मतांवर शेतकरी आंदोलनाचा विपरित परिणाम होणार याचा अंदाज सर्वांनाच आलेला होता. मोदीच्या कुशीनगर आणि सुलतानपूर येथे झालेल्या कार्यक्रमांना गर्दी जमवताना भाजपच्या नाकी नऊ आले होते. यामुळेच जाट-गुर्जरांना खुश करण्यासाठी योगी सरकारने राजा भोजचा पुतळा उभा करण्यासारखे अस्मितावादी प्रयत्न पुन्हा सुरू केले आहेत. उत्तरप्रदेशात उशिरा घेतलेल्या कायदे-परतीच्या निर्णयानंतरही भाजपला निवडणुकीत फटका बसण्याची दाट शक्यता आहे. पंजाबमध्ये तर भाजपची मोठी पिछेहाट झालेली आहे आणि नुकतेच काँग्रेस सोडलेल्या अमरिंदर सिंहांचा पाठिंबा मिळाला तरी ती भरून येण्याची शक्यता फारच कमी आहे. तेव्हा सद्यकालीन राजकीय गणितांनी, निवडणुकीतील पराभवाच्या भितीने भाजपला तीन कृषी कायदे मागे घेण्यास भाग पाडले आहे हे स्पष्ट आहे.

#### लढाईत विराम, युद्ध चालूच

मोदी सरकारने पारित केलेल्या तीन कृषी कायदे औद्योगिक-वित्तीय भांडवलाच्या, कॉर्पोरेट कंपन्यांच्या

पान 6 वर

## एस.टी. कर्मचाऱ्यांचे विलिनीकरणासाठी भव्य आंदोलन: शिकवण आणि पुढील दिशा

✎ अभिजित

महाराष्ट्रातील गेल्या अनेक वर्षांमधील सर्वात व्यापक म्हणावा असा संप एस.टी. कर्मचाऱ्यांनी छेडला आहे. प्रस्थापित दलाल कामगार युनियन्सनी पळ काढलेला असताना, तसेच एस.टी. महामंडळ, राज्यसरकार आणि कोर्टाकडून दबाव टाकला जाऊनही हे आंदोलन चालूच आहे. सरकारने दाखवलेले तुटपुंज्या पगारवाढीचे गाजर सुद्धा न स्विकारता कामगारांनी अजूनही संप चालूच ठेवला आहे. कामगारांची एकमेव मागणी राज्य शासनात विलीनीकरणाची आहे. या मागणीचा अर्थ आहे या कामगारांना सरकारी कर्मचाऱ्याचा दर्जा मिळणे, आणि त्यानंतर सातव्या वेतन आयोगाच्या शर्तींनुसार वेतन लागू होणे. आज हे आंदोलन एका महत्त्वाच्या टप्प्यावर उभे असताना या आंदोलनाच्या अनुभवातून मिळालेले धडे आणि आंदोलनाच्या पुढील शक्यतांची चर्चा आवश्यक आहे.

#### एस. टी. कामगारांची दुरावस्था

एस.टी. ही महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात, दुर्गम भागात, खेडोपाडी पोहोचणारी एकमेव वाहतूक व्यवस्था आहे आणि कामगार-कष्टकरी वर्गच प्रामुख्याने एस.टी. ने प्रवास करतो. 93,000 कर्मचारी आणि 16,000 च्या वर बसेस असणारी ही देशातील सर्वाधिक मोठ्या बससेवांपैकी एक आहे. एस.टी. कर्मचारी हे त्यामुळेच, इतर सर्व कामगारांप्रमाणे, जनतेच्या सेवेत लागलेले कामगार आहेत आणि 65 लाखांवर जनतेची रोज वाहतूक करतात. असे असूनही, अनेक दशके सरकारी महामंडळाची नोकरी करूनही, हजारो कामगारांना 20-25 हजारांच्या वर वेतन मिळत नाही. बस-डेपो मध्ये वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून (जे स्वत: भरभक्कम पगार घेतात) विविध प्रकारची छळवणूक ही कामगारांच्या दैनंदिन जीवनाचा भाग आहे. यातही रोजंदारीवर भरती केलेल्या कामगारांच्या कामाची आणि वेतनाची स्थिती तर अजूनच बिकट. अशामध्ये गेले जवळपास 2 दशके लोकशाही मार्गाने कामगारांनी मागणी करूनही या कामगारांना शासकीय कर्मचाऱ्याचा दर्जा प्रत्येक सरकारने नाकारला आहे. विरोधी पक्षात असताना कामगारांच्या बाजूने बोलणाऱ्या भाजप, शिवसेना, काँग्रेस, राष्ट्रवादी सारख्या सर्वच भांडवली पक्षांनी कामगारांच्या तोंडाला पाने पुसण्याचेच काम केले आहे. 56,000 कामगारांच्या सह्यांचे निवेदन देऊनही गेल्या भाजप सरकारने विलिनीकरण करण्यास नकार दिला होता. कधीकाळी कामगारांबद्दल भावनाशील भाषणे देणाऱ्या शिवसेनेच्या नेत्यांनी आता सत्तेत आल्यावर विलिनीकरण करण्यास नकार दिला आहे. कामगारांची मान्यताप्राप्त युनियन राष्ट्रवादी काँग्रेस प्रणीत आहे आणि वर्षानुवर्षे युनियनच्या नेत्यांनी कामगारांच्या मागण्यांबद्दल सरकारसोबत सतत तडजोडी करण्याचीच भुमिका घेतली आहे. या तडजोडी करण्यात संख्येने डझनावर असलेल्या आणि या ना त्या

पान 8 वर

# कविता



भांडवली
सभ्यता-संस्कृतीचे
वारस आहेत हे
विखारी नाग.
स्त्री विरोधी प्रथा परंपरांच्या
कडेकपारीत हे लपून राहतात,
जगतात रुग्ण संस्कृतीच्या
नशिल्या खुराकावर
लोभ-नफ्याची संस्कृती आणि
आंधळी स्पर्धा
यांच्या विषाला मारक बनवते.

सामान्य लोकांचा भ्याडपणा
आणि तटस्थता
यांची हिंमत वाढवतो,
स्त्री शरिराला उपभोग्य वस्तू
बनवणारा मनोरंजन उद्योग
यांचा उन्माद वाढवतो.

नक्कीच या विखारी नागांचा
फणा चिरडावाच लागेल
पण तेवढे पुरेसे नसेल.
त्यांना प्रत्येक क्षणी जन्म देणाऱ्या
मानवद्रोही सामाजिक व्यवस्थेच्या
आणि तिच्या रुग्ण संस्कृतीच्या
विरोधात
एक दीर्घ, निर्णायक लढाई
लढावीच लागेल
प्रतिगामी रूढी-परंपरांची
पाळंमुळं खणावी लागतील
आणि सभ्यतेच्या आड लपणाऱ्या
भ्याड आणि तटस्थ लोकांच्या
डोळ्यांसमोर उभे करावे लागतील
काही ज्वलंत प्रश्नचिन्ह

कुठून पैदा होतात
बलात्कारी
खूनी, लंपट
अमानवीय
पशुवत जीव !

(स्त्री मुक्ती लीग च्या पोस्टर वरून साभार)

साथींनो
'कामगार बिगुल' आपले स्वतःचे वृत्तपत्र आहे. हे वृत्तपत्र अधिक चांगले बनवण्यासाठी आपल्या सूचनांचे आम्ही स्वागत करतो. त्याच बरोबर आपण जर देशभरातील कामगारांपर्यंत आपल्या कारखान्यातील, ऑफिस मधील परिस्थिती, मालक वर्गाकडून केली जाणारी लूट, संसदीय राजकीय पक्षांचा श्रीमंत धार्जिणेपणा, पोलिस व मालकांच्या खाजगी गुंडांकडून केले जाणारे अत्याचार, तुमच्या रहिवासी वस्त्यांमधील खराब परिस्थिती, शिक्षण, आरोग्य यांसारख्या सुविधांचा अभाव इत्यादी विषयी आपली मतं पोहचवू इच्छित असाल तर आम्हाला आपले लेख किंवा प्रतिक्रिया पाठवू शकता. आपण आम्हाला खालील पत्त्यावर पत्र पाठवू शकता किंवा फोन करून सुद्धा संपर्क साधू शकता.
• रूम नंबर 209, हिरानंदानी बिल्डिंग-7-बी, लल्लुभाई कंपाऊंड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई 400043 मो. - 9619039793, 9082861727
• अहमदनगर - 9156323976, 9657590491
• पुणे - 8669735643

## 'कामगार बिगुल'चे स्वरूप, उद्देश आणि जबाबदाऱ्या

1. 'कामगार बिगुल' व्यापक कष्टकरी जनतेमध्ये क्रांतिकारी राजकीय शिक्षक व प्रचारकाची भूमिका पार पाडेल. हे वृत्तपत्र कामगारांमध्ये क्रांतिकारी वैज्ञानिक विचारधारेचा प्रचार करेल आणि खऱ्याखुऱ्या सर्वहारा संस्कृतीचा वाहक बनेल. हे वृत्तपत्र जगभरातील क्रांत्यांचा इतिहास आणि त्यांच्यातून घ्यावयाचे शिक्षण, आपल्या देशातील वर्ग संघर्ष, कामगार चळवळीचा इतिहास आणि त्यातून घ्यावयाचे धडे यांच्याशी कामगार वर्गाला परिचित करेल. त्याच बरोबर समस्त भांडवली अफवा-दुष्प्रचारांचा भांडाफोड करेल.

2. 'कामगार बिगुल' भारतीय क्रांतीचे स्वरूप, मार्ग आणि समस्यांविषयी क्रांतिकारी कम्युनिस्टांमध्ये चालणाऱ्या विविध चर्चा नियमित रुपात छापेल आणि देश-विदेशातील राजकीय घटना आणि आर्थिक परिस्थितीचे योग्य विश्लेषण मांडून कामगार वर्गाला शिक्षित करण्याचे काम करेल.

3. 'कामगार बिगुल' स्वतः अशा चर्चा चालवेल जेणे करून कामगारांचे राजकीय शिक्षण होईल. तसेच त्यांच्यामध्ये योग्य राजकीय कार्यदिशेची समज विकसित होऊन ते क्रांतिकारी पार्टी बनवण्याच्या प्रक्रियेमध्ये सहभागी होऊ शकतील आणि त्यातून व्यवहारामध्ये योग्य कार्यदिशेच्या सत्यापनाचा आधार तयार होऊ शकेल.

4. 'कामगार बिगुल' कामगार वर्गामध्ये राजकीय प्रचार आणि शिक्षणाचे कार्य चालवत सर्वहारा क्रांतीच्या ऐतिहासिक जबाबदारीशी त्याला परिचित करेल, त्याला आर्थिक संघर्षांसोबतच त्याच्या राजकीय अधिकारांसाठी लढायला शिकवेल, चार आणे-आठ आण्याच्या किरकोळ आर्थिक लढायांमध्ये कामगारांना अडकावून टाकणाऱ्या नकली कम्युनिस्टांपासून आणि भांडवली राजकीय पक्षांचे शेपूट असलेल्या किंवा व्यक्तिवादी-अराजकतावादी ट्रेड युनियन्स पासून सावध करत त्याला हरतऱ्हेच्या अर्थवाद व सुधारवादाविरुद्ध लढायला शिकवेल, त्याच बरोबर त्यांच्यात सच्ची क्रांतिकारी चेतना निर्माण करेल. 'कामगार बिगुल' सर्वहारा वर्गाच्या फळ्यांमधून क्रांतिकारकांची भरती करण्याच्या कामात सहाय्यक बनेल.

5. 'कामगार बिगुल' हे वृत्तपत्र कामगार वर्गाचा क्रांतिकारी शिक्षक, प्रचारक आणि आवाहनकर्ता ह्या भूमिकांबरोबरच क्रांतिकारी संघटनकर्ता व आंदोलनकर्त्याची भूमिका सुद्धा पार पाडेल.



### बिगुल व्हॉट्सअॅप चॅनेल

जर तुम्ही आमच्याशी व्हाट्सअॅप वर जोडून घेऊ इच्छिता, तर या लिंक वर जाऊन आमचा व्हॉट्सअॅप चॅनेल जॉईन करावा - http://www.marathi.mazdoorbigul.net/whatsapp
चॅनेल जॉईन करण्यामध्ये काही समस्या असेल तर या नंबर वर आपले नाव आणि जिल्हा लिहून पाठवावा - 9892808704



**बुर्झ्वा वृत्तपत्रे भांडवलाच्या विशाल ढिगांच्या बळावर चालतात, कामगारांची वृत्तपत्रे स्वतः कामगारांनी गोळा केलेल्या पैशावर चालतात.**
**लेनिन**


# कामगार बिगुल

खाजगी वितरणासाठी

संपादक मंडळ : निखील एकडे, बबन ठोके

संपादकीय कार्यालय : रुम नंबर 209, हीरानंदानी बिल्डिंग - 7-बी, लल्लुभाई कम्पाउण्ड, मानखुर्द (वेस्ट), मुंबई 400043

संपर्क : 8669735643 , 9619039793

ईमेल : bigulakhbar@gmail.com

सहयोग राशी : रु. 5 (एका अंकासाठी)
वार्षिक : रु. 100 (टपाल शुल्कासह)

# विद्यार्थ्यांच्या भविष्याच्या खेळखंडोबाचा पुढचा अंक: शाळा कॉलेज उघडण्यास सरकारची जाणून बुजून दिरंगाई!

**सुरज**

मार्च 2020 मध्ये कोरोनाची पहिली लाट सुरु झाल्यानंतर केंद्रातील मोदी सरकारने आणि राज्यातील ठाकरे सरकारने अतिशय अनियोजितपणे लॉकडाऊन लावले. त्यानंतर गेले दीड वर्ष सर्वच विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची आबाळ होत आहे. व त्यातही विशेषतः कामगार कष्टकरी विद्यार्थी ह्या संकटात सर्वाधिक भरडले जात आहेत. दुसरी लाट संपून सहा महिन्यांवर उलटले असले तरी देखील अजूनही शाळा पूर्णपणे उघडल्या गेलेल्या नाहीत. मॉल, थिएटर्स, देवळे उघडली गेली असली तरी शाळा कॉलेज व लायब्ऱ्यांना अजूनही टाळेच लागलेले आहे!

मार्च 2020 पासून सरकारने सर्व शाळा बंद केल्या. सुरवातीला पंधराच दिवसांसाठी मिळालेली सुट्टी दीड वर्ष झाले तरी संपलेली नाही. शाळा बंद होण्याबरोबरच बहुतांश कामगार कष्टकऱ्यांचे काम देखील लॉकडाऊनमुळे बंद पडले आणि कोट्यवधी विद्यार्थ्यांसमोर शिक्षणाच्या अगोदर भाकरीचाच प्रश्न उभा राहिला. लॉकडाऊनच्या सुरवातीच्या काळात बस, ट्रेन इत्यादी प्रवासाची साधने देखील अनियोजितपणे सरकारने बंद केल्यामुळे मार्च-एप्रिलमध्ये कोट्यवधी कामगारांनी व त्यांच्या कुटुंबीयांनी, विद्यार्थ्यांनी हजारो किलोमीटरचा प्रवास पायी केला. ह्यात हजारो कामगारांना चालता चालता जीव सोडावा लागला आणि शेकडो विद्यार्थी अनाथ झाले. अनेक विद्यार्थ्यांचाही मृत्यू झाला. ह्या सर्व सरकारने निष्काळजीपणातून केलेल्या हत्याच आहेत.

2020-21 चे शैक्षणिक वर्ष ऑनलाईन सुरु झाले. परंतु इथेही सरकारचा तोच अनियोजितपणा व निष्काळजीपणा दिसून आला. ऑनलाईन शिक्षणासाठी लागणारे स्मार्ट फोन, इंटरनेट इत्यादी सुविधा कामगार कष्टकरी वर्गातील विद्यार्थ्यांपर्यंत पोहचलेल्या नसतानाच त्यांच्यावर ऑनलाईन शिक्षण थोपवले गेले. शाळा ऑनलाईन झाल्यानंतरही सरकारने प्रत्त्येक विद्यार्थ्यांपर्यंत आवश्यक त्या सुविधा पोहचवण्याचे कोणतेही प्रयत्न केले नाहीत. कामगार कष्टकरी वर्गातील अनेक विद्यार्थ्यांची शाळा कायमची सुटली. शिक्षण मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार देशातील 2.9 कोटी विद्यार्थी स्मार्ट फोन, कॉम्प्युटर आदी उपकरणे प्राप्त करू शकत नसल्याने शिक्षण व्यवस्थेपासूनच दूर फेकले गेले. 2018 मधील आकडेवारीनुसार ग्रामीण भागातील केवळ 11 टक्के विद्यार्थ्यांना व शहरी भागातील केवळ 40 टक्के विद्यार्थ्यांना कंप्युटरवरून इंटरनेट वापरता येत होते, तसेच केवळ 10.7 टक्के घरांमध्ये कंप्युटर वा स्मार्टफोन होता. आपला देश ऑनलाईन शिक्षण घेण्यासाठी तयार नव्हता हे स्पष्ट आहे.

ऑनलाईन शिक्षणाचे कामगार कष्टकरी वर्गावर झालेले परिणाम अतिशय भयानक आहेत. वर म्हटल्याप्रमाणे कोट्यवधी विद्यार्थ्यांना शिक्षण सोडून द्यावे लागले आहे. परंतु त्या सोबतच घरातील सर्वांचे काम थांबल्याने ह्यातील अनेकांना शाळा सोडून मजुरी करावी लागत आहे. 2020 मध्ये सर्व कारभार बंद असून देखील 58,000 बाल कामगारांना मुक्त करण्यात आले. बाल मजुरांचा वास्तव आकडा ह्या पेक्षा खूप मोठा असेल ह्यात शंका नाही. ह्यातील बहुतांश बाल कामगार बांधकामासारख्या धोकादायक क्षेत्रांमध्ये, महिना 1000 रुपये इतक्या तुटपुंज्या मजुरीवर काम करत आहेत. शाळा सुटलेल्या मुलींची अवस्था ह्याहून भयावह आहे. एका आकडेवारीनुसार लॉकडाऊनमुळे देशभरातील 2 लाख विद्यार्थिनींना बाल विवाहाला सामोरे जावे लागले. लॉकडाऊनच्या काळात शाळांमध्ये मिळणारे मध्यान्ह भोजन बंद झाल्यानं अनेक गरीब कुटुंबातील बालकांमध्ये कुपोषण




वाढलं आहे. देशभरात गेल्या वर्षीच्या तुलनेत अतिकुपोषित बालकांच्या संख्येत तब्बल 91 टक्के वाढ दिसून आली आहे. नोव्हेंबर 2020 मध्ये ही संख्या 9 लाख 27 हजार होती, ती ऑक्टोबर 2021 पर्यंत 17 लाख 76 हजार झाली आहे. लहानग्यांना देखील अन्नाच्या घासापासून मोताद ठेवणाऱ्या ह्या रक्तपिपासू, नफेखोर व्यवस्थेचे चारित्र्य लॉकडाऊनने पुन्हा एकदा नागडे केले आहे. विद्यार्थ्यांची शाळा बंद झाल्याने, एका बाजूला सुटलेले शिक्षण व दुसऱ्या बाजूला बेरोजगारी अशा कात्रीत अडकल्याने त्यांच्या मानसिकतेवर अतिशय गंभीर परिणाम झाले आहेत. कामगार कष्टकरी तरुणांमध्ये नैराश्य, व्यसनाधीनता, व गुन्हेगारी प्रचंड वाढली आहे. वैफल्यग्रस्त तरुण हे जाती धर्माच्या नावाने होणाऱ्या धर्मांध-दंगलखोर राजकारणाचे सोपे सावज अनेकदा बनतात. ग्रामीण भागातील केवळ 8 टक्के विद्यार्थ्यांनी व शहरी भागातील केवळ 24 टक्के विद्यार्थ्यांनी नियमित ऑनलाईन वर्गांना उपस्थिती लावली असल्याचे सप्टेंबर 2021 मध्ये केलेल्या एका पाहणीत दिसून आले आहे. भरीस भर म्हणजे ह्या पाहणीत 43 टक्के ग्रामीण विद्यार्थ्यांनी शाळाच नियमितपणे ऑनलाईन वर्ग घेत नसल्याने अभ्यासाला अडथळा होत असल्याचे सांगितले आहे!

ज्या विद्यार्थ्यांची शाळा सुटलेली नाही अशा विद्यार्थ्यांचेही शिक्षण लॉकडाऊनमुळे खडतर झाले आहे. अनेक कामगारांना हातातील काम गेल्यावरही केवळ आपल्या मुलांचे शिक्षण लॉकडाऊनमध्ये सुरु ठेवण्यासाठी लागणाऱ्या स्मार्ट फोन, इंटरनेट, इत्यादी सुविधा मिळवण्यासाठी कर्जबाजारी व्हावे लागले आहे. दीड वर्ष उलटून गेले असले तरीही अजूनही ऑनलाईन शाळेमध्ये गोंधळ तसेच आहेत. सुरुवातीला फी भरण्यापासून ते सॉफ्टवेअर वापरण्यापर्यंत सर्वच बाबतीत विद्यार्थ्यांचे असलेले गोंधळ अद्यापही पूर्णतः दूर झालेले नाहीत. ऑनलाईन शिकवलेले समजत नसल्याचे जवळपास सर्वच विद्यार्थी सर्रास सांगतात. नुकत्याच 'द वायर' पत्रिकेत प्रकाशित झालेल्या आकडेवारीनुसार 65% विद्यार्थ्यांची आकलन क्षमता लॉकडाऊनच्या काळात कमी झाली असल्याचे आढळून आले आहे. अनेक विद्यार्थ्यांनी ऑनलाईन शिकवले जात असलेले समजत असल्याने आत्महत्या देखील केलेली आहे! लॉकडाऊनमधील विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांकडे पुन्हा येऊ.

लॉकडाऊनचा काळ हा विद्यार्थ्यांसाठी खडतर होताच, शिक्षकांसाठी देखील तितकाच अवघड होता. शिक्षकांना देखील अनेक अडचणींना सामोरे जावे लागले आहे. अनेक शिक्षकांना ऑनलाईन लर्निंग साठी लागणाऱ्या वेगवेगळ्या सॉफ्टवेअरचे कोणतेही प्रशिक्षण शाळांकडून दिले गेलेले नाही. कोविडसंबंधी अनेक कामे - दारोदार जाऊन सर्वेक्षण करणे, कोविड बद्दल विद्यार्थ्यांचे व पालकांचे शिक्षण करण्यासाठी वेगळे तास घेणे, इत्यादी कामे देखील शिक्षकांनाच करावी लागली आहेत. ऑनलाईन शिकवताना लैंगिक छळ झाल्याची तक्रार देखील अनेक शिक्षिकांनी दाखल केली आहे. शाळा ऑनलाईन झाल्याने शिक्षकांच्या कामाचे मोठ्या प्रमाणात अनौपचारिकीकरण झाले आहे. उत्तर प्रदेशमध्ये पंचायतीच्या निवडणूका घेतल्याने 1621 शिक्षकांचा निवडणुकीच्या कामांमध्ये असताना कोविडची लागण होऊन मृत्यू झालेला आहे.

विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षणाच्या ह्या शोकांतिकेतून जावे लागत असताना शाळांनी मात्र आपले खिसे भरायची एकही संधी दवडली नाही. जवळ जवळ सर्वच खाजगी शाळांनी शाळा बंद असताना देखील भरमसाठ फी-वाढ केली आहे. सरकारने फी न वाढवण्याबद्दल निर्देश देऊनसुद्धा सर्वच 'शिक्षणसम्राटांनी' मोदींनी सुचवल्याप्रमाणे "आपदा में अवसरचे" म्हणजे संकटातील संधीचे सोने केले आहे. 2020 मध्ये देशभरामध्ये केवळ 22 टक्के शाळांमध्ये इंटरनेट सुविधा उपलब्ध होत्या. तरीदेखील ऑनलाईन लेक्चर घेण्याकरिता बहुतांश शाळांनी वाढीव फी घेतली आहे. फी भरू न शकलेल्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन परीक्षा देण्यापासून देखील रोखण्याचे प्रताप केले आहेत. सरकारने देखील ह्या शाळांवर 'मी मारल्यासारखे करतो तू रडल्यासारखे कर' प्रमाणे कारवाई केली आहे. एकंदर शिक्षणाच्या ह्या दुकानांनी व मॉलवाल्यांनी ह्या दीड वर्षांत गडगंज नफा कमवून ठेवला आहे.

ऑनलाईन शिक्षणाच्या बाबतीत जितका सावळा गोंधळ ह्या सरकारने केला तितकाच नव्हे, त्यापेक्षा जास्तच प्रवेश परीक्षांबाबत केला. अभियांत्रिकी, विधी इत्यादी शाखांच्या देशव्यापी प्रवेश परीक्षा, ज्या दरवर्षी लाखो विद्यार्थी देतात, त्या सुरुवातीला विद्यार्थ्यांचे मत विचारात न घेताच सरकारने कोणताही बदल न करता रेटल्या. देशभरातील विद्यार्थी संघटना विरोध करू लागल्यानंतर देशाच्या सर्वथा नालायक शिक्षणमंत्र्यांनी 'लाखो विद्यार्थ्यांनी परीक्षेची ॲडमिट कार्डे डाउनलोड केली आहेत त्यामुळे लाखो विद्यार्थ्यांना प्रवेश परीक्षा हवी आहे' असे अकलेचे तारे तोडले होते. त्यानंतर कोरोनाचा हाहाकार बघता सरकारच्या निगरगट्टपणाला होणार विरोध वाढू लागला तसे सर्व परीक्षांसाठी एक सर्वसाधारण धोरण आखण्याऐवजी प्रत्येक परीक्षेसाठी वेगवेगळे नियोजन केले गेले! सर्वच परीक्षांच्या बाबतीत तारखांचे व नियोजनाचे गोंधळ झाले. कडक लॉकडाउनच्या काळात अनेक विद्यार्थ्यांना प्रवासाच्या साधनांअभावी परीक्षा केंद्रापर्यंत पोहोचता आले नसल्याने त्यांचे वर्ष वाया गेले. परीक्षेच्या दिवशी कोविडग्रस्त असलेल्या विद्यार्थ्यांसाठी कोणतीही पर्यायी व्यवस्था कुठल्याच परीक्षेसाठी केली गेली नव्हती. राज्य व केंद्रात ताळमेळ व एकवाक्यता नावाला देखील नव्हती. केंद्रीय बोर्डाने ह्या वर्षीची बारावीची परीक्षा घेतलेली आहे, परंतु महाराष्ट्र बोर्डाने रद्द केली आहे. एमपीएससी परीक्षेबद्दल झालेला सावळा गोंधळ ताजाच आहे. एमपीएससी परीक्षा नियोजनानुसार घ्यावी कि पुढे ढकलावी ह्यावरून सरकारमधल्याच दोन विभागांची काही दिवसांपूर्वी जुंपली होती! परीक्षांबद्दलच्या ह्या सगळ्या अनागोंदीचा परिणाम विद्यार्थ्यांच्या मानसिकतेवर झालेला आहे.

केवळ परीक्षाच नाही, एकंदर सर्वच शिक्षणाचा जो अंधेरी नगरी चौपट राजा कारभार गेल्या दीड वर्षांपासून सुरु आहे, त्याने विद्यार्थ्यांना प्रचंड प्रमाणात मानसिक ताण, वैफल्य, व नैराश्य दिले आहे. विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांचे न भविष्यती वाढलेले प्रमाण हे ह्याच मानसिक ताणाचे द्योतक आहे. ऑनलाईन शिकवलेले काहीच न समजत असल्याने मागील वर्षी जुलै मध्ये कोल्हापूरच्या ऐश्वर्या पाटील ह्या विद्यार्थिनीने आत्महत्या केली होती. शिकण्याची इच्छा असून देखील परवडत नसल्यामुळे स्मार्टफोन व इंटरनेट सारख्या सुविधा न मिळाल्याने देखील हजारो तरुणांनी आत्महत्या केल्या आहेत. 'नीट' सारख्या परीक्षांच्या नियोजनामध्ये झालेल्या गोंधळामुळे देखील तामिळनाडू पासून बिहारपर्यंत देशभरातील विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. 2020 मध्ये देशभरात 14,825 विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या आहेत असे सरकारी आकडेवारी सांगते. ह्याआधी एकूण आत्महत्यांच्या 7 ते 8 टक्के आत्महत्या विद्यार्थ्यांच्या होत असत, परंतु मागील दीड वर्षात ह्या व्यवस्थेने केलेल्या शिक्षणाच्या खेळखंडोब्यामुळे मागील वर्षात हे प्रमाण 21 टक्क्यांपर्यंत वाढले आहे. भांडवलशाहीच्या ह्या मनुष्यभक्षी व्यवस्थेत तरुणांच्या भविष्यात अनागोंदी व अंधारच

पान 7 वर

# पर्यावरणाचे संकट: गुन्हा भांडवलशाहीचा, सजा कामगार-कष्टकऱ्यांना !

✎ रवी

गेल्या वर्षभरात देशात चक्रीवादळ, अतिवृष्टी, यामुळे उद्भवलेली पूर परिस्थिती, भूस्खलनाच्या घटनांमुळे अतोनात नुकसान झाले आहे. या घटनांना कधी निसर्गनिर्मित तर कधी "मानव" निर्मित म्हटले जाते. परंतु वास्तवात नफाकेंद्री असणारी भांडवली व्यवस्थाच यांच्या उद्भवाचे प्रमुख कारण आहे आणि या संकटांचा परिणाम देशातील कामगार-कष्टकऱ्यांनाच सर्वात जास्त भोगावा लागत आहे.

2021 च्या फेब्रुवारी महिन्यात उत्तराखंड राज्यात हिमालयातील हिमनदी वितळून अनेक नद्यांना आलेल्या पूराने थैमान घातले. मे महिन्यात 'तौक्ते' वादळाने गुजरातमध्ये हाहाकार माजवला. त्याच महिन्यात 'यास' वादळाच्या तडाख्याने ओडिसा आणि पश्चिम बंगाल राज्यांना हादरवून सोडले. महाराष्ट्रात जुलै महिन्याच्या अखेरीस अतिवृष्टीमुळे आलेल्या महापूराचा 13 जिल्ह्यांना फटका बसला. सप्टेंबर महिन्यात 'गुलाब' वादळामुळे आंध्र प्रदेशात भूस्खलन झाले आणि त्याच महिन्यात नुकत्याच सावरलेल्या गुजरातच्या जनतेला पूराचा सामना करावा लागला. दक्षिण भारतातील महाराष्ट्रासहित अनेक राज्यांना नोव्हेंबर महिन्यातील अतिवृष्टीमुळे आलेल्या पूराच्या साखळीने भेडसावून सोडले. या आणि यांसारख्या इतर अनेक आपत्तींमुळे हजारोंना प्राणाला मुकावे लागले आहे, लाखो लोकांचे संसार उध्वस्त झाले आणि रस्त्यावर आले. अशा घटना रोजसरशी सामान्य होत आहेत. निसर्ग चक्रातील बदलांमुळे हवामानाचा लहरीपणा वाढतच आहे आणि उद्या अशी दुर्घटना कुठेही होऊ शकते.

जगभरात अशा संकटांची दररोज भर पडत आहे. वेळोवेळी जगभरातील शास्त्रज्ञांनी सिद्ध केले आहे की या सर्व घटनांच्या मुळाशी वातावरणात होणारे बदल कारणीभूत आहेत. पृथ्वीभोवती हरितगृह (ग्रीनहाऊस) वायूंचा एखाद्या शालीप्रमाणे थर आहे ज्यामध्ये कार्बन डायऑक्साईड, मिथेन, नायट्रस ऑक्साईड आणि पाण्याच्या वाफेचा समावेश होतो. हे हरितगृह वायू सूर्यापासून मिळणारी उष्णता ऊर्जा पृथ्वीजवळ रोखून धरतात. परंतु उद्योग, परिवहन, बांधकाम, इंधन इत्यादींमधून होणाऱ्या हरितगृह वायूंच्या वाढत्या उत्सर्जनामुळे पृथ्वीवरचे तापमान दिवसेंदिवस वाढत आहे आणि त्याचमुळे वातावरणात अनपेक्षित बदल होणे, हिमनग वितळणे, ऋतूचक्र बदलणे, अतिवृष्टी आणि अवर्षण होणे वगैरे परिस्थिती अधिक प्रमाणात निर्माण होत आहेत. कॅलिफोर्नियातील पेटती जंगले असो किंवा कोकणातील कोसळत्या दरडी, जायकवाडीचे अर्धरिकामे धरण असो किंवा जर्मनीतील पूर, गंगेचे बेभान उधाण असो आणि ग्रीसमधील बेछूट होरपळ अशा जगभरातील घटनांचे एकच कारण आहे आणि ते म्हणजे वसुंधरेचे तापणे. 'इंटर-गव्हर्नमेंटल पॅनेल ऑन क्लायमेट चेंज' (आय.पी.सी.सी.) म्हणजे हवामान बदलावरील आंतर-सरकारी समितीच्या ऑगस्ट महिन्यात प्रसिद्ध झालेल्या सहाव्या अहवालानुसार पृथ्वीचे तापमान पुढील दशकभरात दीड ते दोन अंशाने वाढेल आणि त्यामुळे हिमखंड वितळतील, दुष्काळ पडतील आणि अतिवृष्टी होईल. विविध स्वरूपाची चक्रीवादळ, अतिवृष्टी, यामुळे उद्भवलेली पूर परिस्थिती, याविरोधातील परिस्थिती म्हणजे दुष्काळ यामुळे जागतिक हवामान संस्थेच्या अहवालानुसार भारताला 2020 मध्ये सुमारे 65,352 कोटी रुपयांचा फटका बसला आहे. या अहवालात असेही नमूद करावे लागले आहे की - 'भांडवलशाहीला शाश्वत ठेवता येणे शक्य नाही. आता भांडवलशाहीत खूप आर्थिक विकास होईल असे वाटत नाही. हवामान बदल हाताच्या बाहेर जाण्याआधी नफा केंद्रस्थानी ठेवून होणारे उत्पादन थांबवावे लागेल.'



भांडवली व्यवस्थेवर येणारे संकट ओळखून हरितगृह वायूंच्या वाढत्या उत्सर्जनाला रोखण्यासाठी 1997 मध्ये संयुक्त राष्ट्र परिषदेने क्योटो येथे आयोजित केलेल्या परिषदेत 192 देशांसोबत हरितगृह वायूंच्या उत्सर्जनात कपात करण्याचा करार करण्यात आला ज्यात मुख्य जबाबदारी विकसित देशांवर होती. पण 2012 पर्यंत कर्बाचे (कार्बनचे) उत्सर्जन 1990 च्या कर्ब उत्सर्जनापेक्षा 5.2% ने कमी करण्याचा संकल्प तर सोडाच, ते 40% ने अजून वाढले आहे! त्यानंतर त्याची मुदत 2020 पर्यंत करण्यात आली परंतु त्यातही यश आले नाही. विकसित देशांनी दिलेली आश्वासनं दिखाव्याचीच होती. 2015 च्या पॅरिस करारामध्ये विकसनशील देशांवर सुद्धा बंधनं लादली गेली. या करारामध्ये झालेल्या जागतिक तापमान वाढ 2 डिग्री सेल्शिअसच्या आत ठेवण्याच्या संकल्पावरही आता काळे ढग नाचू लागले आहेत. आय.पी.सी.सी. च्याच एका अहवालानुसार येत्या दशकभरातच पृथ्वीचे तापमान 2 डिग्री सेल्शिअस वाढणार आहे. विकसित देशांनी 2020 पर्यंत दरवर्षी 100 अब्ज डॉलर्स याप्रमाणे 500 अब्ज डॉलर्स विकसनशील देशांना मदत म्हणून या करारांतर्गत देण्याचे ठरले होते. परंतु त्याच्या 25% रक्कम सुद्धा अद्याप जमा झालेली नाही. नुकत्याच झालेल्या ग्लासगोव्ह परिषदेमध्ये आलेल्या विविध देशांच्या प्रतिनिधींनी पर्यावरण संवर्धनाबाबत गंभीर असल्याचा आव आणला, पण कुठल्याही प्रकारची ठोस पाऊले उचलण्याचा निर्णय या परिषदेमध्ये झाला नाही. त्यामुळे हि परिषद सुद्धा अपयशी ठरली आहे.

ज्या 2 डिग्री तापमान वाढीवर जगातील देशांच्या सरकारांनी एकाप्रकारे छुपी सहमती बनवली आहे, त्याचा अर्थ काय? पृथ्वीचे तापमान जर 2 डिग्री वाढले तर त्यामुळे पृथ्वीच्या दक्षिण आणि उत्तर ध्रुवावरील बर्फ वितळून समुद्रपातळी वाढेल आणि अनेक देश आणि समुद्रकिनारी असलेली शहरे कायमस्वरूपी पाण्याखाली जातील, चक्रीवादळे-अतिवृष्टी-अवर्षण यात कैक पटींनी वाढ होईल, हिमालयातील बर्फ वितळून गंगा-यमुनेसारख्या नद्यांचे बारमाही अस्तित्वही धोक्यात येईल, पृथ्वीच्या वातावरणात अपरिवर्तनीय असे बदल होतील. थोडक्यात कोट्यवधी लोकांचा जीव देण्याची तयारी जगातील भांडवली सरकारे करून चुकली आहेत आणि हवामान बदलाच्या परिषदा फक्त तमाशा आहेत!

या सर्व बदलांची मोठी किंमत अप्रगत देशांतील कामगार वर्गाला चुकवावी लागते हे तर नक्कीच. याचे उदाहरण द्यायचे झाले तर गेल्या काही दशकांत भारतातील नैसर्गिक आपत्तींचा अनुभव पुरेसा आहे. आफ्रिका खंडात हवामान बदलाने माजवलेला हाहाकार बघा: दोन वर्षांपूर्वी आलेल्या ईडाई चक्रीवादळातून मोझांबिक आणि झिम्बाब्वे हे देश अद्याप सावरू शकलेले नाहीत. हवामान बदलामुळे मादागास्कर देश उपासमारीच्या सावटाखाली आहे. दक्षिण आफ्रिका वगळता आफ्रिका खंडाचा जागतिक कर्बवायू उत्सर्जनात वाटा 0.55 टक्के आहे. परंतु आफ्रिकेतील देशांना हवामान बदलाचा मोठा फटका सहन करावा लागत आहे. हवामान बदलाचा सर्वात जास्त परिणाम कामगार-कष्टकरी वर्गावरच होत आहे. भारतात काय दिसून आले आहे? केरळ, तामिळनाडू, कर्नाटक, गुजरातच्या मासेमारी व्यवसायातील कामगार अतिवृष्टी आणि वादळांमुळे मोठ्या संख्येने प्रभावित झाले. दरवर्षी येणाऱ्या पूरामुळे उत्तराखंड येथील लोकसंख्या मोठ्या प्रमाणात स्थलांतरित होत आहे. महाराष्ट्रात यावर्षी आलेल्या पूरामुळे हजारो कामगार-कष्टकऱ्यांना बेरोजगारीमुळे स्थलांतर करावे लागले आहे. 'क्लायमेट ॲक्शन नेटवर्क साऊथ एशिया' च्या अहवालानुसार 2020 मध्ये भारतातील दीड कोटी लोकांना वाढती समुद्र पातळी, अतिवृष्टी, कृषिक्षेत्रातील कमी उत्पादन, दुष्काळ आणि परिसंस्थांचा (इकोसिस्टीम) विनाश अशा हवामान बदलाच्या दीर्घकालीन परिणामांमुळे स्थलांतर करावे लागले आहे. जरी भारताने हरितगृह वायू उत्सर्जन कमी करण्याच्या संकल्पावर अंमल केले तरी 2050 पर्यंत किमान 4.5 कोटी लोकांना स्थलांतर करावे लागणार आहे ज्यात मुख्यत्वे कामगार-कष्टकरी जनतेचा समावेश असेल. अशा सर्व घटनांमध्ये जीवित आणि वित्त हानी होऊन कामगार-कष्टकऱ्यांचे आयुष्य उध्वस्त होत आहे. त्यामुळे पर्यावरणाचा मुद्द्याला स्वतंत्रपणे बघून चालणार नाही. कामगार वर्गाचे हित साधायचे असेल तर पर्यावरणाच्या मुद्द्याला वर्गसंघर्षासोबत जोडावेच लागेल आणि योग्य विश्लेषणावर आधारित एक देशव्यापी आणि त्यापलीकडे जाऊन जगव्यापी लढा उभा करावा लागेल. असे न केल्यास मनुष्य प्रजातीचा विनाश दूर नाही.

कोणालाही प्रश्न पडेल की हवामान बदलाच्या एवढ्या महत्वाच्या आणि मनुष्य प्रजातीच्या अस्तित्वाच्या प्रश्नावर हे सर्व देश ठोस पाऊले की उचलत नाहीत. हे समजून घेण्यासाठी यामागचे आर्थिक-राजकीय कारण जाणून घेतले पाहिजे, कारण ज्या नफाकेंद्री व्यवस्थेने हे प्रश्न निर्माण केले आहेत ती व्यवस्था स्वत:च्या नियमांना ओलांडण्यास असमर्थ आहे! भांडवली प्रसारमाध्यमांनी अशा संकटांवर 'नैसर्गिक आपत्तीचा' चढवलेला बुरखा दूर केला तर या घटना भांडवलशाहीची देणगी आहेत हे नग्न सत्य आपल्या समोर उभे असेल. कसे ते समजून घेऊयात. जगातील सर्व देशांमध्ये या ना त्या प्रकारे भांडवलदार

पान 7 वर

# पी.एम. केअर्स निधी घोटाळा : महामारीच्या काळातील एक गुन्हेगारी घोटाळा

**सुस्मित**

पंतप्रधान मोदी यांनी 28 मार्च 2020 रोजी प्राइम मिनिस्टर्स सिटीजन असिस्टंस एंड रिलीफ इन एमर्जेन्सी सिचुएशन (पी.एम. केअर्स) या नावाने नव्या निधीची घोषणा केली. कोरोना महामारी आणि इतर आणीबाणीच्या परिस्थितींना सामोरे जाण्यासाठी हा निधी बनविल्याचे सांगितले गेले पण हा नवीन निधी सुरवातीपासूनच वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. भ्रष्टाचार करण्याचे नवनवीन मार्ग मोदी सरकारने शोधून काढले आहेत आणि पी.एम. केअर्स हा निधी त्याचेच एक उदाहरण आहे.

सर्वात पहिले प्रश्न उभा राहतो की पंतप्रधान राष्ट्रीय मदतनिधी (पी .एम. एन.आर.एफ) नावाने निधी अस्तित्वात असताना एका नव्या निधीची काय गरज होती ? यामागे कारण काय असेल हे आपल्याला लेखात पुढे स्पष्ट होईल. जून 2020 मध्ये अंजली भारद्वाज यांनी माहितीच्या अधिकाराखाली पी.एम. केअर्स फंडाबद्दल सर्व कागदपत्र मागितली असता पी.एम. केअर्स निधी हा भारत सरकारच्या अंतर्गत येत नसून तो सार्वजनिक प्राधिकरण नाही त्यामुळे पी.एम. केअर्स निधी माहितीच्या अधिकाराखाली येत नाही असे उत्तर मिळाले. पी.एम. केअर्स निधीचे अध्यक्ष पंतप्रधान आहेत आणि संरक्षणमंत्री, गृहमंत्री आणि अर्थमंत्री याचे इतर सदस्य आहेत, परंतु सरकारच्या मते हा निधीच सरकारी नाही! टाइम्स ऑफ इंडिया मध्ये आलेल्या एका वृत्तानुसार निधीत मे 2020 पर्यंत 10,600 कोटी रुपये आले होते. यात खाजगी क्षेत्रातून 5565 कोटी, सार्वजनिक उपक्रमांनी व्यावसायिक सामाजिक जबाबदारी अंतर्गत 3,249 कोटी, सरकारी कर्मचाऱ्यांच्या पगारातून (सक्तीने 12 दिवसांचा पगार जमा करवून) 1,191 कोटी आणि खासदार निधीतून 413 कोटी रुपये मिळाले होते. या निधीत मुख्यतः जनतेचा पैसा असताना, या निधीचे विश्वस्त म्हणून पंतप्रधान, संरक्षणमंत्री, गृहमंत्री असताना, याचा पत्ता पंतप्रधानांचा कार्यालय असताना, याच्या इंटरनेटवरील संकेतस्थळाचे (वेबसाईटचे) डोमेन नाव .gov असताना (जे फक्त सरकारी संकेतस्थळाला मिळते) याला खाजगी निधी कसे म्हणता येईल? नवीन निधी बनविण्याचे एकच कारण समोर येते ते म्हणजे भ्रष्टाचाराचा नवीन मार्ग शोधणे. कारण 1948 पासून अस्तित्वात असलेला पंतप्रधान राष्ट्रीय मदतनिधी माहितीच्या अधिकाराच्या अखत्यारीत येतो. तोच निधी जर वापरला असता तर आलेल्या सगळ्या पैशाचा हिशोब द्यावा लागला असता. सध्या पी.एम. केअर्स निधीमध्ये किती पैसे जमा झाले आणि कुठे खर्च झाले हे समजायला मार्ग नाहीये. जे पण आकडे उपलब्ध आहेत ते वृत्तपत्रांनी सार्वजनिक माहितीच्या आधारे लावलेले अंदाज आहेत. लेखाच्या पुढील भागात पी.एम. केअर्स निधीतून पैसे कुठे गेले याचा आढावा घेऊ.

13 मे पंतप्रधान कार्यालयाकडून एक प्रसिद्धी पत्रक प्रकाशित झाले होते. यात दिल्याप्रमाणे पी.एम. केअर्स निधीमधून एकूण 3,100 कोटी रुपये काढण्यात आले यातले 2,000 कोटी रुपये 50,000 नवीन व्हेंटिलेटर खरेदीसाठी (हे व्हेंटिलेटर पी.एम. केअर्स निधीतून बनल्याचे व्हेंटिलेटर वर लिहिण्यास सांगितले गेले!), 1,000 कोटी रुपये प्रवासी कामगारांसाठी, 100 कोटी रुपये लस निर्मितीसाठी देण्यात आले. अंजली भारद्वाज यांनी विचारलेल्या माहितीत आरोग्य खात्याने सांगितले की एकूण 58,850 व्हेंटिलेटर्स बनविण्याचा ठेका 6 वेगवेगळ्या कंपन्यांना देण्यात आला आहे. यात भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेडला 30,000 व्हेंटिलेटर्स बनविण्याचा ठेका मिळाला. बाकी ठेक्यांचे वाटप हिंदुस्थान लाइफकेअर लिमिटेड या सरकारी कंपनीमार्फत करण्यात आले. यात अलाइड मेडिकलला 350, ए.एम.टी.झेड. बेसिक ला 9,500, ए.एम.टी.झेड. हाय एन्डला 4,000, ॲग्वाला 10,000 आणि ज्योती सि.एन.व्ही.ला 5,000 व्हेंटिलेटर्स बनवायचे होते. एच.एच.एल ने 5 मार्च 2020 लाच खाजगी कंपन्यांकडून व्हेंटीलेटर्ससाठी निविदा काढले होती आणि व्हेंटीलेटर्सच्या तपशिलात पुढच्या 1 महिन्यात 9 वेळा बदल केले आणि अखेरीस 2 प्रकारचे व्हेंटीलेटर्स मागवले, हाय एन्ड आणि लो एन्ड या दोन प्रकारच्या व्हेंटीलेटर्सच्या किमतीत बरीच तफावत होती. एकीकडे एलआयडी ने बनविलेल्या व्हेंटीलेटरची किंमत 86,240 तर दुसरीकडे विप्रोच्या व्हेंटिलेटरची किंमत 13.94 लक्ष होती. व्हेंटिलेटर्सच्या किमतीत इतकी तफावत का आहे हे स्पष्ट करण्यात आले नाहीये, परंतु जनतेला हे अगदी व्यवस्थित कळू शकते की किमतीतील इतकी मोठी तफावत म्हणजे भ्रष्टाचाराचा पुरावाच आहे.

यानंतर व्हेंटीलेटर्सच्या तपासणीसाठी संयुक्त तांत्रिक समिती बनवली गेली. या कमिटीने व्हेंटीलेटर्सचा ठेका मिळालेल्या कंपन्यांना तपासणीसाठी बोलावले. सरकारची कमाल अशी की या समितीचा अहवाल सुद्धा उघड करण्यात आला नाही. यानंतर 18 जून 2020 ला आरोग्य खात्याने माहितीच्या अधिकाराखाली सांगितले की संयुक्त तांत्रिक समितीने केलेल्या पडताळणीनंतर 4 कंपन्यांचे व्हेंटीलेटर्स वापरासाठी योग्य असल्याचे सांगण्यात आले. यात ए.एम.टी.झेड. आणि ज्योती सि.एन.व्ही.चे नावंच नव्हते. पण याच्या ठीक 1 महिन्यानंतर एच.ए.एल. ला व्हेंटीलेटर्स बनविण्याऱ्या कंपन्यांची नावे माहितीच्या अधिकाराखाली विचारली असता त्यात ए.एम.टी.झेड. आणि ज्योती सि.एन.व्ही. चे या दोघांचे नाव होते. संयुक्त तांत्रिक समितीने या दोन कंपन्यांना मान्यता दिली नसतानाही यांना व्हेंटीलेटर्स बनवण्याची परवानगी कशी मिळाली? सप्टेंबर 2020 पर्यंत 58,850 व्हेंटीलेटर्स मागवले असताना फक्त 29,882 व्हेंटीलेटर्सचं मिळू शकले आणि जे मिळाले ते अतिशय सुमार दर्जाचे होते. पी.एम. केअर्स फंडातून आलेले व्हेंटीलेटर्स योग्य 'टायडल व्हॉल्युम' देऊ शकत नव्हते आणि लागणारा दाब सुद्धा टिकवू शकत नव्हते अशा तक्रारी समोर येत होत्या. एका डॉक्टरने तर लिहिलेल्या पत्रात असे लिहिले आहे की डॉक्टरांचा बराचसा वेळ रुग्णांना संभाळण्याऐवजी व्हेंटीलेटर्सना सांभाळण्यात जात होता! यात लक्षात घेण्याची गोष्ट म्हणजे जोती सि.एन.व्ही. जी संयुक्त तांत्रिक समितीच्या परिक्षणात नापास झाली होती तीचे सुद्धा अनेक व्हेंटीलेटर्स बंद पडत होते. या कंपनीत सुरतचा मोठा हिरा व्यापारी विराणीचे शेअर्स होते. हे विराणी नरेंद्र मोदीच्या जवळचे मानले जातात. यामुळे हे स्पष्ट आहे की मोदी सरकारच्या जवळच्या भांडवलदारांचे हित सांभाळण्यासाठी व्हेंटीलेटर्सच्या दर्जाची पर्वा न करता व्हेंटीलेटर्स बनविण्याची परवानगी देण्यात आली.

हा घोटाळा इथेच थांबत नाही. जे व्हेंटीलेटर्स च्या बाबतीत झाले तेच ऑक्सिजन प्रकल्पांच्या बाबतीतही दिसून येते. मोदी सरकारने सुरवातीपासूनच कोरोना महामारी रोखण्यात अतिशय दिरंगाई केली आहे. पहिली लहर आल्यानंतर 7 महिन्याने ऑक्सिजन प्रकल्पांसाठीची निविदा काढण्यात आली. प्रकल्प सुरु होई पर्यंत डिसेंबर उजाडला. 18 एप्रिलला "द स्क्रोल" या ऑनलाईन पोर्टल ने तपासणी केली. यात दिसले की 14 राज्यात फक्त 11 व्हेंटीलेटर्स लावण्यात आले होते आणि त्यातले फक्त 5 व्हेंटीलेटर्स चालू होते. पी.एम. केअर्स निधीतून ऑक्सिजन प्रकल्पांसाठी 201.58 कोटी रुपये देण्यात आले. उत्तरप्रदेशला सर्वात जास्त म्हणजे 14 ऑक्सिजन प्रकल्प मिळाले होते पण 18 एप्रिल 2020 पर्यंत फक्त एकच प्रकल्प उभा राहू शकला. उत्तरप्रदेश, गुजरात मध्ये अनेक दवाखान्यात ज्या खाजगी कंपन्यांना ऑक्सिजन प्रकल्प उभा करायचा होता त्यांना 3-4 महिने सतत फोन केल्यावरही काहीच हालचाल नाही. "द हिंदू" मध्ये आलेल्या एका वृत्तानुसार एम.जी.जी. जनरल या गुजरातच्या दवाखान्यात ऑक्सिजनच्या अभावाने 5 जणांचा मृत्यू झाला. या दवाखान्यात सुद्धा पी.एम. केअर्स निधीतून एक ऑक्सिजन प्रकल्प मिळाला होता. या दवाखान्यात तो प्रकल्प उभाच राहिला नाही. हे विसरू नका की जेव्हा कोरोनाची दुसरी लहर जोरात होती तेव्हा औषधी-ऑक्सिजनच्या अभावामुळे ऑक्सिजन सिलेंडरचा भाव काळ्याबाजारात 40,000 रुपयांपर्यंत पोहोचला होता आणि अनेक कामगार-कष्टकऱ्यांची जीवनभराची कमाई या महागड्या औषधोपचारात खर्च झाली.

यावरून हे स्पष्ट आहे की पी.एम. केअर्स निधीच्या निर्मितीपासून ते त्याच्या वापरापर्यंत अत्यंत अपारदर्शकता राहिली आहे. या फंडाच्या ऑडिटसाठी सार्क आणि असोसिएट या कंपनीची नेमणूक करण्यात आली. या कंपनीचा अध्यक्ष सुनील गुप्ता आहे. याच्या वेबसाईटवर पहिले असता सुनील गुप्ता मोदी आणि संघाच्या जवळची व्यक्ती आहे. हे म्हणजे उंदराला मांजराची साक्ष! त्यामुळे पी.एम. केअर्स निधीमध्ये खूप मोठा भ्रष्टाचार झाला आहे हे स्पष्ट आहे. अनेक खाजगी कंपन्या ज्यांना व्हेंटीलेटर्स आणि ऑक्सिजन प्रकल्प उभारण्याचा काही अनुभव नसताना त्यांना ठेका देण्यात आला. पी.एम. केअर्स निधीमधून बनलेले व्हेंटीलेटर्स सुमार दर्जाचे होते आणि बऱ्याच ठिकाणी ऑक्सिजन प्रकल्प उभेच राहिले नाहीत. मग पी.एम. केअर्स निधीमध्ये 10,600 कोटी रुपयांच्या वर जमा झालेला जनतेचा पैसा गेला कुठे? हे नक्कीच नाकारता येत नाही की या फंडाचा एक हिस्सा नक्कीच भाजप आणि संघाच्या खिशात गेला आहे. आपल्या कंपूतील ठेकेदार उद्योगपतींची धन केली गेली आहे आणि अशा उद्योगपतींच्या निधीतूनच येत्या उत्तर प्रदेश आणि पंजाबच्या निवडणुकीत भाजपला निधी पुरवला जाईल आणि या भांडवलदारांच्या दलालांना भांडवलदारांची चाकरी निश्चिन्तपणे करता येईल.

मागील 2 वर्षाच्या कोरोना महामारीच्या काळात फॅसिस्ट मोदी सरकारचे जनविरोधी वर्गचरित्र अत्यंत स्पष्टपणे समोर आले आहे. कोरानाने आतापर्यंत 4.66 लाख जणांचा जीव घेतला आहे. यांना मृत्यू न म्हणता भांडवली व्यवस्थेने आणि फॅसिस्ट मोदी सरकारने केलेल्या हत्या म्हटल्या पाहिजेत. हा फक्त सरकारने दिलेला आकडा आहे. खरा आकडा याच्या 10 पट आहे. कोरोनाची लहर चालू असताना अनेकांचा मृत्यू फक्त ऑक्सिजन सिलेंडर आणि व्हेंटिलेटर न मिळाल्यामुळे झाला आहे. एकीकडे जेव्हा जनतेला श्वास घ्यायला ऑक्सिजन मिळत नव्हता तेव्हा हे गुन्हेगारी मोदी सरकार जनतेचाच पैसा वापरून उभ्या केलेल्या निधीतून भांडवलदारांचे हित सांभाळण्यामध्ये आणि भ्रष्टाचारामध्ये गुंतलेले होते.

पी.एम. केअर्स फंडाच्या घोटाळ्यांबद्दल भविष्यातही नवनवीन गोष्टी समोर येत राहतीलच. फॅसिस्ट मोदी सरकारचे हे भ्रष्ट चरित्र सामान्य जनतेसमोर उघडे करणे हे आपले कर्तव्य आहे. जोपर्यंत समाजात खाजगी मालकीवर आधारित आणि नफ्याकरिता चालणारी व्यवस्था अस्तित्वात राहिल तोपर्यंत जास्तीत जास्त नफा मिळवण्यासाठी लोकांचे जीव घेऊन असे घोटाळे कधी कायद्याला मोडून तर कधी कायद्याच्या चौकटीत होतच राहतील. तेव्हा फक्त भ्रष्टाचाराला आणि मोदी सरकारलाच नाही तर एकंदरिता नफाकेंद्री व्यवस्थेलाच आपण आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले पाहिजे.

# शेतकरी-कामगार एकतेचे नारे देणारे धनिक शेतकरी आता कामगारांसाठी लढणार का?

पान 6 वरून

## षडयंत्र हाणून पाडा

निवडणूका तोंडावर आहेत. अशामध्ये शेतकरी आंदोलनाने दिलेला राजकीय फटका, आभाळाला भिडलेली पेट्रोल-डिझेल-गॅस आणि इतर सर्व अन्नधान्यांची महागाई (ज्यामध्ये हमीभावाचा मोठा वाटा आहे!), आणि बेरोजगारी अशामध्ये फॅसिस्ट भाजपा नेहमीप्रमाणे पुन्हा एकदा जात-धर्माचे झगडे वाढवण्याचा प्रयत्न करणार. सी.ए.ए.-एन. आर.सी., गोमाता, लव्ह-जिहाद, मंदिर-मशिद यासारखे फक्त जनतेला भडकावणारे मुद्दे पुन्हा एकदा वर काढले जातील. अशामध्ये आपल्या खऱ्या वर्गीय मागण्यांना ओळखत, या वा त्या भांडवली पक्षाच्या दिखावी प्रचाराला बळी न पडता कामगार वर्गाने एकीकडे जातीय-धार्मिक दुष्प्रचार हाणून पाडला पाहिजे आणि आपला योग्य स्वतंत्र राजकीय पर्याय उभा करत स्वतंत्र आधारावर कामगारविरोधी धोरणे आणि कायद्यांना प्रतिकार चालू ठेवला पाहिजे.

# शेतकरी-कामगार एकतेचे नारे देणारे धनिक शेतकरी आता कामगारांसाठी लढणार का?

पान 1 वरून

हिताकरिता होते. यापैकी काळाबाजाराला परवानगी देणाऱ्या फक्त तिसऱ्या कायद्याने कामगार-कष्टकरी वर्गाला धोका होता, परंतु मुख्यत्वे या कायद्यांमुळे भांडवली शेतीच्या स्पर्धेत कॉर्पोरेट भांडवलाचा प्रवेश मोकळा झाला असता. या कायद्यांविरोधातील आंदोलनात तिनही कायदे रद्द करण्याची मागणी करणे ही या आंदोलनाच्या प्रणेत्या धनिक शेतकरी संघटनांची गरीब शेतकरी, कामगारांच्या संख्याबळाला गोळा करण्याकरिता राजकीय गरज होती, परंतु त्यांची मुख्य मागणी ही हमीभावाचीच होती हे आंदोलनादरम्यान वेळोवेळी दिसून आले. कायदे रद्द झाले असले तरी शेतकरी संघटनांनी हमीभावासाठीचा कायदा व्हावा म्हणून आंदोलन चालू ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. यातून स्पष्ट आहे की या आंदोलनाची मुख्य मागणी हमीभावाचीच होती. हे आंदोलन मुख्यत्वे पंजाब, हरियाणा, पश्चिम उत्तर प्रदेशापर्यंत मर्यादित होते, कारण हमीभावाचे सर्वात मोठे मुख्य लाभार्थी याच भागातून येतात. आंदोलनादरम्यानही अनेकदा हमीभावाची मागणी मान्य झाल्यास इतर मागण्या सोडून देण्याबद्दल आंदोलनाच्या काही नेत्यांनी वक्तव्ये केली होती. देशाच्या इतर भागातून आंदोलनाला समर्थन कमीच राहिले आणि अनेक शेतकरी संघटनांनी, ज्यांना धनिक शेतकरी-कॉर्पोरेट भागीदारीतून बाजाराच्या स्पर्धेत जास्त नफ्याची आशा आहे, या कायद्यांचे समर्थन केले आहे. 'शेतकरी संघटने'चे नेते अनिल घनवट यांनी नुकतीच सर्वोच्च न्यायालयाला विनंती केली आहे की न्यायालयाने तीन कायद्यांच्या अभ्यासाकरिता बनवलेल्या समितीचा अहवाल जाहीर करावा किंवा समितीला करू द्यावा; शेती कायद्यांच्या समर्थनात शेतकऱ्यांचे आंदोलन उभे करण्याचेही त्यांनी जाहीर केले आहे आणि दावा केला आहे की तिन्ही कायदे तत्वत: विरोध करणाऱ्या शेतकऱ्यांनाही मान्य होते, परंतु कायदे करण्याच्या प्रक्रियेत सल्लामसलत नसल्यामुळे ते स्विकारले गेले नाहीत. त्यांनी असेही म्हटले आहे की हमीभावाची मागणी अव्यवहार्य आहे. यातून दिसून येते की धनिक शेतकरी वर्गाच्या विविध हिश्श्यांमध्येही भांडवली शेतीव्यवस्थेच्या संचालनाबाबत मतभेद होते आणि आहेत.

हमीभाव म्हणजे बाजारात मिळू शकणाऱ्या सरासरी नफ्याच्या वर नफ्याची हमी. आंदोलनाचे नेते राकेश टिकैत यांनी तर नुकतेच पुन्हा जाहीर केले आहे की सी2 (म्हणजे उत्पादन खर्च) च्या वर 50 टक्के नफ्याची हमी देणारा हमीभाव मिळाला पाहिजे तोवर आंदोलन चालूच राहिल. हमीभावामुळे अन्नधान्याचे भाव वाढतात, महागाई वाढते आणि त्यामुळे मजुरी वर नेण्याचे दडपण तयार होते. त्यामुळेच भांडवलदार वर्गाच्या इतर हिश्श्याचा नफ्याचा दर प्रभावित होण्याची शक्यता बळावते. त्यामुळेच कॉर्पोरेट भांडवलदार वर्ग हमीभावाची व्यवस्था मोडीत काढू पहात आहे. दुसरीकडे हमीभावामुळे फक्त धनिक शेतकरी, कुलकांना फायदा होतो कारण गरीब शेतकऱ्याची बाजारापर्यंत पोहोच, स्पर्धेची क्षमता नसते आणि गरीब शेतकरी मुख्यत: अर्धकामगार असल्यामुळे त्यांच्या मजुरीतून मिळणाऱ्या उत्पन्नाचा मोठा वाटा सुद्धा हमीभावाच्या महागाईमुळे प्रभावित होतो हे आम्ही सतत मांडत आलो आहोत. तेव्हा आंदोलन हे मुख्यत्वे धनिक शेतकरी भांडवलदार वर्ग आणि कॉर्पोरेट भांडवलदार वर्ग या भांडवलदार वर्गाच्या दोन हिश्श्यांमधला संघर्ष आहे. राजकीय बलामध्ये धनिक शेतकरी भांडवलदार वर्गाचा हिस्सा सध्या जिंकलेला असला, तरी राजस्थानचे राज्यपाल कलराज मिश्र आणि भाजपचे खासदार साक्षी महाराज यांनी हे कायदे नंतर पुन्हा आणले जाऊ शकतात याचे सुतोवाच केले आहे. मोदीनीही कायदे मागे घेताना कायदे चुकीचे होते असे म्हटलेले नाही तर सरकार शेतकऱ्यांना समजावण्यात कमी पडले असे म्हटले आहे आणि तत्वत: कायद्यांचे समर्थन चालूच ठेवले आहे. तेव्हा भाजप निश्चितपणे कॉर्पोरेट भांडवलाच्या हितांच्या बाजूने उभा आहे हे स्पष्ट आहे आणि आपले हित जपण्यात सर्वात दक्ष असलेला कॉर्पोरेट भांडवलदार वर्ग गप्प बसणार नाही व भविष्यात हा संघर्ष वेगळ्या मार्गाने चालू राहिले हे सुद्धा निश्चित. कदाचित हेच कायदे टप्प्याटप्प्याने आणले जातील किंवा या कायद्यांचे सुधारित वा नव्या आवरणातील रूप टप्प्याटप्प्याने आणले जाऊ शकते आणि तोपर्यंत "समजू न शकलेल्या" धनिक शेतकरी मित्रवर्गाला स्वत:कडे वळवायला भाजपला वेळही मिळू शकतो. मोदी सरकार आणि भाजप हा सर्व भांडवलदार वर्गाच्या सामाईक हितांचे रक्षण करतानाच, निर्णायकपणे मोठ्या भांडवलदार वर्गाचे आर्थिक हित पाहणाराच पक्ष आहे आणि आर्थिक संकट तीव्र होत असताना भांडवली व्यवस्था चालू ठेवण्याकरिता अधिक उदारीकरणाचा मार्गच त्याच्या समोर आहे; परंतु आंदोलनापुढे सरकारची माघार पुन्हा एकदा लेनिनचे तत्व सिद्ध करते की आर्थिक नाही तर राजकीय शक्तीच निर्णायक असतात.

## सर्व भांडवली, दुरुस्तीवादी पक्ष धनिक शेतकऱ्यांच्या सेवेत

तीन शेती कायदे रद्द झाल्यानंतर काँग्रेस, आप, सपा सहित सीपीएम, शेकाप सारखे दुरुस्तीवादी (नावाला कम्युनिस्ट पण वास्तवात भांडवली) पक्ष सुद्धा हमीभाव मिळालाच पाहिजे या मागणीच्या समर्थनात उभे आहेत. शेतकरी-कामगार एकतेचा नारा देणारे पक्ष आणि आंदोलनात सामील असलेल्या संघटना हमीभावाच्या कामगार-कष्टकरी विरोधी मागणीच्या विरोधात पुन्हा उभे आहेत यातून त्यांचे खरे वर्गचरित्र पुन्हा एकदा उघड झाले आहे. जर हे सर्व खरोखर कामगार आणि गरीब शेतकऱ्यांचे (जो मुख्यत्वे अर्धकामगार आहे कारण त्याचे प्रमुख उत्पन्न मजुरीतून येते, शेतीतून नाही) हितरक्षक असते, तर यांनी आज मागणी केली असती की शेती कायद्यांसोबतच जोवर मोदी सरकारने पारित केलेले कामगार विरोधी कायदे परत घेतले जात नाहीत, जोवर शेतमजुरांना कामगाराचा दर्जा मिळत नाही, किमान मजुरी लागू होत नाही आणि न्यायपूर्ण कामगार कायदे लागू होत नाहीत, जोवर गरीब शेतकऱ्यांना सावकारी पाशातून सोडवून सरकारद्वारे संस्थात्मक कर्ज मिळत नाही, जोवर धनिक शेतकऱ्यांच्या नफ्यावर प्रगतीशील उत्पन्न कर लागत नाही, तोवर आंदोलन मागे घेतले जाणार नाहीत. परंतु या उलट शेती कायदे मागे घेतल्यावर हमीभावाच्या कायद्यासाठी यांनी आंदोलन चालू ठेवले आहे. आंदोलनाचे नेतृत्व हे आश्वासन द्यायला तयार आहे का, की जर हमीभाव मिळाला तर हमीभावाच्या वरच्या दराने धान्य विकणे गुन्हा मानले जावे? जर ते असे काहीच करत नाही तर हे स्पष्ट आहे की फक्त वाढीव दराने नफा आणि कृषी भांडवलदारांचे हित हेच या आंदोलनाचे आणि त्याच्या नेतृत्वस्थानी असणाऱ्या संघटनांचे ध्येय आहे आणि म्हणूनच यांचे चरित्र स्पष्टपणे कामगार विरोधी आहे.

## आंदोलनाबद्दल भ्रामक कल्पना

शेतकरी आंदोलनाचा तात्कालिक विजय झाल्यावर अनेक भ्रामक कल्पना उदारवादी पसरवत आहेत. या कल्पनांचा फोलपणा समजणे आवश्यक आहे. काँग्रेसने म्हटले आहे की अडानी-अंबानी सारख्या तीन-चार कुडमुड्या (क्रोनी) भांडवलदारांचा पराजय झाला आहे आणि शेतकरी जिंकले आहेत. सर्वप्रथम हे समजले पाहिजे की शेती कायदे हे फक्त अडानी-अंबानीच्या हितांचे नाहीत तर एकंदरीतच कॉर्पोरेट भांडवलदार वर्गाच्या हिताचे आहेत. शेतमालाला दिली जात असलेली हमीभावरूपी अतिरिक्त नफ्याची हमी महागाई वाढवते आणि मजुरी वाढवण्याचा दबाव निर्माण करते. अर्थव्यवस्थेमध्ये अगोदरच घसरत चाललेला नफ्याचा दर ही सर्व ओद्योगिक-वित्तीय भांडवलदार वर्गाची एकत्रित चिंता आहे आणि मजुरी वाढवण्याचा दबाव नफ्याच्या दराला अजूनच खाली आणू शकतो. त्यामुळे हमीभावाची व्यवस्था मोडीत काढणे ही या औद्योगिक-वित्तीय भांडवलदार वर्गाची गरज आहे. शेतमालाच्या क्षेत्रात सामील असलेल्या औद्योगिक-वित्तीय भांडवलदार वर्गाला निश्चितपणे शेती कायद्यांचा प्रत्यक्ष फायदा आहे, परंतु भांडवली राज्यसत्ता दोन-चार भांडवलदारांकरिता नाही तर एकंदरीत भांडवलदार वर्गाच्या दीर्घकालिक आणि सामाईक हितांकरिता काम करते आणि हे करत असताना भांडवलदार वर्गाच्या विविध गटांमधील मैत्रीपूर्ण अंतर्विरोधांचे निराकरण करण्याचे ती काम करत असते. तेव्हा अडानी-अंबानी करिता हे कायदे केले जात आहेत (टाटा-बिर्ला-अडानी-अंबानी असे अनेकदा बोली भाषेतही बोलले जात असले तरी) असे म्हणणे चूक आहे.

दुसरीकडे या लढ्याला लोकशाहीचा विजय म्हटले जात आहे आणि या आंदोलनाने लोकशाहीला पुन्हा स्थापित केले जात आहे असे म्हटले जात आहे. असे म्हणणारे तर फॅसिझमच्या दिवाळखोर समजदारीवर उभे आहेतच, सोबतच ते कामगार वर्गाला आणि समस्त जनतेला भ्रमित करत आहेत. पहिली गोष्ट ही की सरकार लोकशाही अधिकारांच्या जाणीवेतून नाही तर निवडणूकीतील पराजयाच्या भितीने झुकले आहे. ज्यांना निवडणुकीतील विजय-पराजय हा लोकशाही मूल्यांचा विजय-पराजय वाटतो त्यांच्यावर फक्त हसता येईल. हे आंदोलन भांडवलदार वर्गाच्या दोन हिश्श्यांमधील मैत्रीपूर्ण अंतर्विरोधाचे आंदोलन होते आणि त्यामुळेच मोदी सरकारने आंदोलकांशी सतत चर्चा चालू ठेवण्याचे प्रयत्न केले. या आंदोलनाची एन.आर.सी.-सी.ए.ए. आंदोलनाशी तुलना करा (सिंघू बॉर्डरवर अजूनही शेतकरी तंबू ठोकून आहेत जेव्हा की शाहीनबाग हटवले गेले) किंवा मारुती-सुझुकीच्या आंदोलनाशी सरकारने केलेल्या वर्तनाची तुलना करा (कामगारांना धडा मिळावा म्हणून अनेक महिने तुरुंगात सडवले गेले आणि खोट्या केसेस लावून शिक्षा दिल्या गेल्या, हे काम कोर्टाने केले जेव्हा की शेतकरी आंदोलनात तर कोर्टाने नरमाईची भुमिका घेतली) तर लगेच दिसून येईल की कामगारवर्गीय आंदोलनांचे लोकशाही अधिकार नावाची कोणतीही गोष्ट राज्यसत्ता मानत नसते. दुसरी गोष्ट ही की या आंदोलनाला व्यापक जनतेच्या लोकशाही अधिकारांशी देणेघेणे नव्हतेच. लोकशाही अधिकारांचा विजय व्हायचा असता तर शेतकरी आंदोलनातील काही घटकांनी मानवाधिकार कार्यकर्त्यांच्या लोकशाही अधिकारांच्या दमनावर भुमिका घेतल्यावर इतर संघटनांनी विरोध केला नसता!

## वर्ग संघर्ष, राज्यसत्तेचे भांडवली चरित्र समजणे महत्वाचे आहे

कामगारांच्या श्रमशक्तीतून निर्माण झालेल्या वरकडाच्या लुटीवर जगणारे सर्वच भांडवलदार वर्गात येतात. भांडवलदार वर्गाला एकाश्मी वर्ग समजण्याची चूक अनेकदा केली जाते. परंतु भांडवलदार वर्गाचे विविध गट असतात आणि त्यांच्यामध्येही आपसात वर्गसंघर्ष चालू राहतो. हा वर्गसंघर्ष कामगारांच्या मेहनतीतून पैदा झालेल्या वरकड मूल्याच्या वाटणीसाठी असतो. अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रांमध्ये असलेल्या नफ्याच्या दराची सरासरी स्थापित करण्याच्या स्पर्धेतून भांडवलदार वर्गाची जडणघडण होते, परंतु स्पर्धा कधी संपत नाही ती कधी आर्थिक संघर्षांतून तर कधी राजकीय संघर्षांतून अभिव्यक्त होत राहते. कॉर्पोरेट विरुद्ध प्रादेशिक भांडवलदार वर्ग, छोटा-मध्यम विरुद्ध मोठा भांडवलदार वर्ग, शेतकी विरुद्ध औद्योगिक भांडवलदार वर्ग, इत्यादी भांडवलदार वर्गाच्या विविध गटांमधील अंतर्विरोध चालू राहतात. भांडवली राज्यसत्तेचे काम या सर्व अंतर्विरोधांचे नियमन करत भांडवलाचे दीर्घकालिक सामाईक हित जपणे आहे. आज मक्तेदारी भांडवलशाहीच्या काळात भारतातील राज्यसत्ता निर्णायकपणे बड्या औद्योगिक-वित्तीय भांडवलाच्या हितांची प्रमुख सेवा करते परंतु संघर्ष निर्माण झाल्यास राजकीय शक्तीच्या जोरावरच निर्णय होत असतो. हे सध्याच्या आंदोलनाने आणि त्याच्या तात्कालिक विजयाने सिद्ध केले आहे.

उदाहरणादाखल सध्या समोर येत असलेले अजून एक उदाहरण घ्या. रिलायन्सने जीओ-मार्ट नावाने ॲप आणले आहे आणि किराणा दुकानदारांना अधिक स्वस्तात माल पुरवठा करणे चालू केले आहे. यामुळे विविध कंपन्यांकरिता होलसेलर्सचे काम करणाऱ्या भांडवलदारांचे धाबे दणाणले आहे कारण त्यांच्यापेक्षा पुष्कळ स्वस्त दराने रिलायन्स किराणा दुकानदारांना माल पुरवत आहे. हा सुद्धा भांडवलदार वर्गाच्या दोन गटांमधील संघर्ष आहे. अशा संघर्षांमध्ये कामगार वर्ग नेहमीच स्वत:चे हित डोळ्यासमोर ठेवूनच हस्तक्षेप करेल, किंवा करणार नाही; ना की यापैकी एका वर्गाची बाजू घेऊन; कारण की भांडवलदार वर्गाचे सर्व गट हे आपसात भांडत असले तरी कामगार वर्गाच्या विरोधात एक असतात.

**जातीय धार्मिक तणाव वाढवण्याचे**

पान 5 वर

# विद्यार्थ्यांच्या भविष्याच्या खेळखंडोबाचा पुढचा अंक

पान 3 वरून

असल्याचे चित्र दिवसागणिक अधिक स्पष्ट होत आहे.

कॉलेजचे हॉस्टेल व कॅम्पस बंद ठेवल्याने कॉलेजच्या विद्यार्थ्यांची परिस्थिती आणखीनच अवघड झालेली होती. कामगार कष्टकरी वर्गातून आलेल्या, कॉलेजमध्ये कमवत शिकणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांसमोर हॉस्टेल बंद झाल्यावर अस्तित्वाचा प्रश्न उभा राहिला. कॅम्पस बंद झाल्याने लायब्ररी व कॉलेजमधील इतर संसाधने विद्यार्थ्यांसाठी खुली नसल्याने अनेक विद्यार्थ्यांचे शिक्षण, शोधकार्य, प्रकल्प, सर्वांनाच खीळ बसली होती. ह्या आकस्मिक ताळेबंदीमुळे कामगार कष्टकरी वर्गातील अनेक उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या होतकरू तरुणांना हातातले पुस्तक सोडून अनौपचारिक कामगार व्हावे लागले आहे. कॉलेजला टाळे ठोकताना कोणत्याही कॉलेजने वा कॉलेज व्यवस्थापनाने विद्यार्थ्यांशी आणि विद्यार्थीप्रतिनिधींशी सल्लामसलत केलीच नाही. ज्या विद्यार्थी राजकारणाने आजवर अनेक देशव्यापी संघर्ष उभे केले, अनेक नेते घडवले, त्या विद्यार्थी चळवळीला पद्धतशीरपणे निर्जीव करण्याचे काम गेल्या तीस वर्षातील शिक्षण धोरण व सर्वच विद्यापीठांनी केले आहे. विद्यार्थी संघटनांचा अवकाश कमी करणे, विद्यार्थी प्रतिनिधींच्या निवडणूक न घेणे, विद्यार्थी समित्यांचे हक्क कमी करत जाणे ह्या व अशा अनेक क्लृप्त्या वापरून नवउदारवादी विद्यापीठांनी व शिक्षण धोरणांनी शिक्षणाच्या निर्णयप्रक्रियेत विद्यार्थ्यांची पूर्ण गळचेपी केली आहे. त्याचाच परिणाम म्हणून कोरोनाच्या काळात कॉलेजांनी सर्वच निर्णय अतिशय मनमानीपणे घेऊन केवळ स्वतःची सोय व स्वतःचा नफा वाढवला आहे. कॉलेज व विद्यापीठे आता स्वतंत्र, विचारी नागरिक घडवणाऱ्या संस्था राहिल्या नसून केवळ 'डिग्री लो, पैसा दो' स्वरूपाच्या बाजारपेठा बनल्या आहेत. अनेक विद्यापीठांनी तर अव्वाच्या सव्वा फी वाढ करून निलाजरेपणाचे व मुर्दाडपणाचे टोक गाठले आहे.

देशातील ज्या मूठभर विद्यापीठांमध्ये प्रगतिशील विद्यार्थी संघटनांचा आधार अजूनही टिकून आहे त्या सर्व विद्यापीठांमध्ये विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन संघर्ष केला. जेएनयू मध्ये हॉस्टेल खुले करण्यासाठी, अलाहाबाद विद्यापीठात ऑफलाईन वर्ग पुन्हा सुरु करण्यासाठी विद्यार्थ्यांनी आंदोलने व उपोषणे केली. फेब्रुवारी मध्ये जामिया व अलिगढ विद्यापीठे उघडण्यासाठी तेथील विद्यार्थ्यांनी निदर्शने केली. दिल्ली विद्यापीठाविरोधात विद्यार्थ्यांचा संघर्ष हा लेख लिहीत असताना देखील सुरुच आहे. ह्यातील अनेक निदर्शनांमध्ये फॅसिस्ट संघ-भाजपच्या विद्यार्थी आघाडीने, अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने, खोडा घालायचा प्रयत्न केला. दिल्ली विद्यापीठातील विद्यार्थ्यांच्या निदर्शनांवर अभाविपच्या गुंडांनी हल्ला देखील करायचा प्रयत्न केला असल्याचे वृत्त आहे. पटना विद्यापीठामध्ये देखील फीवाढीच्या विरोधात अनेक विद्यार्थी संघटनांनी एकत्र येऊन निदर्शने केली. ही सर्वच विद्यापीठे व त्यांचे व्यवस्थापन विद्यार्थ्यांच्या संघटित शक्तीपुढे झुकते आहे, झुकले आहे. जेएनयूच्या विद्यार्थ्यांनी अनेक दिवसांच्या लढाईनंतर हॉस्टेल खुले करायला विद्यापीठाला भाग पाडले आहे. अलाहाबाद विद्यापीठामध्ये देखील, विद्यार्थ्यांच्या उपोषणाच्या दबावापुढे झुकून, विद्यापीठाला ऑफलाईन वर्ग सुरु करावे लागले आहेत. पटण्यात देखील विद्यार्थ्यांचा विरोध असल्याने विद्यापीठाला फी कमी करावी लागली आहे. विद्यार्थी-तरुण संघटितपणे एकत्र आले तर ते कितीही मोठ्या शक्तीला झुकवू शकतात हे इतिहासात अनेकदा दिसून आलेले सत्यच पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. तसेच अभाविप सारख्या फॅसिस्ट विद्यार्थी संघटनांना विद्यार्थ्यांच्या हिताचे काहीएक सोयरसुतक नसून, त्या केवळ हिंदुत्व-फॅसिस्ट राजकारणाच्या वाहक आणि भांडवलदार वर्गाच्या हितरक्षक संघटना आहेत हे देखील पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.

मागील काही महिन्यात देशातील मोजक्या विद्यापीठांमध्ये विद्यार्थी संघटनांनी केलेला संघर्ष, व त्याला मिळालेले यश ह्यातून पुन्हा एकदा विद्यार्थी राजकारणाचे महत्त्व पुन्हा एकदा अधोरेखित केले आहे. ह्या संघर्षांमधून प्रेरणा घेऊन आज देशभरातील विद्यार्थ्यांनी पुन्हा एकत्र येण्याची गरज आहे, संघटित होण्याची गरज आहे. विद्यार्थी प्रतिनिधींची नियमित निवडणूक, निर्णय प्रक्रियेतील प्रत्येक टप्प्यावर विद्यार्थी प्रतिनिधींचा व संघटनांचा सहभाग, कॅम्पसचा ताबा पुन्हा एकदा विद्यार्थ्यांकडे घेण्यासाठी आज संघटित होऊन विद्यापीठ व्यवस्थापनाला झुकवणे गरजेचे आहे. तसेच घसरत्या शिष्यवृत्या, शिक्षणाचे वाढते भांडवलीकरण, नवे शिक्षण धोरण ह्यांसारख्या व्यापक मुद्द्यांवर देखील विद्यार्थ्यांनी संघटित विरोध उभा करणे आज अत्यंत आवश्यक बनले आहे.

लॉकडाऊनमध्ये सरकारने विद्यार्थ्यांच्या वाताहातीकडे केलेला डोळस आंधळेपणा, निर्णयप्रक्रियेतील अनागोंदी, प्रवेश परीक्षांचा सावळा गोंधळ व विद्यापीठे उघडण्यात जाणूनबुजून केलेली दिरंगाई ह्यातून सरकारचा व व्यवस्थेचा शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन स्पष्ट आहे. कामगार कष्टकरी वर्गातील विद्यार्थी इतक्या मोठ्या प्रमाणावर शिक्षणापासून वंचित राहिल्याने सरकारला तसूभर देखील फरक पडलेला नाही. कामगारांची पुढची पिढी देखील शिक्षणावाचून कामगार कष्टकरीच बनून राहिली पाहिजे, व मालक-भांडवलदारांची पोरे मात्र मालक-भांडवलदार राहिली पाहिजेत ह्याचसाठी सरकारदेखील आग्रही आहे हे स्पष्ट आहे. वास्तवात शिक्षणासारखी मूलभूत व आवश्यक गोष्ट हि प्रत्येकाचा मूलभूत अधिकारच असली पाहिजे, व प्रत्येकाला मोफत व दर्जेदार शिक्षण देणे ही सरकारची जबाबदारी असली पाहिजे. परंतु भांडवली व्यवस्था, व तिची रक्षक सरकारे, मग ते दिल्लीतील मोदींचे असो किंवा मुंबईतील ठाकरेंचे, केवळ काही मोजक्या 'शिक्षणसम्राटांच्या' व मूठभर मालक-भांडवलदारांच्या नफ्यासाठी व फायद्यासाठी काम करते हे आता सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट झाले आहे. शिक्षणाच्या ह्या बाजारीकरणाच्या विरोधात, अनागोंदीच्या विरोधात विद्यार्थ्यांना व कामगार कष्टकऱ्यांना पुन्हा एकदा संघटित व्हावे लागेल. योग्य विचारांनी एकजूट केली तर विजय निश्चित आहे हे अनेक विद्यापीठांतील उदाहरणांनी दाखवून दिले आहे. आता प्रत्येक विद्यापीठात विद्यार्थ्यांनी संघटित होऊन प्रत्येक विद्यापीठात मालकशाही-धनिकशाहीच्या विरोधात, लोकशाही मूल्यांच्या बाजूने, सर्वांना मोफत-समान-चांगल्या दर्जाच्या शिक्षणासाठी उभे राहण्याची गरज आहे.

# पर्यावरणाचे संकट: गुन्हा भांडवलशाहीचा, सजा कामगार-कष्टकऱ्यांना !

पान 4 वरून

सत्तेत आहेत. भांडवलशाही व्यवस्थाच मुळात कामगार वर्गाचे आणि निसर्गाचे शोषण करूनच टिकली आहे. तिच्या मुळाशी नफ्यासाठीची गळेकापू स्पर्धा आहे जी नफ्याच्या आणि संचयाच्या हव्यासापुढे हवामान बदलाला दुय्यम महत्व देते. अशात पर्यावरणाच्या मुद्द्याला प्राथमिकता देऊन वाढीव गुंतवणूक करून उत्पादन करणारे साहजिकच मालाच्या किमतीच्या स्पर्धेतून बाहेर फेकले जातील आणि नष्ट होतील, आणि म्हणूनच भांडवलदार वर्गाचा कोणताही हिस्सा स्वतःहून पर्यावरण रक्षणासाठी काहीच करू पहात नाही. खरेतर ज्या भांडवली व्यवस्थेत अराजक आणि अनियोजित पद्धतीने नफा केंद्रस्थानी ठेवून उत्पादन होते त्या व्यवस्थेत पर्यावरण संवर्धनाचे उपाय फक्त दाखवण्यापुरतेच केले जातात. "उपाय" म्हणून पर्यावरण पूरक तंत्रज्ञानाचा धंदा निर्माण करण्याचा मोठा पुरस्कार केला जातो. उदाहरणार्थ खाजगी गाड्यांवर निर्बंध लावून सार्वजनिक वाहतुकीवर भर न देता विजेवर चालणाऱ्या वाहनांच्या वापराला प्रोत्साहन देणे. 'ग्रीन कॅपिटॅलिझम' याच प्रकारच्या दृष्टिकोनातून जन्माला आले आहे. पर्यावरण कार्यकर्ती ग्रेटा थनबर्ग सुद्धा अशाच प्रकारच्या उपाय योजनांची मागणी करते. जगभरात चालू असलेली सर्व मोठी पर्यावरण विषयक आंदोलनं अशाच पद्धतीने प्रस्थापित व्यवस्थेत उत्तर शोधण्याचा प्रयत्न करत आहेत, कारण या आंदोलनांच्या केंद्रस्थानी मुख्यत्वे मध्यमवर्ग आहे ज्याला स्वतःच्या जीवनशैलीत काहीही बदल करायचा नाही. व्यवस्थेतच उत्तर शोधू पाहणारी हि आंदोलने त्यामुळेच सत्ताधारी वर्गासाठी धोका बनत नाहीत. उलट 'ग्रीन कॅपिटॅलिझम'च्या नावाखाली नफा कमवणारे भांडवलदार या आंदोलनाच्या समर्थनात दिसतात. याशिवाय अशी आंदोलने सुद्धा पाहायला मिळतात जी 'विकास थांबवा आणि पर्यावरण वाचवा' चा नारा देतात. मानवाने निसर्गात हस्तक्षेप करूनच विकास केला आणि करतो आहे हे तर खरे. परंतु, निसर्गात सकारात्मक हस्तक्षेप करून मनुष्य पर्यावरणाचे संवर्धन करतही विकास करू शकतो याची जाणीव त्यांना नसते, कारण ते अर्थव्यवस्थेच्या बाजाराच्या मॉडेलवर प्रश्नच उपस्थित करत नाहीत. शिवाय या आंदोलनांमध्ये एक गट असाही दिसतो की ज्याला भांडवली अर्थव्यवस्था ही समस्या वाटते परंतु त्यावर भांडवलदार वर्गापुढे आळवणी करण्याचा आणि त्यांच्या हृदयाला पाझर फोडण्याचा हास्यास्पद मार्ग ते सुचवतात!

इलॉन मस्क, जेफ बेजोस सारखे अतिबलाढ्य भांडवलदार आता मंगळावर वसाहत बसवण्याच्या योजना आखत आहे, ज्यांद्वारे पृथ्वीवरील सर्वात श्रीमंत अशा फक्त 1% लोकांना मंगळावर जाऊन राहता येईल. असे झाले नाही तर सर्व साधनांवर कब्जा असलेला मूठभर भांडवलदार वर्ग अशा संकटांपासून स्वतःचा जीव वाचवण्यासाठी कोणत्याही थराला नक्कीच जाईल. विनाशकाळासाठी भांडवलदार वर्गाने स्वतःची व्यवस्था करून ठेवली आहे, आणि पर्यावरणाच्या संकटात जीव जाणार आहे तो कामगार-कष्टकऱ्यांचाच! नफ्याला केंद्रस्थानी न ठेवता मानवतेला आधार बनवून विकास करणारी व्यवस्थाच आता या संकटातून मार्ग काढू शकते. आधीच कामगार-कष्टकरी वर्ग महागाई, बेरोजगारी, उपासमार, रोगराईशी झुंजत आहे. यासर्वांसोबतच आता त्याला आपल्या अस्तित्वाच्या लढाईत पर्यावरणाच्या मुद्द्याला सुद्धा सोबत घ्यावे लागेल आणि वर्गीय एकजूट बनवून नफाकेंद्रित वर्ग व्यवस्थेला उलथवून खाजगी मालकी संपवून अशा एका व्यवस्थेच्या निर्माणात जुंपून घ्यावे लागेल जिथे नफा नाही तर न्यायपूर्ण शाश्वत विकास केंद्रस्थानी असेल. !

# एस.टी. कर्मचाऱ्यांचे विलिनीकरणासाठी भव्य आंदोलन

पान 8 वरून

मागणी विलिनीकरणाचीच बनते. या सर्वांची मिळून संयुक्त मागणी खरेतर सर्वांसाठी रोजगाराचीच मागणी बनते. तेव्हा देशव्यापी रोजगार अधिकाराच्या चळवळीशी जोडून घेऊन आंदोलनाला धार चढवणे एस.टी. कामगारांनी केले पाहिजे.

## आंदोलनाचे भविष्य

एस.टी. कामगार आंदोलन एका शक्यतासंपन्न टप्प्यावर उभे आहे. आंदोलनाचे यश योग्य वैचारिक समजदारीची आणि कार्यदिशेची मागणी करते. राज्यभरात पसरलेले जवळपास 1 लाख कामगार ही मोठी शक्ती बनू शकते. आंदोलन विस्कळीत करण्याचे सरकारचे प्रयत्न आणि जनतेला विरोधात नेण्याचा भांडवली प्रसारमाध्यमांचा डाव हाणून पाडण्यासाठी व्यापक जनतेपर्यंत आपला मुद्दा घेऊन जाऊन आंदोलनाला जनसमर्थन मिळवणे, व्यापक कामगार वर्गीय मागण्यांशी जोडून घेत आंदोलनाला व्यापक करणे, लोकशाही मार्गाने आपले संघटन पुन्हा उभे करत सरकारशी संघर्ष चालू ठेवणे आणि स्पष्ट कामगारवर्गीय राजकीय समजदारीवर आधारित एकता मजबूत करणे ही आज आंदोलनाची गरज आहे.

# एस.टी. कर्मचाऱ्यांचे विलिनीकरणासाठी भव्य आंदोलन: शिकवण आणि पुढील दिशा

पान 1 वरुन

भांडवली पक्षाच्या दावणीला बांधलेल्या इतरही युनियन्स सामील आहेत. तेव्हा, अनेक वर्षांच्या अन्यायाची प्रतिक्रिया म्हणून कामगारांचे हे आंदोलन एका अर्थाने स्वत:स्फूर्तपणे उभे झाले आहे.

## गेल्या महिन्याभरातील घडामोडी

स्वत:ला कधी "मराठी" तर कधी "हिंदूंचे" कैवारी म्हणवणाऱ्या राज ठाकरेंकडे आंदोलक कामगार नेतृत्वाच्या आशेने गेले, परंतु कोरड्या आश्वासनांपलीकडे काही मिळाले नाही. अशात आंदोलनाचे नेतृत्व हाती घेण्यासाठी संधीसाधू भाजपचे नेते लगेच समोर आले. कामगारांपैकी भाजपचे हितचिंतक असलेल्या गटाचा पाठिंबा सुद्धा यांना होता आणि बहुसंख्य कामगारांनाही ही आशा होती की सदाभाऊ खोत आणि गोपिचंद पडळकर "न्याय" मिळवून देतील. कामगार वर्गीय राजकारणाची समज असणाऱ्या कोणासही हे समजवावे लागणार नाही की भांडवलदरांच्या हितांचे खंदे वाहक असलेल्या, खाजगीकरणाचा रथ वायूवेगाने दौडवणाऱ्या भाजप वा मनसेसारख्या पक्षांच्या नेत्यांकडून कामगार वर्गाच्या योग्य मागण्यांच्या प्रतिनिधित्वाची आशा व्यर्थ आहे. यापूर्वी राज्यात भाजपचे सरकार असताना भाजपचे माजी अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार ह्यांनी 56,000 कामगारांच्या सह्या पाहूनही विलीनीकरणास नकार दिला होता. “अपेक्षे" प्रमाणेच पडळकर-खोत यांनी बंद दरवाजांमागे सरकारसोबत केलेल्या वाटाघाटींमधून एक नाममात्र तडजोड झाली आहे. महाविकास आघाडीच्या राज्य सरकारने 10 वर्षांपर्यंत सेवेत असलेल्या कामगारांसाठी फक्त 5,000 रूपये, 10 ते 20 वर्षे सेवेत असलेल्या कामगारांकरिता फक्त 4,000 रुपये तर 20 वर्षांवर सेवेत असलेल्या कामगारांकरिता फक्त रु. 2,500 पगार वाढीची घोषणा केली आहे. या तुटपुंज्या वाढीने कोणताही विशेष फरक पडणार नाहीये. सरकारने विलिनीकरणाच्या "अभ्यासाकरिता" सरकारी अधिकाऱ्यांची समिती नेमण्याची घोषणा केली आहे. समित्यांचे काम नेहमीच प्रश्न प्रलंबित करणे किंवा गुंडाळणे राहिले आहे हे तर सर्वज्ञात आहे. पगारवाढ जाहीर झाल्यानंतरसुद्धा, हा लेख लिहिला जाईपर्यंत, बहुसंख्यांक कर्मचारी संपावर ठाम आहेत आणि हटलले नाहीत व सर्व बस डेपो बंद आहेत. यातून कामगारांचा तीव्र निर्धार तर स्पष्टपणे समोर दिसत आहे.

आंदोलकांचे दमन करण्यात सरकारने कसर सोडलेली नाही. 3 डिसेंबर रोजी परिवहनमंत्री अनिल परब यांनी कामगारांना 'मेस्मा' कायदा लागू करण्याची धमकी दिली आहे. शिवसेनेचे प्रवक्ते संजय राऊत यांनी एस.टी. कामगारांची अवस्था गिरणी कामगारांसारखी होऊ शकते ही गर्भित धमकीच दिली आहे. हे विसरता कामा नये की मुंबईतील गिरणी कामगारांना देशोधडीला लावण्यात गिरणी मालकांच्या बाजूने शिवसेनेचीच मोठी भूमिका होती! आंदोलन चालू झाल्यापासून अडीच हजारांवर कामगारांवर सरकारने कारवाई केली आहे. रोजंदारी करणाऱ्या हजारो कामगारांना तडकाफडकी कामावरून काढले गेले आहे तर नियमित कामगारांपैकी हजाराच्या वर कामगारांना निलंबित केले गेले आहे.

मुंबईतील आझाद मैदान असो वा राज्यातील इतर सर्व जवळपास 250 डेपो, प्रत्येक ठिकाणी महिनाभराच्या आर्थिक चणचणीनंतर, थंडी-पावसात, उपाशी-तापाशी राहून, कुटुंबांची आबाळ होत असतानाही, सरकारी दडपशाहीला न जुमानता; कोर्टाने दिलेल्या मनाई आदेशाला न जुमानता; कामगार निग्रहाने दटून आहेत.

## भांडवली पक्षांचे कामगार विरोधी चरित्र ओळखा! खाजगीकरण करवणारे कधीच कामगार वर्गाचे असू शकत नाहीत!

एस.टी. कामगार आंदोलनाच्या निमित्ताने अनेक पक्षांचे भांडवली चरित्र पुन्हा एकदा उघड झाले आहे. हे समजणे आवश्यक आहे की भाजप, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, मनसे, वंचित बहुजन आघाडी सारखे सर्व भांडवली पक्ष हे देशातील भांडवलदार वर्गाच्या मोठ्या किंवा छोट्या विविध गटांच्या हितांचे प्रतिनिधित्व करतात आणि त्यांच्याच निधीवर पोसले जातात. म्हणूनच ते खाजगीकरणाच्या धोरणाचे समर्थक आणि कामगार वर्गाचे विरोधक आहेत. विरोधी पक्षात असताना हे कामगारांच्या समर्थनाचे ढोंग करतात पण जेव्हा कामगार संघर्षात मागे हटत नाहीत तेव्हा या पक्षांचे खरे रूप समोर येते. हेच पक्ष सत्तेत असताना कामगारांचे दमन करण्यात अजिबात मागेपुढे बघत नाहीत. या पक्षांचे करविते धनी असलेल्या भांडवलदारांसाठी सर्वांनीच खाजगीकरणाच्या पायघड्या पसरल्या आहेत. एस.टी. मध्ये सुद्धा शिवनेरी-शिवशाही गाड्या असोत, वा रोजंदारी कर्मचाऱ्यांची मोठी भरती, अनेकविध मार्गांनी सर्वच पक्षांनी खाजगीकरण केले आहे आणि कामगारांची संघटित शक्ती कमी करवली आहे. भाजपचे मोदी सरकार 2022 ते 2025 ह्या चार वर्षात 6 लाख कोटी एवढ्या रकमेच्या प्रचंड सरकारी संपत्तीचे खाजगीकरण करणार आहे. खाजगीकरणाची धोरणे तर 1991 पासून काँग्रेसनेच लागू केली. तसे तर काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस ने सुद्धा त्यांच्या विधानसभेच्या जाहीरनाम्यात विलीनीकरणाचे आश्वासन दिले होते आणि शिवसेनेने सुद्धा प्रश्न मार्गी लावू असे आश्वासन दिले होते, पण वास्तवात काय चालू आहे ते समोर आहे. एस.टी. कामगारांचे विलिनीकरण ही थेट खाजगीकरणाच्या विरोधातील मागणी आहे आणि त्यामुळेच प्रचंड राजकीय दबाव आणि संघर्षाशिवाय भांडवली पक्षांना या मागणीकरिता वळवणे शक्यच नाही हे समजणे आवश्यक आहे.

तेव्हा सर्व भांडवली पक्ष हे भांडवलदार-मालक वर्गाचे दलाल व एकाच माळेचे मणी आहेत हे समजणे अत्यंत आवश्यक आहे. हे पक्ष चालतातच खाजगी वाहतूक उद्योगाच्या मालकांच्या पैशांवर, बिल्डर-उद्योगपती-ठेकेदारांच्या पैशांवर; या पक्षांचे नेते स्वत: उद्योगपती आहेत; याउप्पर ज्यांची विचारधाराच खुलेपणाने खाजगीकरणाची, नफ्याच्या व्यवस्थेची, भांडवलशाहीची समर्थक आहे त्यांच्याकडून कामगारांनी आशा लावणे म्हणजे फक्त स्वत:ची फसवणूक आहे.

## मूळ समस्या आहे खाजगीकरण आणि भांडवली व्यवस्था!

भांडवली आर्थिक व्यवस्था म्हणजे बाजाराची, माल खरेदी-विक्रीची अर्थव्यवस्था जिच्यामध्ये कामगाराची श्रमशक्ति सुद्धा माल बनून विक्रीस उपलब्ध होते. कामगारांच्या श्रमशक्तीच्या वापरातून श्रम निर्माण होते आणि श्रमातूनच सर्व संपत्तीचे, मालांचे उत्पादन होते. या उत्पादनाचा एक छोटा वाटा कामगारांना मजुरीच्या रूपाने देऊन भांडवलदार-मालक वर्ग मोठा वाटा नफ्याच्या रूपाने खिशात घालतो. तेव्हा भांडवलदार आणि कामगारांचे हित एक होऊच शकत नाही. अशा व्यवस्थेमध्ये कायदे आणि सरकार मिळून भांडवलदार वर्गाच्या समाईक हितांचे रक्षण करतात. अशामध्ये खरेतर सरकारी मालमत्ता सुद्धा भांडवलदार वर्गाच्या सामुहिक हितांच्या सेवेकरिताच वापरली जाते.

देश स्वतंत्र झाला तेव्हा देशातील भांडवलदार वर्गाकडे भांडवलाची क्षमता नगण्य होती, त्यामुळे नेहरूंच्या नेतृत्वाखालील काँग्रेसने जनतेच्या पैशातून "सार्वजनिक क्षेत्रात" मोठ्या गुंतवणूकीचे उद्योग उभे करण्याचे धोरण राबवले, जी देशामध्ये औद्योगिक विकासाचा पाया रचण्यासाठी भांडवलदार वर्गाचीच गरज होती. याच काळात जनतेच्या बचतीतून व कराच्या पैशातून एस. टी सारख्या अनेक उच्च गुंतवणुकीच्या सार्वजनिक सेवा आणि उद्योग उभे केले गेले. अशाप्रकारे जनतेच्या बचतीच्या पैशातून घेतलेल्या कर्जांच्या जीवावर आणि कामगारांच्या श्रमाच्या लुटीतून मोठया झालेल्या देशी भांडवलदार वर्गाला श्रमाची व नैसर्गिक साधनसंपत्तीची खुली लूट करण्याची सूट देण्यासाठी 1991 पासून खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरणाचे धोरण स्वीकारले गेले. तेव्हापासून सत्तेत आलेल्या सर्वच भांडवली पक्षांनी सार्वजनिक व्यवसाय-उद्योग-संपत्तीचे खाजगीकरण सुरू ठेवले आहे. यातून एका बाजूला सार्वजनिक क्षेत्रातील कामगार उध्वस्त होत गेले तर दुसऱ्या बाजूला देशातील इतर कामगार-कष्टकऱ्यांच्या बहुसंख्येला पोषण, शिक्षण, आरोग्य, स्वच्छता, वाहतूक ह्या सुविधांपासून वंचित केले गेले. एस.टी. कामगारांचे आंदोलन त्यामुळेच प्रस्थापित धोरणांच्या विरोधातले आंदोलन आहे.

## भांडवली प्रसारमाध्यमांचे कामगार विरोधी वास्तव पुन्हा समोर

भाजप नेतृत्वात असेपर्यंत भांडवली मीडीयाने काही काळ सकारात्मक बातम्या दिल्या; परंतु आता प्रवाशांच्या हालापेष्टांना समोर करत कामगारांना निशाणा बनवणे त्यांनी चालू केले आहे. प्रवास करणारे प्रवासी सुद्धा बहुतांशी कामगार-कष्टकरीच आहेत आणि रोजगाराची मागणी ही त्यांचीही मागणी बनते परंतु भांडवली प्रसारमाध्यमे मात्र कामगारांनाच एकमेकांच्या विरोधात उभे करत आहेत. अनेकांना याची जाणीव नसते की मोठमोठे टीव्ही चॅनेल्स आणि वर्तमानपत्रांचा "मुख्यधारेतील" मीडिया सुद्धा देशातील मोठ्या भांडवलदारांच्या ताब्यात आहे, ज्यांचे हित बाजाराची व्यवस्था टिकवणे आणि वाढवणे आहे; आणि त्यामुळेच या मीडीयाची भुमिका प्रभावीरित्या कामगार वर्गाच्या विरोधातच राहील. कामगारांनी यामुळेच आपल्या स्वत:च्या खर्चातून चालणाऱ्या प्रसारमाध्यमांना उभे करणे गरजेचे झाले आहे.

## कामगार वर्गीय राजकारणाच्या योग्य समजदारीची गरज

एस.टी. कामगारांचे आंदोलन हे स्वत:स्फूर्त असले तरी फक्त भावनेचा आवेग आंदोलन टिकवू शकत नाही तर योग्य संघटना आणि सुस्पष्ट कामगारवर्गीय राजकीय समजदारी व त्यातून निघालेली योग्य कार्यदिशाच आंदोलनाला योग्य दिशा देऊ शकते. ह्यासाठीच आज एस.टी. कामगारांनी सुध्दा आयोजनातील विस्कळीतपणा सोडून तत्काळ लोकशाही मार्गाने आपले प्रतिनिधी निवडणे आणि त्यांच्यामार्फतच सरकारशी बोलणी करण्याची भुमिका घेतली पाहिजे. दुसरे म्हणजे युनियन्सनी जरी धोका दिलेला असला, तरी संघटनेशिवाय आणि एकीशिवाय काहीच मिळवणे शक्य नाही हे समजून नव्याने कामगार वर्गीय विचारांची युनियन बनवण्याकडे पावले टाकली पाहिजेत. तिसरे म्हणजे खुद्द एस.टी. कामगारही विविध भांडवली वैचारिक प्रभावांखाली आहेत. उदाहरणार्थ एस.टी. चे उत्पन्न खूप आहे म्हणून कामगारांना जास्त वेतन पाहिजे, किंवा असे विचार. खरेतर कोणत्याही प्रकारचा खरेदी-विक्री, नफा-तोट्याच्या विचार हा भांडवली व्यवस्थेला, बाजाराला मजबूत करतो आणि म्हणूनच कामगारविरोधी असतो. अशा तर्कांनी शिक्षण, आरोग्य, सफाई आणि अशा सर्व क्षेत्रातील (जेथे फक्त पैसेवाल्यांना सेवा देऊनच भरभक्कम नफा कमावला जाऊ शकतो आणि म्हणूनच गरीब जनता या सेवांपर्यंत पोहोचूच शकत नाही) कामगारांचा अधिकार नक्कीच डावलला जाईल, इतकेच नाही तर एस.टी.च्या विविध मार्गांवरही विषम पगाराची मागणी पुढे येऊ शकते. एस.टी. "धंदा" नसून जनतेकरिताची सुविधा आहे आणि जनसेवक या नात्याने सरकारने कराच्या पैशातूनच कामगारांच्या पगाराची मागणीच योग्य ठरते.

## कामगार वर्गाच्या एकतेची गरज

महाविकास आघाडीचे मुख्य नेते शरद पवार ह्यांनी महाबळेश्वर येथील कार्यकर्त्यांच्या मेळाव्यातील म्हटले की "एसटी महामंडळाची राज्य सरकारमध्ये विलीनीकरण करण्याची कामगारांची मागणी आहे... 96 हजार कर्मचारी आहेत. एस.टी.सह आरोग्य सेविका, आशा वर्कर,... आणि इतर महामंडळं आहेत. ...एसटीच्या विलीनीकरणाचं सूत्रं स्वीकारलं तर ते सर्वांना लागू होईल." इथे हे समजले पाहिजे की सरकारी तिजोरीतून जनतेची सेवा करणाऱ्यांना चांगले पगार दिले तर भांडवलदार-बिल्डर-ट्रान्सपोर्टर्सला सरकार काय देणार? थोडक्यात, सरकारला ही भिती आहे की त्यांचे पक्ष चालवणाऱ्या भांडवलदारांचे हित कसे जपावे!

महाराष्ट्रातील इतर जवळपास 56 महामंडळे, आशा, अंगणवाडी कर्मचारी, स्वच्छता कर्मचारी अशा लाखो कामगारांची

पान 7 वर

# पॅरिस कम्युन: पहिल्या मजूर राज्याची सचित्र कथा (सातवे पुष्प)

आज भारतातच नाही, तर संपूर्ण दुनियेत कामगार भांडवली लुटखोरांच्या वेगवान होत चाललेल्या हल्ल्यांचा सामना करत आहेत, आणि कामगार आंदोलन विखुरलेपण, साचलेपणा, आणि हताशेने ग्रासलेले आहे. अशामध्ये इतिहासाची पाने उलटून कामगार वर्गाच्या गौरवशाली संघर्षांपासून शिकण्याचे आणि त्यांच्यापासून प्रेरणा घेण्याचे महत्व फार वाढते. आजपासून 150 वर्षे अगोदर, 18 मार्च 1871 ला फ्रांसची राजधानी पॅरिस मध्ये पहिल्यांदा कामगारांनी आपले शासन कायम केले. याला पॅरिस कम्युन म्हटले गेले. त्यांनी शोषकांद्वारे पसरवल्या जाणाऱ्या या विचारांना ध्वस्त केले की कामगार राज्यकारभार चालवू शकत नाहीत. पॅरिसच्या बहादुर कामगारांनी फक्त भांडवली सत्तेच्या रथालाच उलटवले नाही तर 72 दिवसांच्या शासनाच्या दरम्यान येणाऱ्या दिवसांचे एक छोटे मॉडेल जगासमोर प्रस्तुत केले आणि दाखवले की समाजवादी समाजामध्ये भेदभाव, असमानता, आणि शोषण कशाप्रकारे समाप्त केले जाईल. पुढे चालून 1917 च्या रशियन कामगार क्रांतीने या क्रांतीचा पुढचा टप्पा रचला.

कामगार वर्गाच्या या साहसी कारवाईने फक्त फ्रांसमधीलच नाही तर जगातील भांडवलदारांचे काळीज थरथरले. त्यांनी कामगारांच्या पहिल्या सत्तेला सुरुंग लावण्यासाठी जीवतोड प्रयत्न केले आणि शेवटी कामगारांच्या कम्युनला त्यांनी रक्ताच्या नद्यांमध्ये न्हाऊन काढले. पण कम्युनचे सिद्धांत अमर झाले.

पॅरिस कम्युनच्या पराजयातूनसुद्धा जगातील कामगार वर्गाने महत्वाचे धडे घेतले. पॅरिसच्या कामगारांचे बलिदान कामगार वर्गाला सतत आठवण देत राहील की भांडवलशाहीला नष्ट केल्याशिवाय त्यांना मुक्ती मिळू शकत नाही.

पॅरिस कम्युनला 150 वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने 'कामगार बिगुल' च्या मार्च 2021 अंकापासून आम्ही जगातील पहिल्या कामगार राज्याच्या सचित्र कथेची सुरुवात केली आहे. 'मजदूर बिगुल' मध्ये मार्च 2012 पासून प्रकाशित झालेल्या धारावाहिक कथेचा अनुवाद पुढील अंकांमध्ये आम्ही देत राहू.

या साखळीतील पहिल्या काही पुष्पांमध्ये आपण पॅरिस कम्युनच्या पार्श्वभूमीमध्ये जाणून घेतले की कामगारांनी कशाप्रकारे भांडवलाच्या सत्तेविरोधात लढण्याची सुरुवात केली आणि कशाप्रकारे चार्टीस्ट आंदोलन आणि 1848 च्या क्रांत्यांमधून जात कामगार वर्गाची चेतना आणि संघटितपणा वाढत गेला. आपण कामगारांच्या मुक्तीच्या वैज्ञानिक विचारधारेचा विकास आणि कामगारांच्या पहिल्या आंतरराष्ट्रीय संघटनेबद्दल (इंटरनॅशनलबद्दल) जाणले. गेल्या अंकात आपण पाहिले की कम्युनची स्थापना कशाप्रकारे झाली आणि तिच्या रक्षणाकरिता कामगार वर्गीय जनता कशाप्रकारे शौर्याने लढली. यावेळी आपण पाहूयात की कम्युनने खऱ्या लोकशाहीच्या नियमांना इतिहासात पहिल्यांदा व्यवहारात कसे लागू केले आणि हे दाखवले की "जनतेची सत्ता" खरोखर काय असते.


— संपादक मंडळ

# वीर कम्युनार्डांच्या रक्ताने लिहिलेला इतिहासाचा कठीण धडा

**1.** कम्युनने जी ऐतिहासिक पावले उचलली होते, त्यांना घेऊन ती खूप दूरवर जाऊ शकली नाही. जन्मापासूनच ती अशा शत्रूंनी घेरलेली होती जे तिला नेस्तनाबूत करण्यास टपलेले होते. "कम्युनिस्ट घोषणापत्र"तील शब्दांनुसार म्हाताऱ्या युरोपला कम्युनिझमची जे भूत 1848 मध्येच सतावत होते, त्याला पॅरिस मध्ये समक्ष उभे राहताना बघून युरोपच्या भांडवलदारांचे काळीज चरकले होते. कम्युनला चिरडण्यासाठी सर्व प्रतिक्रियावादी शक्ती एकत्र झाल्या होत्या. प्रशिया(जर्मनी)च्या सैनिकांद्वारे कब्जा करून पॅरिसला तुडवून टाकण्याचा भांडवलदारांचा पहिला प्रयत्न यशस्वी झाला नाही कारण जर्मनीचा शासक बिस्मार्क या गोष्टीसाठी तयार नव्हता. 18 मार्चला त्यांनी दुसऱ्यांदा प्रयत्न केला, ज्या मध्ये त्यांची सेना हारली आणि पूर्ण सरकार पॅरिस सोडून व्हर्सायला पळून गेले. थियेरने पॅरिससोबत तहासाठी बोलणी करण्याचे नाटक केले आणि पॅरिस विरूध्द लढाईची तयारी करण्याची करण्याची संधी साधली. परंतु त्याचे उरले-सुरले सैन्य या परिस्थितीत नव्हते की ते कम्युनचा सामना करू शकेल. कम्युनार्डांच्या शौर्याला बघून थियेरला समजून चुकले होते की पॅरिसला विरोध करून नेस्तनाबूत करणे त्याच्या सैनिकी प्रतिभेला आणि सैन्यदलाला शक्य नाही. म्हणून तो बिस्मार्कच्या भरवशावर होता



याच दरम्यान व्हर्साय येथे थियेर आणि त्याचे प्रतिक्रियावादी सरकार प्रशियन अधिकाऱ्यांच्या मदतीने पॅरिस कम्युनवर हल्ला करण्याची योजना आखत होते. परंतु थियेर धोकेबाजीची भाषा करत होता. 21 मार्चला, जेव्हा त्याची सेना तयार झालेली नव्हती, तेव्हा थियेरने राष्ट्रीय सभेत घोषणा केली, "काही झाले तरी मी पॅरिस विरूध्द आपली सेना पाठवणार नाही."



कम्युनार्ड पण आपली तयारी करत होते. रस्त्यांवर अडथळे उभे केले होते. स्त्रिया आणि पुरूषांनी मिळून ते उभे केले होते आणि त्यावर आपला मोर्चा सांभाळला होता.


**2.** कार्ल मार्क्स यांना हे स्पष्टपणे समजले होते की, पॅरिस कम्युनला चिरडून टाकण्यासाठी बिस्मार्कची जी प्रशियाई सेना पॅरिसच्या सीमेवर उभी आहे, ती एकतर थियेरला मदत करेल किंवा स्वत: पॅरिसवर आक्रमण करेल. त्यामुळे ते एकामागून एक सल्ला देत देत होते की पॅरिस कम्युनचा विजय निश्चित करण्यासाठी गरज आहे ती कामगारांच्या सेनेने पॅरिसमध्ये प्रतिक्रांतीचा प्रत्येक प्रयत्न चिरडून, न थांबता, व्हर्सायच्या दिशेने पुढे जाण्याची; ते व्हर्साय, जे थियेर सरकार सहीत पॅरिसच्या सर्व श्रीमंतांचे आश्रयगृह बनले होते. त्यांचे असे म्हणणे होते की यामुळे कम्युनची विजयी स्थिती मजबूत झाला असती आणि कामगार क्रांती पूर्ण देशात पसरली असती. नंतर हे समोर आले की थियेर जवळ एकूण 27 हजार हतोत्साहीत सेना होती, जिला पॅरिसच्या एक लाख 'नॅशनल गार्ड'ने चुटकीसरशी धूळ चारली असती.

# पॅरिस कम्युन: पहिल्या मजूर राज्याची सचित्र कथा (सातवे पुष्प)

**3.** परंतु पॅरिसचे शूर कम्युनार्ड येथेच चुकले. त्यांनी पॅरिस मध्ये कामगारांची फौलादी सत्ता कायम केली आणि भांडवलदार वर्गावर कोणतीही दयामाया दाखवली नाही, परंतु ते विसरून गेले की थियेरच्या मागे फक्त फ्रांस देशाचे नाही तर पूर्ण युरोपातील प्रतिक्रांतिकारी एकत्र येत होते. मार्क्सने कम्युनचे प्रमुख नेते फ्रांकेल आणि वाल्या यांना सुचित केले होते की पॅरिसला घेरण्यासाठी थियेर आणि प्रशिया मध्ये सौदा होऊ शकतो; त्यामुळे प्रशियाई सेनेला मागे ढकलण्यासाठी मॉंतमात्र डोंगराच्या उत्तर बाजूची किल्लेबंदी केली पाहिजे. मार्क्स या गोष्टीमुळे खूप चिंतेत होते की कम्युनचे लोक स्वत:ला फक्त बचाव करण्यापुरते मर्यादित ठेवून किमती वेळ वाया घालवत आहेत आणि व्हर्सायवाल्यांना आपली सेना मजबूत करण्यासाठी वेळ देत आहेत. त्यांनी कम्युनार्डांना लिहिले की प्रतिक्रियावादाची गुहा ध्वस्त करून टाका, फ्रेंच राष्ट्रीय बँकेचा खजिना जप्त करा आणि क्रांतिकारी पॅरिससाठी प्रांतांचे समर्थन मिळवा..




दहा हजार कामगार महिला पॅरिसच्या लढाईत आघाडीवर लढत होत्या. त्याशिवाय हजारो इतर स्त्रिया बचाव करण्याच्या इतर कामांमध्ये, लागणाऱ्या सामानाची रसद पुरवणे, घायाळ लोकांची सेवा करण्यात गुंतल्या होत्या.




कामगारांच्या पहिल्या राज्याच्या सुरक्षेसाठी पॅरिसचे सर्व कामगार जीव तोडून लढले. कम्युनच्या प्रत्येक पावलावर ठामपणे सक्रीय असलेल्या स्त्रियांनी बॅरिकेडच्या लढाईमध्ये चढाओढीने भाग घेतला. अनेकदा जेव्हा त्यांचे पुरूष सोबती शत्रूच्या हल्ल्याने हताश होत असत तेव्हा स्त्रिया पुढे येऊन त्यांची उमेद वाढवत असत.

**4.** परंतु कम्युनने व्हर्सायच्या बाजूने आपल्याला कमी धोका आहे असे गृहित धरण्याची चूक केली. त्यानी फक्त व्हर्सायवर हल्ला न करण्याची चूक केली नाही तर आपल्या बचावासाठी सुद्धा गंभीरपणे विचार केला नाही. 27 मार्च 1871 पासूनच वर्सायच्या सेनेच्या पुढच्या फळ्या आणि पॅरिसच्या चारी बाजूच्या बुरुजांवरच्या सैन्यामध्ये गोळीबार होऊ लागला होता. 2 एप्रिलला जेव्हा कम्युनच्या सेनेची एक तुकडी कूर्बेवाईच्या बाजूला जात होती तेव्हा तिच्यावर हल्ला केला गेला. थियेरच्या सेनेने ज्या सैनिकांना बंदी बनवले, त्यांना लगेच गोळ्या घालून ठार केले. पुढील दिवशी नॅशनल गार्डच्या दबावाखाली कम्युनने शेवटी तीनही बाजूने व्हर्सायवर हल्ला केला. परंतु कम्युनच्या बटालियनचा जबरदस्त उत्साह असूनही, गंभीर राजकीय आणि सैनिकी तयारी अभावी, उशिरा झालेल्या या हल्ल्यात पराजय पत्करावा लागला. या पराजयामध्ये कम्युनला अनेक जीव देऊन मोठी किंमत चुकवावी लागली. कम्युनचे दोन सक्षम बहादूर कमांडर फ्लोरेंस आणि दुवाल यांना वर्सायच्या सेनेने बंदी बनवल्यावर मारून टाकले.




आता प्रत्येक बोळ युध्दाचे मैदान आणि प्रत्येक घर एक किल्ला बनले होते. अशा भीषण हल्ल्यापुढे, ज्यामध्ये स्त्रिया आणि लहान मुलांचाही जीव घेतला गेला, थकलेले कम्युनार्ड मागे हटण्यास मजबूर होते. एका रस्त्यावर मोर्चा बांधून लढताना कम्युनार्ड.



कम्युनार्डांनी धीराने लढा दिला, परंतु हल्ला करणाऱ्या फौजांपुढे त्यांना माघार घ्यावी लागली आणि पॅरिसच्या एका छोट्या कोपऱ्यात त्यांनी शेवटचा मोर्चा बांधला.

प्रचंड तोफखान्याने सज्ज थियेरच्या सेनेला थोपवण्यासाठी मागे हटत असताना कम्युनार्डांनी खूप इमारतींना आग लावली. भांडवलदार वर्गाचे लेखक यावर खूपच आरडाओरडा करत आलेत आणि कम्युनार्डांना "असभ्य" आणि "जाळपोळ करणारा माथेफिरू जमाव" म्हणत आलेत. मार्क्सने या लोकांना कडक शब्दात उत्तर देत लिहिले होते: "जेव्हा थियेरने सहा आठवडे पॅरिसवर बाँबफेक केली होती, हे सांगत की ते केवळ त्या घरांना आग लावत होते ज्या घरात लोक होते, तेव्हा ती जाळपोळ नव्हती का? युध्दात आग पण एक हत्यार असतेच. जगातील प्रत्येक लढाईत सेना इमारतींना आग लावतच आल्यात. परंतु आपल्या मालकांविरूध्दच्या गुलामांच्या युद्धात, जी इतिहासातील एकमात्र न्यायपूर्ण लढाई आहे, याला चुकीचे म्हटले जाते. कम्युनने आगीचा वापर फक्त आपल्या बचावासाठी केला होता. त्यांनी अगोदरच इशारा दिला होती की जर त्यांना भाग पाडले तर ते पॅरिसच्या भग्नावशेषांमध्ये स्वत:ला दफन करतील पण मागे हटणार नाहीत. त्यांना माहित होते की त्यांच्या शत्रुकरिता पॅरिसच्या लोकांच्या जीवाची काहीच किंमत नाही परंतु पॅरिसमधील इमारती खूप प्रिय आहेत.




**5.** वैज्ञानिक समाजवादाच्या सिद्धांतावर संघटीत झालेल्या पक्षाचा अभाव या ऐतिहासिक घटनांमध्ये कम्युनच्या कारवायांना वाईट प्रकारे प्रभावित करत होता. इंटरनॅशनलची फ्रेंच शाखा कामगार वर्गाची राजकीय अग्रदल बनली नाही. तिच्यामध्ये मार्क्सवादी विचारधारेच्या लोकाची संख्या खूप कमी होती. फ्रेंच कामगारांची सैद्धांतिक बाजू खूप कमजोर होती. त्या वेळेपर्यंत 'कम्युनिस्ट घोषणापत्र', 'फ्रांसमध्ये वर्ग संघर्ष', 'भांडवल' अशा मार्क्सच्या प्रमुख रचना फ्रेंच भाषेत प्रकाशित झाल्या नव्हत्या. कम्युनच्या नेतृत्वामध्ये बहुतेक सर्व ब्लांकीचे आणि प्रूधोचे अनुयायी सामिल होते. ते एकतर मार्क्सवादी सिद्धांतांशी परिचित नव्हते किंवा त्याच्या विरोधात होते. सर्वसाधारण कामगारांद्वारे पुढे ढकलले गेल्यावर त्यांनी सत्ता हातात घेण्याकरिता बहुतेक गोष्टींना योग्य प्रकारे घडवले आणि पुढे येणाऱ्या कामगारवर्गीय क्रांत्यांकरिता बहुमूल्य शिक्षण दिले; पण आपल्या राजकीय चेतनाच्या कमतरतेमुळे त्यांनी खूप चुकाही केल्या. कम्युनार्डांची एक मोठी चूक ही होती की, ते शत्रूच्या शांततेच्या वाटाघाटींच्या धोकेबाजीला बळी पडले. आणि शत्रूने या मधल्या काळात युध्दाची तयारी पूर्ण केली. जसे की मार्क्सने लिहिले आहे "जेव्हा व्हर्साय आपल्या चाकूला धार लावत होते तेव्हा पॅरिस मतदानामध्ये गुंतले होते; जेव्हा व्हर्साय युध्दाची तयारी करत होते तेव्हा पॅरिस शांततेच्या वाटाघाटी करत होते". शत्रूचा पूर्णपणे खातमा न करणे, व्हर्साय वर हल्ला न करणे, आणि क्रांतीला संपूर्ण देशात न पसरवणे ही कम्युनची सर्वात मोठी चूक होती आणि ही गोष्ट खरी आहे की नेतृत्वामध्ये मार्क्सवादी विचारांच्या कमतरतेमुळे या चुका होणारच होत्या.

# पॅरिस कम्युन: पहिल्या मजूर राज्याची सचित्र कथा (सातवे पुष्प)




शहराच्या जळत्या भग्नावशेषांमधून लढणाऱ्या हजारो कम्युनार्डांना कैद केले गेले आणि हजारोंना तेथेच ठार मारण्यात आले

**6.** खूप कठीण परिस्थिती असताना आणि कामगारांच्या नव्या राज्यासमोर उभे ठाकलेली अनेक कामे करत असताना सुद्धा शत्रूसोबत लढाई करण्याची तयारी कम्युनार्ड करत होते. गुलाम-मालकांच्या विरुद्ध गुलामांच्या या लढ्यात पॅरिसची जनता सुद्धा जीव ओवाळून टाकायला तयार होती. 1871 च्या मे पर्यंत थियेरच्या सैनिकानी पॅरिसवर हल्ला चढवला होता. व्हर्सायच्या लुटखोरांच्या भाड्याच्या सैनिकांशी कम्युनार्डांनी ठामपणे लढा दिला आणि एकदा तर त्यांना मागे ढकलूनही दिले परंतु परंतु व्हर्सायच्या सेनेने पॅरिसला घेरले आणि गोळीबार करत राहिली. याच वेळी प्रशियाने फ्रांसच्या कैदी बनवलेल्या दहा हजार सैनिकांना सोडून दिले आणि थियेरची भरभक्कम मदत केली. थियेरची सेना दक्षिणेकडचे दोन किल्ले जिंकून पॅरिसच्या दारात पोहोचली होती. प्रशियाच्या सेनेने सुध्दा त्यांना पुढे जाण्यात अप्रत्यक्षपणे मदतच केली. जे बुर्झ्वा पॅरिसमध्ये शिल्लक होते त्यांनी व्हर्सायच्या सेनेपर्यंत खबर पोहचवली की कुठल्या भागात कमजोर बचाव आहे आणि अरक्षित दरवाज्यांनी व्हर्सायची फौज आत घुसली. 21 मे 1871 ला व्हर्सायची दरोडेखोर टोळी आपल्या खाटकाच्या सुऱ्यांसहीत पॅरिसमध्ये घुसली. शहराच्या सडकांवर, चौका-चौकात, आणि विशेषत: कामगार वस्त्यांमध्ये घनघोर युद्ध झाले. शेवटी 8 दिवसांच्या कमालीच्या शौर्यपूर्ण कठिण संघर्षा नंतर पॅरिसचे बहादूर कामगार योद्धे पराजित झाले.



अनेक हजार लोकांना ज्यामध्ये मुले, रुग्ण आणि वृद्धही होते, हाकलत मोकळ्या जागेत आणले गेले आणि तेथे त्यांना गोळ्या घातल्या गेल्या. शेकडो कम्युनार्डांना भिंती जवळ उभे करून गोळ्या घातल्या गेल्या.



पॅरिसचे श्रीमंत, ज्यांपैकी काही लोक आता परत आले होते, रस्त्याच्या कडेला उभे राहून हा घाणेरडा तमाशा पहात होते आणि या यशासाठी स्वत:ची पाठ थोपटत होते.



हजारोच्या संख्येने कम्युनार्डांना घेरून पेरे-लाशेज दफनभूमी आणि इतर डझनभर जागी नेऊन गोळ्यांनी छिन्नविछिन्न केले गेले. भिंतीला उभे करून धीट जमावावर जेव्हा सेना गोळीबार करत होती तेव्हा पॅरिसच्या कामगारांचा खूनी जनरल गॅलीफेट तेथे उभा राहून तमाशा बघत होता. प्रेताचे मोठ-मोठे ढीग जमा झाले होते, ज्यात ते लोक पण होते ते अजून मेलेले नव्हते.



"कम्युनार्डांच्या भिंतीचा"चा एक भाग अजूनही पॅरिसमध्ये आहे. त्यावर बनवलेले वीर कम्युनार्डांचे चेहरे भांडवली सरकारला आव्हानही आहेत आणि कम्युनच्या शहीदांचे स्मारकही आहेत. हे स्मारक कामगारांच्या पुढील पिढीला कम्युनच्या शिकवणीची आठवण करून देत राहते की पळणाऱ्या डाकूचा शेवटपर्यंत पाठलाग केला पाहिजे, पाण्यात बुडणाऱ्या उंदराना पोहून काठापर्यत येऊ देता कामा नये, शत्रूला परत त्याची ताकद मिळू देता कामा नये आणि तोपर्यंत उसंत घेता कामा नये जोपर्यंत भांडवली शत्रू कुठल्याही कोपऱ्यात जिवंत आहेत.

**7.** माथेफिरू झालेल्या व्हर्सायच्या सेनेची प्रत्येक तुकडी खाटकांचा कंपू होती आणि कम्युनप्रती सहानुभूति दाखवण्याच्या संशयावरून कोणाही व्यक्तीला लगेचच ठार मारत होती. या रक्तरंजित आठवड्यात 30,000 कामगार कम्युनचे रक्षण करताना शहीद झाले. विजयी प्रतिक्रियावादींनी रस्त्यावर जो हरण्याचा जल्लोश केला तसे इतिहासात कोणतेही उदाहरण नाही. नागरिकांना ओळीत उभे केले जात होते आणि हाताच्या घट्ट्यांवरून कामगार ओळखून त्यांना वेगळे करून गोळी मारली जात होती. पकडलेल्या व्यक्तींशिवाय चर्चमध्ये शरण आलेले लोक, आणि हॉस्पिटल मध्ये घायाळ पडलेल्या सैनिकांनाही गोळी घालून ठार मारण्यात आले. त्यांनी म्हाताऱ्या कामगारांना हे सांगून मारले की त्यांनी वेळो-वेळी बंड केली आहेत आणि ते सर्व पक्के अपराधी आहेत. स्त्री कामगारांना हे म्हणत गोळ्या मारल्या की त्या "अग्नी बाँब" आहेत आणि "त्या मेल्यानंतरच स्त्रिया वाटतात". कामगाराच्या मुलांना हे म्हणत गोळ्या घातल्या की "ते मोठे झाल्यावर बंडखोर होतील". कामगाराच्या या हत्याकांडाचे सत्र पूर्ण जून महिनाभर चालत राहीले ज्यामध्ये कमीत-कमी 20,000 लोक मारले गेले. पॅरिस प्रेतांनी भरले गेले. सैन नदी रक्ताची नदी झाली. कम्युनला रक्ताच्या थारोळ्यात बुडवले गेले. कम्युनार्डांच्या रक्ताने इतिहासात कामगारांसाठी ही कडू शिकवण लिहीली की कामगारवर्गाला क्रांतीला शेवटपर्यंत चालवावे लागेल. सत्ता ना शांततेने मिळेल ना शांततेने तिची काळजी घेता येईल.

...पुढील अंकात चालू

# तेलंगणा शेतकरी सशस्त्र संघर्षाची 75 वर्षे मिळकत आणि शिकवण (दुसरा आणि अंतिम भाग)



महान लोकचित्रकार चित्तप्रसाद यांचे वुडकट प्रिंट – तेलंगणा

✎ आनंद सिंह

गेल्या पुष्पामध्ये आपण पाहिले की कशाप्रकारे 1940 च्या दशकाच्या सुरुवातीला, हैदराबादच्या निझामाच्या सामंती राज्याचा भाग असलेल्या तेलंगणामध्ये, जहागिरदार आणि भूस्वामींद्वारे होत असलेल्या शेतकऱ्यांच्या जबरदस्त शोषण आणि अत्याचाराविरोधातील आंदोलन 1946 चा उन्हाळा येईतो सामंतांविरोधातील एका सशस्त्र विद्रोहामध्ये परिवर्तित झाले होते. निजामाच्या सेनेने आणि रझाकारांनी या विद्रोहाला चिरडण्याचे केलेले सर्व प्रयत्न निष्फळ सिद्ध झाले. 15 ऑगस्ट 1947 ला भारत ब्रिटीशांच्या वसाहतिक गुलामीतून मुक्त झाला, पण निझामाने भारतीय संघराज्यात विलीन होण्यास नकार दिला. हे लक्षात घेतले पाहिजे की स्वतंत्र भारताच्या राज्यसत्तेने हैदराबादच्या विरोधात एक वर्षापेक्षा जास्त काळ कोणतीही कारवाई केली नाही. या काळात निझामासोबत चर्चा आणि सौदेबाजी चालू राहिली. इतकेच नाही तर या काळात भारत सरकारने "स्टँडस्टील करारा" अंतर्गत ("जैसे थे करार") निझामाला हत्यारे आणि सैन्य-उपकरणे सुद्धा पुरवली ज्यांचा वापर निझामाने शेतकरी विद्रोह चिरडण्यासाठी केला. वर्षभर चाललेल्या चर्चा आणि सौदेबाजी नंतर सुद्धा पाकिस्तान धार्जिणा निझाम हैदराबादच्या भारतातील विलीनीकरणास तयार झाला नाही. दुसरीकडे ग्रामीण भागांमध्ये शेतकरी आणि कामकऱ्यांनी कम्युनिस्टांच्या नेतृत्त्वामध्ये निझामाच्या सेनेला आणि रझाकारांना मागे ढकलले होते.

भारतीय राज्यसत्तेने पुरवलेल्या हत्यारांच्या व सैन्य-उपकरणांच्या रसदीनंतरही निझामाची सेना शेतकरी विद्रोह चिरडण्यात अयशस्वी ठरली. अशा स्थितीमध्ये 13 सप्टेंबर 1948 रोजी भारतीय सेनेने हैदराबादकडे कूच केले. निझामाच्या सेनेने फक्त पाच दिवसांमध्ये आत्मसमर्पण केले. त्यानंतरही निझामाला राज्यप्रमुखाचे पद देऊन राज्याचा प्रमुख राहू दिले गेले. 18 सप्टेंबर 1948 ला हैदराबाद संस्थानाच्या प्रशासनाच्या दोऱ्या भारतीय सेनेच्या हातात आल्या. परंतु त्यानंतरही 25 जानेवारी 1950 पर्यंत सरकारचे सर्व आदेश (फर्मान) निझामाच्या नावानेच निघत राहिले. इतकेच नाही तर 26 जानेवारी 1950 रोजी अस्तित्वात आलेल्या भारतीय राज्यघटनेमध्ये निझामाला राज्यप्रमुख म्हणून मान्यता देण्याची तरतूदही जोडली गेली आणि 1956 पर्यंत निझाम राज्यप्रमुख राहिला. इतकेच नाही तर निझामाला प्रीव्ही पर्स (विशेष सरकारी थैली) सुद्धा मिळत राहिली. यातून भारताच्या उदयमान बुर्झ्वा वर्गाचे आणि त्याच्या प्रतिनिधी पक्षाचे म्हणजे काँग्रेसचे अत्यंत तडजोडवादी चरित्र दिसून येते. यातून हे सुद्धा स्पष्ट होते की हैदराबाद मध्ये भारतीय सेनेच्या सैनिकी कारवाईचे मुख्य उद्दिष्ट निझामशाही संपवणे नाही तर तेलंगणा शेतकरी विद्रोह चिरडणे होते. हे लक्षात घेतले पाहिजे की या इराद्याला लपवण्यासाठी भारत सरकारने या कारवाईला सैनिकी कारवाई ऐवजी पोलिस कारवाई म्हटले. आज तेलंगणा मध्ये वेगाने वाढणाऱ्या हिंदुत्ववादी शक्ती 18 सप्टेंबर 1848 ला 'मुक्ती दिवस' म्हणून साजरा करण्याचे अभियान चालवत आहेत. पण सत्य तर हे आहे की तेलंगणाच्या शेतकरी आणि कामकऱ्यांसाठी हा दिवस मुक्तीचे नाही तर विश्वासघाताचे प्रतीक आहे.

निजामाच्या आत्मसमर्पणानंतर जवळपास 50 हजार भारतीय सैनिकांनी शेतकरी विद्रोहाला चिरडण्यासाठी तेलंगणाच्या गावांकडे कूच केले. सैन्याने तेलंगणामध्ये मोठ्या प्रमाणात अटका, छळ, जाळपोळ, आणि निघृण हत्या घडवत निझामाच्या सेनेला आणि रझाकारांनी केलेल्या जुलमालाही मागे टाकले. मलाया देशातील (ब्रिटीश) सरकारच्या ब्रिग्ज प्लॅन (अनुवादक: कम्युनिस्ट समर्थक नागरिकांना सक्तीने दुसऱ्या जागी विस्थापित करवण्याची योजना) चे अनुकरन करत अशी गावं वसवली गेली जिथे निवासींना सैन्याच्या नियंत्रणात रहावे लागत होते. जंगलांमधील दोन हजार आदिवासी वस्त्यांना नेस्तनाबूत केले गेले आणि लोकांना यातनाशिबिरांमध्ये ठेवले गेले. छापामार गावं सोडून जवळच्या जंगलांमध्ये निघून गेले आणि तेथेही सेनेचा दबाव वाढल्यानंतर दूरवरच्या जंगली क्षेत्रांमध्ये विखुरले गेले.

## पार्टी अंतर्गत वादविवाद

निझामाच्या आत्मसर्पणानंतर आणि हैदराबादवर भारतीय सेनेचा कब्जा स्थापित झाल्यानंतर कम्युनिस्ट पक्षाच्या आंध्र युनिट मध्ये एक वाद निर्माण झाला. रवी नारायण रेड्डींच्या नेतृत्वाखालील एका गटाचे मानणे होते की तेलंगणा सशस्त्र संघर्ष निझामाच्या सत्तेच्या विरोधात होता आणि आता निझामाच्या सत्तेचे पतन झाले आहे, त्यामुळे सशस्त्र संघर्ष बंद केला पाहिजे. हा गट तुलनेने धनिक शेतकरी आणि काही छोट्या भूस्वामींच्या हितांचे प्रतिनिधित्त्व करत होता ज्यांनी निझामाच्या विरोधात चालू असलेल्या शेतकरी विद्रोहाला साथ दिली होती, परंतु निझामाच्या पतनानंतर त्यांनी संघर्षापासून फारकत घेतली होती. परंतु मध्यम आणि लहान शेतकरी आणि भूमीहीन शेतमजूर हे संघर्ष चालू ठेवण्याच्या बाजूने होते कारण ते पहात होते की सैन्य आल्यानंतर भूस्वामी गावांकडे परतू लागलेत, शेतकऱ्यांकडून जमिनी हिरावू लागलेत तसेच ग्रामराज्यांच्या आदेशांची अवहेलना करू लागले आहेत. यामुळेच आंध्र समितीने शेवटी गनिमी काव्याचा संघर्ष चालूच ठेवण्याचा निर्णय घेतला, जेव्हा हे दिसत होते की आता त्यांना अजून शक्तिशाली शत्रूचा सामना करावा लागणार आहे. तिकडे पक्षामध्ये केंद्रिय स्तरावर सुद्धा भारतातील क्रांतीच्या मार्गाला धरून वाद चालू होता. मार्च 1948 मध्ये पक्षाची दुसरी काँग्रेस झाली, जिच्यामध्ये दक्षिणपंथी पी.सी. जोशींना हटवून बी.टी. रणदिवेंना पक्षाचे महासचिव बनवले गेले होते. ह्या काँग्रेस मध्ये तेलंगणाच्या प्रतिनिधींनी जोर लावल्यानंतरच काँग्रेसच्या थीसीस मध्ये तेलंगणा संघर्षाच्या महत्त्वाचा उल्लेख करत त्याला समर्थन दिले गेले आणि संपूर्ण देशामध्ये असेच संघर्ष संघटित करण्यासाठी तसेच कामगार वर्गानेही याच्या समर्थनात आंदोलन करण्याचे आवाहन केले गेले. रणदिवेंनी "डावा" अतिरेकपंथी थीसीस दिला की लोकशाही आणि समाजवादी क्रांती एकत्र झाली पाहिजे आणि कम्युनिस्टांनी फक्त मोठ्या भांडवलदारांनाच नाही तर सर्वच भांडवलदारांना हल्ल्याचा निशाणा बनवत देशव्यापी सार्वत्रिक संप आणि सशस्त्र विद्रोहाचा मार्ग स्विकारला पाहिजे. या "डाव्या" अतिरेकपंथाने भारतातील कम्युनिस्ट आंदोलनाला मोठे नुकसान तर पोहोचवलेच, याशिवाय तेलंगणा संघर्षाच्या पुढील विकासाला सुद्धा थांबवण्याचे काम केले. त्याच वर्षाच्या मे महिन्यात आंध्रप्रदेशातील पार्टी युनिटने रणदिवेंच्या थीसीसला विरोध करत आपली ही लाईन मांडली की भारतीय क्रांतीचे चरित्र रशियन क्रांतीपेक्षा वेगळे आहे आणि चीनमध्ये सुरू असलेल्या नव्या लोकशाही क्रांतीसोबत भारतीय क्रांती समानता ठेवते, इथे चार वर्गांचा संयुक्त मोर्चा बनवावा लागेल आणि दीर्घकालिक लोकयुद्धाचा मार्ग अवलंबवावा लागेल. आंध्र थीसीस मध्ये माओ-त्से-तुंग यांच्या नव्या लोकशाहीच्या (न्यू डेमोक्रसी) सिद्धांताला सुद्धा प्रासंगिक म्हणत भारतातील सर्वहारा क्रांतीला दोन टप्प्यांमध्ये संपन्न करण्याची योजना प्रस्तुत केली गेली. या थीसीस मध्ये सुद्धा काही कमतरता होत्या, उदाहरणार्थ यात भारतीय भांडवलदार वर्गाला दलाल म्हटलेले होते, परंतु एकूण पाहता ही लाईन तत्कालीन परिस्थितींमध्ये तुलनेने चांगली होती. पण पुढील दोन वर्षांचा काळ पार्टीवर रणदिवे लाईनचे वर्चस्व राहिले आणि त्यामुळे तेलंगणा संघर्षाचे मोठे नुकसान झाले. देशातील विविध भागातील शेतकरी संघर्षांना तेलंगणाच्या दिशेने पुढे नेण्याऐवजी आणि कामगार वर्गाला त्या संघर्षासोबत जोडण्याऐवजी "डाव्या" अतिरेकपंथाने पक्षाला जनसमुदायांपासून अलिप्त पाडले आणि कार्यकर्त्यांच्या फळीच्या पुढाकाराला पंगू बनवले. पण आंतरराष्ट्रीय स्तरावर आंध्र लाईनला अनुमोदन मिळाल्यानंतर रणदिवेंची "डावी" अतिरेकपंथी लाईन अलिप्त पडली. मे-जून 1950 मध्ये रणदिवेंच्या ऐवजी राजेश्वर राव पक्षाचे महासचिव बनले आणि पक्षाद्वारे आंध्र थीसीसला आधिकारिक लाईन म्हणून स्विकारले गेले. परंतु, तोपर्यंत उशीर झालेला होता. देशव्यापी स्तरावर संघर्षाच्या विस्ताराच्या शक्यतांचा चुकीच्या लाईनमुळे बळी जाऊन चुकला होता आणि नवीन बुर्झ्वा सत्तेला स्वत:च्या सुदृढीकरणासाठी तीन वर्षांचा मूल्यवान वेळ मिळाला होता.

## सोवियत नेतृत्त्वाचे मार्गदर्शन

1951 येता येता तेलंगणा संघर्षाच्या पुढील मार्गावरून पक्षांतर्गत मतभेद तीव्र होऊ लागले. मुंबई मुख्यालयामध्ये प्रभावी असलेला एस.ए. डांगे, घाटे आणि अजय घोष यांचा दक्षिणपंथी गट सुरुवातीपासूनच आंध्र लाईनचा विरोध करत होता. परंतु आंध्र समितीच्या मोठ्या गटाने तरीही संघर्ष चालूच ठेवला होता. त्यांचे मानणे होते की तात्कालिकरित्या नुकसान झालेले असले तरीही संघर्ष चालू ठेवणे आणि देशातील अन्य अनुकूल परिस्थितींमधील भूभागांवर त्याचा विस्तार शक्य आहे.

पक्षामध्ये असलेले मतभेद, संकट आणि गोंधळलेपणाच्या स्थितीला दूर करण्यासाठी पुन्हा एकदा आंतरराष्ट्रीय नेतृत्वावर भरवसा केला गेला आणि चार सदस्यांचे एक प्रतिनिधी मंडळ 1951 च्या सुरुवातीला सोवियत पार्टीच्या नेतृत्वाशी बोलण्याकरिता मॉस्कोला गेले. यामध्ये दोन जण – राजेश्वर राव आणि बसवपुनैया हे तेलंगणा संघर्षाचे नेते होते, आणि इतर दोन जण – अजय घोष व डांगे त्यांच्या विरोधात होते. सोवियत पार्टीच्या वतीने स्टॅलिन, मालेंकोव्ह, मालरोव्ह आणि सुस्लोव्ह यांनी चर्चा केली. पी सुंदरैया यांनी संघर्ष थांबवण्याच्या

पान 13 वर

# तेलंगणा शेतकरी सशस्त्र संघर्षाची 75 वर्षे
# मिळकत आणि शिकवण (दुसरा आणि अंतिम भाग)

पान 12 वरून

पक्षाच्या निर्णयाला योग्य ठरवण्यासाठी आपल्या पुस्तकात याकडे इशारा केला आहे की स्टॅलीनने तेलंगणा सशस्त्र संघर्षाला थांबवण्याचा सल्ला दिला होता कारण की या गनिमी काव्याच्या युद्धाच्या समर्थनात व्यापक जनसमर्थनाच्या अभावी हा संघर्ष व्यक्तिगत दहशतवादाच्या दिशेने वळू शकत होता. परंतु या संघर्षामध्ये सहभागी आणि नक्सलबारी शेतकरी विद्रोहानंतर चारू मजूमदार यांच्या अतिरेकपंथी लाईनचा विरोध करत क्रांतिकारी जनदिशेबद्दल बोलणाऱ्या डी.व्ही.राव यांनी आपले पुस्तक "तेलंगणा आर्म्ड स्ट्रगल अँड द पाथ ऑफ इंडियन रिव्हॉल्युशन" मध्ये लिहिले आहे की त्यांना त्यावेळी पक्षामध्ये असे कळवले गेले होते की स्टॅलीनने भारतीय प्रतिनिधी मंडळाला म्हटले होते की "सशस्त्र संघर्ष चालू ठेवण्यासाठी अधिक हत्यारे, अधिक कॅडर, आणि संघर्षाच्या भागांमध्ये छापामारी करण्यासाठी आवश्यक सर्व गोष्टी पाठवल्या गेल्या पाहिजेत." नंतर प्रतिनिधी मंडळाने सशस्त्र संघर्षामध्ये येणाऱ्या आह्वानांवर जोर दिला तेव्हा स्टॅलीनचे म्हणणे होते की "हे खेदजनक आहे की तुम्ही लोक संघर्षाचे रक्षण नाही करू शकत आहात."

प्रतिनिधीमंडळाने भारतात परत आल्यानंतर भारतात लोकशाही क्रांतीच्या कार्यक्रमाचा एक मसुदा तयार केला गेला आणि एक धोरण-विषयक वक्तव्य प्रसारित केले गेले ज्यामध्ये सशस्त्र संघर्षाचा उल्लेख तर नव्हता पण रणनीतिविषयक कागदपत्रांमध्ये "अपरिपक्व विद्रोह आणि जोखीम असलेल्या कारवायांपासून सावध रहात" शेतकऱ्यांच्या छापामार युद्धासहित कामगारांचे वर्गीय संप आणि संघर्षांच्या अन्य रूपांच्या वापराबद्दल बोलले गेले होते. त्यामध्ये या धारणेला सुद्धा चुकीचे ठरवले गेले होते की देशाच्या एखाद्या भागामध्ये सशस्त्र विद्रोह तेव्हाच सुरु होऊ शकतो, जेव्हा संपूर्ण देशामध्ये विद्रोहाची स्थिती तयार होईल. दस्तऐवजांनुसार एखाद्या मोठ्या भूभागावर शेतकरी संघर्ष जर जमीन जप्त करण्याच्या स्थितीला पोहोचला, व्यापक जनांदोलन आणि छापामार युद्ध जर योग्य पद्धतीने संघटित होऊ शकले, तर देशभरामध्ये शेतकऱ्यांना आंदोलित करून संघर्षाला एका उच्च पातळीवर नेणे शक्य आहे.

### एका गौरवशाली संघर्षाला लाजीरवाण्या पद्धतीने मागे घेतले जाणे

1951 पर्यंत येता-येता पक्षामध्ये दक्षिणपंथी संधीसाधू वरचढ झाले होते. केंद्रिय समितीने आंध्र समितीला संघर्ष तेव्हापर्यंत चालू ठेवण्यास सांगितले जोपर्यंत संघर्ष स्थगित करण्याच्या शर्तीवर सरकारसोबत चर्चा पूर्ण होत नाही. या शर्तींमध्ये शेतकऱ्यांच्या ताब्यातील जमिनी जमिनदारांना परत न करणे, कैद्यांची मुक्ती, खटले परत न घेणे आणि पक्षावरील बंदी उठवणे या प्रमुख शर्ती होत्या. परंतु केंद्रिय समितीच्या या निर्णयाच्या उलट अजय घोष यांच्या नेतृत्त्वाखालील दक्षिणपंथी गटाने आणि आंध्रातील रवी नारायण रेड्डी गटाने विनाशर्त संघर्ष परत घेण्यासाठी दबाव बनवणे चालू केले. पक्षाच्या या स्थितीचा लाभ घेऊन नेहरू सरकारने कोणतीही अट मानण्यास आणि चर्चा करण्यास नकार दिला. मे 1951 पर्यंत केंद्रिय समितीचे आंध्रातील सदस्यही मानून चुकले होते की आता थोड्या प्रमाणातही गनिमी काव्याचे युद्ध चालू ठेवणे शक्य नाही.

ऑक्टोबर 1951 मध्ये पक्षाने विनाशर्त, अत्यंत लाचार पद्धतीने संघर्ष थांबवण्याची घोषणा केली. जंगलातील छापामार युद्ध करणाऱ्या नेत्यांना याची बातमी उशिरा कळाली. पक्ष आता पूर्णपणे संसदीय मार्गावर चालू लागला होता. दक्षिणपंथी गटासमोर विरोधकांनी शरणागती पत्करली आणि कार्यकर्त्यांच्या फळीमध्ये निराशेचे वातावरण पसरले.

### तेलंगणा संघर्षाच्या तात्कालिक पराजयाची कारणे

तेलंगणा संघर्षाच्या तात्कालिक पराभवाचे सर्वात मोठे कारण हे होते की पक्ष बोल्शेविक पद्धतीने एकीकृत नव्हता आणि त्यामध्ये वरपासून खालपर्यंत "डाव्या" आणि दक्षिणपंथी विचलनाचे गट अस्तित्त्वात होते, त्यामुळे तो भारतीय क्रांतीला नेतृत्त्व देण्यात असमर्थ होता. 1946 पासून 1951 पर्यंत अगोदर पी.सी. जोशींच्या काळात दक्षिणपंथी विचलनाने, नंतर रणदिवे काळातील "डाव्या" विचलनाने आणि नंतर पुन्हा अजय घोष यांच्या काळातील दक्षिणपंथी विचलनाने देशाच्या स्तरावर आणि तेलंगणाच्या स्तरावर पक्षकार्याला मोठे नुकसान पोहोचवले. हा एक असा संक्रमणकाळ होता जेव्हा नव्या सत्तेच्या सुदृढीकरणाची प्रक्रिया अजून पूर्ण झालेली नव्हती परंतु नौसेनेतील-विद्रोह, तेभागा-तेलंगणा-पुनप्रावायलार मधील शेतकऱ्यांचे संघर्ष आणि देशव्यापी कामगार आंदोलनाला एका सूत्रात बांधून जनक्रांतीलाच्या प्रवाहाला पुढे नेण्यात पक्षाचे नेतृत्त्व अयशस्वी ठरले. जर ही प्रक्रिया पुढे गेली असती तर काँग्रेसचा संधीसाधूपणा अजून नग्न रूपात समोर आला असता आणि पक्षाच्या नेतृत्वात लोकशाही क्रांती लवकर पूर्ण झाली नसती तरी एकतर दीर्घकालिक लोकयुद्ध मजबूत आधारावर पुढील टप्प्यात गेले असते किंवा जनसंघर्षांच्या दबावामध्ये नेहरू सरकार भूमीसुधाराच्या कार्यभारांना (प्रशियन मार्गानेच आणि वरून, परंतु) वेगाने पूर्ण करण्यास बाध्य झाले असते आणि वेगवान भांडवली विकासामुळे भारत लवकरच समाजवादी क्रांतीच्या टप्प्याला येऊन पोहोचला असता. परंतु असे झाले नाही. 1951 मध्ये पक्षनेतृत्त्वामधील मतभेदांमुळे तेलंगणा संघर्षाला एवढे नुकसान झाले होते की कमीत कमी तात्कालिकरित्या त्याचा पराभव निश्चित झालेला होता. तरीही, जर त्यावेळी नेतृत्त्वावर दक्षिणपंथी गटाचा प्रभाव नसता आणि पूर्णत: आत्मसमर्पण न करता तात्कालिकरित्या मागे हटणे व सैन्य शक्तीला दुर्गम जंगलांमध्ये विखरून टाकल्यानंतर नव्या दमाने त्या भूभागात व देशातील इतर अशा भूभागांमध्ये शेतकरी संघर्ष संघटित केले जाते तर स्थितीला सांभाळून पुन्हा पुढे जाण्याची संधी मिळाली असती. राजेश्वर राव यांच्या नेतृत्वाखालील ज्या गटाने तेलंगणामध्ये योग्य लाईन घेतली होती, तो सुद्धा विचारधारात्मकरित्या कमजोर होता. यामुळे काही काळापर्यंत केंद्रिय समितीमध्ये प्रभावी असण्याच्या काळातही तो आपल्या लाईनला देशस्तरावर मजबूत करू शकला नाही, विरोधी लाईनच्या विरोधात निर्णयक संघर्ष न करता त्यांनी तडजोडीचा मार्ग स्विकारला आणि शेवटी गुडघे टेकले. पक्षाचे बोल्शेविक पद्धतीने एकीकृत नसण्याचे मूळ कारण नेतृत्त्वाची विचारधारात्मक कमजोरी होती. विचारधारात्मक कमजोरीमुळेच भारतातील ठोस परिस्थितींमध्ये मार्क्सवादाला रचनात्मक पद्धतीने लागू करून क्रांतीचा टप्पा व क्रांतीचा मार्ग ठरवण्याऐवजी, पक्ष आंतरराष्ट्रीय मार्गदर्शनावर विसंबून राहिला. ज्यावेळी तेलंगणामध्ये स्थानिक नेतृत्त्व आणि कार्यकर्ते हिंमतीने शेतकऱ्यांसोबत खांद्याला खांदा लावून लढत होते त्यावेळी पक्षाकडे भारतीय क्रांतीचा कोणताही कार्यक्रम सुद्धा नव्हता. आज तेलंगणाच्या त्या गावांमध्ये, जिथे कधी शेतकऱ्यांनी धाडसी संघर्ष छेडला होता, उत्पादनाच्या पद्धतीमध्ये पायाभूत बदल झाला आहे. आज त्या गावामध्ये जहागिरदार आणि मोठमोठे भूस्वामी नाहीत आणि लोक बाजाराकरिता शेती करतात. दुसऱ्या शब्दांमध्ये तेथे भांडवली विकास झाला आहे. यामुळेच तेलंगणा शेतकरी सशस्त्र संघर्षाच्या काळातील रणनिती आणि डावपेच आज जुने झाले आहेत. परंतु त्या काळातील कम्युनिस्टांचे धाडस, साहस, आणि जनतेसोबत मिळून-मिसळून तिला एकजूट, सज्ज आणि संघटित करण्याच्या गौरवशाली इतिहासापासून आजही प्रेरणा घेतली जाऊ शकते. या गौरवशाली संघर्षापासून सकारात्मक आणि नकारात्मक दोन्ही प्रकारचे धडे घेतल्याशिवाय भारतातील क्रांतीचा रथ पुढे जाऊ शकत नाही.

**मज़दूर बिगुल, सप्टेंबर 2021 मधून साभार**

**अनुवाद:** अभिजित

# जाती आधारित जनगणना आणि आरक्षणावर अस्मितेच्या राजकारणाचा मथितार्थ

पान 14 वरून

रोजगाराचा नाराच सर्व जातीतील कष्टकरी लोकांचा समान नारा बनू शकतो. हे सत्य समजून घेतल्यावरच आपण परस्पर विभागणी आणि फूट टाळू शकतो.

आजकाल एक घोषणा फार प्रसिद्ध होत आहे. सर्व अस्मितावादी आणि मागास जातींच्या अस्मितेचे राजकारण करणारे रंगीबेरंगी कुपमंडुक मोठ्या उत्साहाने ही घोषणा लावताना दिसतात. घोषणा आहे "ज्याची जितकी संख्या मोठी, तितकी त्याचा वाटा मोठा"! याला असेही म्हटले जाऊ शकते की लोकसंख्येच्या प्रमाणात प्रत्येक जातीला आरक्षण दिले जावे! मेंदूवर थोडा जरी जोर दिला तर हे समजू शकते की या घोषणेच्या तर्कात काहीच दम नाही. तिचा खरा उद्देश व्यापक कष्टकरी जनतेला आरक्षणाचे मृगजळ दाखविणे, आरक्षणाच्या आंदोलनात तेलघाण्याच्या बैलाप्रमाणे जुंपून देणे आणि स्वत: मात्र त्यांच्या घामाच्या कमाईतून निर्माण होणाऱ्या संपत्तीला हडपत जाणे हे आहे! जातीयवादी राजकारण करणारे सर्व निवडणुकबाज मदारी या वर्गात मोडतात. आरक्षणाची अंमलबजावणी करण्याच्या सरकारच्या हेतूला विरोध करू, त्यात छेडछाड करू, तसेच सर्वांना समान आणि मोफत शिक्षण आणि सर्व काही करू शकणाऱ्या तरुणांना समान रोजगाराच्या संधीचा नारा बुलंद करूया. जे जातीचे ठेकेदार आपल्याला जातीनिहाय चौकटीत कैद करू इच्छितात तेच आपले मोठे शत्रू आहेत. आपण आपला संघर्ष व्यापक केला पाहिजे. सर्व जातीतील कष्टकरी जनतेने समान समस्या शोधून एकत्र पुढे जायला हवे.

लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षणाचे तुकडे मिळूनही काहीच होणार नाही, हे सुद्धा समजून घेतले पाहिजे! नोकऱ्या सातत्याने कमी होत आहेत, बेरोजगारी शिगेला पोहोचली आहे! सप्टेंबर 2021 च्या सुरुवातीला आलेल्या सी.एम.आय.ए. च्या ताज्या अहवालानुसार, भारतातील बेरोजगारीचा दर 8.3 टक्के झाला आहे. एन.एस.एस.ओ.च्या अहवालानुसार, आपण बेरोजगारीच्या दराचे पूर्वीचे सर्व विक्रम मोडीत काढले आहेत. शिपाई पदाच्या 62 जागांसाठी 93,000 लोक अर्ज करत आहेत, त्यापैकी 5,400 पीएच.डी. असतात! 10,000 आर.पी.एफ. जवानांच्या भरतीसाठी 59 लाख लोक रांगेत उभे आहेत! अशा काळात केवळ आरक्षणाच्या भरवशावर बसून मेंढ्यांप्रमाणे जातीय अस्मितावादी गाढवांचा पाठलाग करून व्यापक कष्टकरी जनतेला काहीही मिळणार नाही! निवडणुक-धंदेबाजांच्या भुलाव्यात आपला संघर्ष जातीय अस्मिता आणि आरक्षणापुरता मर्यादित ठेवणे आत्मघातकी ठरेल. त्याच वेळी, जनरल श्रेणीतील लोकांनीही त्यांच्या नोकऱ्यांच्या मार्गात राखीव प्रवर्गातील लोक जबाबदार आहेत या गैरसमजतूतीत राहू नये, तर सरकारच्या रोजगारविरोधी धोरणांमध्ये समस्या आहे हे जाणावे. इतकेच नव्हे तर एक न्यायप्रिय व्यक्ती म्हणून प्रत्येक कष्टकऱ्याच्या हक्कांवर होणाऱ्या हल्ल्यांना कडाडून विरोध केला पाहिजे. त्यामुळेच जातीय अस्मितेचे राजकारण करणाऱ्यांचे वास्तव समजून घ्यावे लागेल. आपण आपल्या संघर्षाची व्याप्ती वाढवली पाहिजे. प्रत्येक जाती, प्रत्येक धर्मातील गरीब लोकसंख्येची एकजूटच सरकारला गुडघे टेकायला भाग पाडू शकते आणि सर्वांना शिक्षण- सर्वांना रोजगार ह्या नाऱ्यात ती शक्ती आहे जी सर्वांना एका अजेंड्याखाली एकजूट करू शकते.

अनुवाद: राहुल

# जाती आधारित जनगणना आणि आरक्षणावर अस्मितेच्या राजकारणाचा मथितार्थ

✎ अरविंद

जात जनगणनेच्या मुद्द्यावरून पुन्हा एकदा राजकारण तीव्र होताना दिसत आहे. विविध अस्मितावादी जातीयवादी पक्ष आपले जातीय समर्थन आणि आधार टिकवण्यासाठी चढाओढ करताना दिसत आहेत. एन.डी.ए.चा मित्रपक्ष जेडी(यू)चे नितीश कुमार भाजपकडे डोळे वटारून पहात आहेत, तर दुसरीकडे स्वत:चे राजकीय स्पर्धक असलेल्या राजदच्या लालू प्रसाद यादवांचे पुत्र तेजस्वी यादव आणि इतर पक्षांना सोबत घेऊन या मुद्द्यावर प्रधानमंत्री मोदींची भेट घेत आहेत. जातनिहाय जनगणनेच्या मागणीबाबत या सर्वपक्षीय शिष्टमंडलाची गेल्या 23 ऑगस्टला प्रधानमंत्र्यांशी भेट झाली होती. शिष्टमंडलात आणि या बैठकीला उपस्थित असलेल्या जनक राम या भाजप नेत्याने सांगितले की, मोदींनी कुटुंबाच्या पालकाप्रमाणे सर्वांचे मत ऐकून घेतले आहे! गोपीनाथ मुंडे यांच्यासारखे भाजपचे विविध नेते विरोधी पक्षात असताना स्वत: जातीनिहाय जनगणनेची मागणी लावून धरत आले होते, तरी सध्या भाजपची या मुद्द्यावरून कोंडी झालेली दिसते.

सत्य हे आहे की जात-आधारित जनगणना झाल्यामुळे किंवा न झाल्यामुळे व्यापक कष्टकरी लोकांच्या जीवनात कोणताही अर्थपूर्ण बदल होणार नाही. आज जेव्हा उदारीकरण-खाजगीकरणाच्या धोरणांमुळे रोजगाराच्या आणि शिक्षणाच्या कमी होत चाललेल्या संधींवर प्रश्न उपस्थित व्हायला हवा, तेव्हा उरल्या-सुरल्या मोजक्या नोकऱ्यांसाठी लोकांना जातीय अस्मितेच्या राजकारणात ढकलणे हे षड्यंत्रापेक्षा कमी नाही. जातीनिहाय जनगणनेच्या मुद्द्यावरून होणाऱ्या दिखाव्याच्या लढाईत सार्वत्रिक शिक्षण, सर्वांसाठी रोजगार आणि सार्वत्रिक आरोग्य सेवा यांचा संघर्ष मागे ढकलला जाईल आणि व्यवस्थेच्या अपयशावरून लोकांचे लक्ष वळवले जाईल आणि एकमेकांच्या जातीविरोधात शत्रुत्व निर्माण केले जाईल. आरक्षण रद्द करण्याची मागणी करणाऱ्यांच्या मनात ब्राह्मणवादी आणि जातीयवादी किडे असल्याने ते अशी मागणी करतात यात शंका नाही, कारण या लोकांनी कधीही शैक्षणिक संस्थांमधील मॅनेजमेंट कोटा किंवा एन.आर.आय. कोटा रद्द करण्याची मागणी केलेली नाही. पण त्याचवेळी असे लोक सुद्धा भ्रमातच जगत आहेत जे मानतात की शिक्षण आणि नोकरीचा प्रश्न आरक्षणाच्या माध्यमातून सुटू शकतो किंवा नवीन वर्गीकरण करून नवीन आरक्षण निर्माण करून हा प्रश्न सुटू शकतो. हे कोठेही अस्तित्त्वात नसलेल्या कल्पनारम्य केकचा तुकडा मिळविण्यासाठीचे भांडण आहे. सत्ताधारी वर्गातील वेगवेगळे घटक आरक्षणाच्या राजकारणाचा वेगवेगळ्या प्रकारे वापर करत राहतात, जेणेकरून लोकांनी शिक्षण आणि रोजगार हा आपला मूलभूत अधिकार बनवण्यासाठी लढूच नये, संपूर्ण व्यवस्था आणि सरकारला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करू नये आणि एकमेकांची माथी फोडत बसावीत.

जातीनिहाय जनगणनेच्या संपूर्ण मागणीमागचा खरा मथितार्थ हा आहे की, भाजपच्या हिंदुत्ववादी फॅसिस्ट आणि धार्मिक अस्मितावादी राजकारणाने “छिन्न-विछिन्न” केलेल्या आपापल्या जातींची व्होट बँक कशी मजबूत करावी आणि येनकेनप्रकारेण जातींच्या नव्या आकडेवारीच्या आधारे आरक्षणाच्या वाटपाची पुनर्व्याख्या करावी. मागासवर्गीय जातींच्या अस्मितेचे राजकारण करणाऱ्या निवडणूकबाज पक्षांचा खरा हेतू समजून घेण्यासाठी आरक्षणाच्या इतिहासात थोडे मागे जावे लागेल. ब्रिटिश व्हाइसरॉय लॉर्ड मेयो यांच्या कार्यकाळात 1872 मध्ये भारतात जनगणना मर्यादित प्रमाणात सुरू झाली, परंतु पद्धतशीर जनगणना 1881 मध्येच सुरू झाली. त्यावेळच्या जनगणनेत जात हा महत्त्वाचा घटक होता. ब्रिटिशांनी भारतात जनगणना करण्याचे मुख्य कारण म्हणजे भारतीय समाजाची अंतर्गत रचना आणि वांशिक समीकरणे समजून घेणे, जेणेकरून वसाहतवादी लूट आणि शोषण आणखी मजबूत करता येईल. 1881 पासून, भारतात दर 10 वर्षांनी जनगणना केली जात आहे, परंतु प्रत्येक जनगणनेमध्ये जातीचा घटक समाविष्ट केलेला नाही. भारतात सर्व जातींवर आधारित शेवटची जनगणना 1931 साली झाली होती. यानंतर 1941 मध्ये जातीवर आधारित जनगणना करण्यात आली परंतु दुसऱ्या महायुद्धाच्या परिस्थितीमुळे माहिती संकलित आणि संपादित करता आली नाही. 1951 च्या जनगणनेत फक्त अनुसूचित जाती आणि जमातींचीच मोजणी करण्यात आली होती. धर्माच्या आधारावर लोकसंख्येची गणना तर होतच आली आहे.

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर 1951 मध्ये राज्यघटना लागू झाल्यानंतरच अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींसाठी आरक्षणाची व्यवस्था सुरू झाली होती. पुढे इतर जातींचे लोकही मागासवर्गीयांमध्ये समाविष्ट करवून घेऊन आरक्षणाची मागणी करत होते. मागासलेपणा आणि मागासवर्गाच्या व्याख्येच्या मुद्यावर काका कालेलकर आयोग तत्कालीन प्रधानमंत्री नेहरूंनी स्थापन केला होता. या आयोगाने विविध जातींना मागास जाती प्रवर्गात




सामील करण्यासाठी 1931 च्या माहितीचाच वापर केला होता. परंतु मागासलेपणाच्या व्याख्येबाबत काका कालेलकर समितीच्या विविध सदस्यांमध्ये वैचारिक एकमत प्रस्थापित होऊ शकले नाही. काही लोक त्याचे परिमाण आर्थिक मानत होते, तर काही लोक जातीच्या आधारावर त्याचे परिमाण मानत होते. एकंदरीत काका कालेलकर आयोगाला कोणताही धोरणात्मक बदल करता आला नाही. यानंतर, 1978 मध्ये, मोरारजी देसाई यांच्या जनता पक्षाच्या (जो पक्ष नसून प्रत्यक्षात शंकराची वरात होती) सरकारच्या कार्यकाळात बिंदेश्वरी प्रसाद मंडल (बीपी मंडल) यांच्या अध्यक्षतेखाली मागास आयोगाची स्थापना करण्यात आली. पुढे याच बिंदेश्वरी प्रसाद मंडलांच्या अध्यक्षतेखालील मंडल आयोगाच्या शिफारशींनुसार सर्वोच्च न्यायालयाने 1992 मध्ये सामाजिक आणि शैक्षणिक आधारावर विविध धर्मातील 3,743 जातींमधील 1 लाख उत्पन्न मर्यादा असलेल्यांना 27 टक्के आरक्षण लागू केले. जातीचे. सर्वोच्च न्यायालयानेही आरक्षणाची मर्यादा 50 टक्क्यांपर्यंत ठेवण्याचे निर्देश दिले होते. 2006 मध्ये यूपीए सरकारच्या कार्यकाळात काँग्रेसचे केंद्रीय मनुष्यबळ मंत्री अर्जुन सिंह यांनी शैक्षणिक संस्था आणि नोकऱ्यांच्या प्रवेशात मागासवर्गीय आरक्षण लागू केले. एकूणच आता आरक्षण 50 टक्क्यांवर पोहोचले होते. त्यानंतर सरकारांनी आर्थिक आधारावर आणि विशेष मागास जातीचे नाव देऊन आरक्षण देण्याचे प्रयत्न तीव्र केले. उदाहरणार्थ, 25 जानेवारी 2013 रोजी हरियाणाच्या भूपेंद्र हुडा यांच्या तत्कालीन काँग्रेस सरकारने 5 जातींना (जाट, जाटशिख, रोड, बिष्णोई, त्यागी) विशेष मागास जातीचा दर्जा देऊन 10 टक्के आरक्षण जाहीर केले; तसेच ब्राह्मण, राजपूत, खत्री, पंजाबी आणि महाजन जातींनाही आर्थिकदृष्ट्या मागासलेल्यांमध्ये समाविष्ट करून 11 सप्टेंबर 2013 रोजी 10 टक्के आरक्षण देण्यात आले. मात्र, नंतर पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाने या दोन्ही प्रकारची आरक्षणे फेटाळली. सध्या फडणवीसांच्या काळात महाराष्ट्र सरकारने मराठा जातीला 16 टक्के आरक्षण देण्याचे सुतोवाच केले. तामिळनाडूमध्ये आरक्षण 69% वर पोहोचले आहे, ज्यांचे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. केंद्र सरकारने जानेवारी 2019 मध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना 10 टक्के आरक्षण दिले आहे. एकूणच यातून सत्ताधारी वर्गाचा हेतू आपल्याला सहज समजू शकतो. देशाला स्वातंत्र्य मिळून 75 वर्षे होत आली तरी सर्वांसाठी शिक्षण आणि रोजगाराची व्यवस्था झालेली नाही, उलट ते लोकांना विभागण्याचे प्रयत्न वेगाने होत आहेत. सार्वत्रिक शिक्षण आणि सार्वत्रिक रोजगाराचे प्रश्न सोडून लोक जी गोष्ट खरोखर अस्तित्वातच नाही त्या गोष्टीसाठी लढत आहेत, आणि यातच शासक वर्गाचे यश आहे!

स्वातंत्र्यानंतर जसजसे स्वतंत्र भारतातील लोकांचे आदर्श आणि स्वप्ने धुळीस मिळू लागली, तसतसे सत्ताधारी वर्गाने त्यांचे लक्ष व्यवस्थेच्या अपयशातून अनावश्यक बाबींकडे वळवणे चालू ठेवले. आरक्षणाच्या नावाखाली केली गेलेली वानर-वाटणी सुद्धा लोकांची एकजूट मोडून त्यांना आपापसात लढवण्याचे सत्ताधारी वर्गाच्या हातातले शक्तिशाली हत्यार बनले आहे. आरक्षणाप्रती सत्ताधारी वर्गाचा हेतू तो नक्कीच नव्हता जो सामान्यतः प्रचारित केला जातो. आरक्षण हे अल्पमुदतीच्या सवलतीच्या स्वरुपात होत पण ही अल्पकालीन सवलत सुद्धा कधीच नीट लागू झाली नाही. याचाच परिणाम आहे की आज वरच्या सरकारी नोकऱ्यांमध्ये, शिक्षकांमध्ये, सैन्यात आणि पोलिसांमध्ये, नोकरशाहीमध्ये दलितांचा सहभाग त्यांच्या लोकसंख्येच्या तुलनेत खूपच कमी आहे. नक्कीच घटनात्मक आणि लोकशाही हक्कांच्या संघर्षाच्या आघाडीवर विद्यमान आरक्षणांची पारदर्शकतेने अंमलबजावणी करण्याचाही अजेंडा बनतो. त्यासाठी सर्व लोकशाही शक्तींनी प्रयत्नही करायला हवेत. पण आरक्षणाची पूर्ण अंमलबजावणी झाली तर सर्वांना नोकरी मिळेल, असा विचार करणे मृगजळाच्या मागे धावण्यापेक्षा कमी नाही. दलितांच्या आणि तथाकथित मागासलेल्यांच्या प्रत्येक समस्येवरचा उपाय म्हणजे आरक्षण म्हणणे आणि सर्व संघर्ष फक्त आरक्षणापुरतेच मर्यादित ठेवणे म्हणजे शासक वर्गाच्या कह्यात जाणेच आहे.

आरक्षण हे ‘अफर्मेटीव्ह ॲक्शन’ (सत्तेने केलेली सकारात्मक कारवाई) या स्वरूपात उचललेले पाऊल होते. सामाजिकदृष्ट्या मागासलेल्यांचे प्रतिनिधित्व सुनिश्चित करणे हा आरक्षणाच्या अंमलबजावणीचा मुख्य युक्तिवाद होता. स्वातंत्र्याच्या 75 वर्षांनंतर आरक्षणाच्या धोरणाचे विश्लेषण करून आपण काही सर्वसाधारण निष्कर्षांवर येऊ शकतो. आरक्षणाच्या लाभापासून रोजगार मिळणे तर दूरच, दलित जातीतील बहुसंख्य लोकसंख्या त्याच्या अंमलबजावणीला सात दशके उलटूनही उच्च शिक्षणापर्यंत पोहोचू शकलेली नाही. आज सामाजिक-आर्थिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या दलित लोकसंख्येपैकी किती लोक सामाजिक समतेच्या दर्जाला पोहोचले आहेत? आणि हा वेग असाच राहिला, तर उरलेल्या भागाचे स्तरोन्नयन व्हायला अजून किती वेळ लागेल? या मुद्यांच्या आधारे आपण असे म्हणू शकतो की, शिक्षण आणि नोकरीसाठीच्या संघर्षाला केवळ आरक्षणापुरतेच मर्यादित करणे अजिबात पुरेसे नाही, उलट असे करणे म्हणजे स्वतःच्या पायावर कुऱ्हाड मारणे होय. मागासलेल्या जातींमध्येही आरक्षणाचा लाभ अत्यंत मर्यादित लोकसंख्येपर्यंतच पोहोचला आहे. कारण मोठी लोकसंख्या आरक्षणाचा लाभ घेण्याच्या स्थितीपर्यंत कधीच पोहोचू शकली नाही आणि जरी कोणी पोहोचलाच तरी संधी फारच मर्यादित असतात.

मनुवादी उच्चवर्णीय मानसिकतेच्या आधारे आरक्षणाकडे पाहणे आणि त्याचा अर्थ लावणे हे आम्ही निश्चितपणे चुकीचे मानतो. पण आपल्या संघर्षांना फक्त आरक्षण मिळवण्यापुरते आणि मिळालेल्या आरक्षणाच्या संरक्षणापुरते मर्यादित ठेवणे पुरेसे होईल का? याच तर्काच्या आधारे आम्ही आरक्षण हे सत्ताधारी वर्गाच्या हातात असलेले लोकांमध्ये फूट पाडण्याचे एक हत्यार मानतो. नक्कीच, कायदेशीर आणि घटनात्मक अधिकार म्हणून आरक्षणाची प्रामाणिकपणे अंमलबजावणी करण्यासाठी, कोट्यातील रिक्त पदे भरवण्यासाठी आंदोलने व्हायला हवीत, परंतु आज प्रत्येक व्यक्तीला मोफत शिक्षण आणि काम करण्यायोग्य प्रत्येक व्यक्तीस

पान 13 वर

# राज्यात निवासी डॉक्टरांचा संप

## डॉक्टरांनी स्वकेंद्री मागण्यांकडून आरोग्यसेवाकेंद्री मागण्यांकडे जाण्याची गरज

**डॉ. नेहा**

महाराष्ट्रातील निवासी डॉक्टरांनी (मार्ड) 1ऑक्टोबर 2021 पासून बेमुदत संप पुकारला होता. डॉक्टरांच्या विविध मागण्या मान्य न झाल्यामुळे निवासी डॉक्टरांनी संपाचे पाऊल उचलले होते. या संपात राज्यातील जवळपास 19 शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील सुमारे सव्वा पाच हजार निवासी डॉक्टर सहभागी झाले होते. रुग्णालयातील अत्यावश्यक सेवेतील आणि कोरोना वॉर्डमधील निवासी डॉक्टर मात्र संपात सहभागी न होता सेवेत कायम राहिले. निवासी डॉक्टरांकडून कोरोना काळातील निवासी डॉक्टरांचे शैक्षणिक शुल्क माफ करण्यात यावे, वसतीगृहाचा दर्जा सुधारावा आणि मानधनातून टी.डी.एस. कापू नये या तीन प्रमुख मागण्यांसह इतर काही मागण्यांसाठी बेमुदत संपाची घोषणा करण्यात आली. निवासी डॉक्टरांपैकी अनेकजण आर्थिकदृष्ट्या कठिण परिस्थितीतून येणारे असतात आणि करोना काळातील आर्थिक दुरावस्थेचा फटका अनेकांना बसला आहे.

संपाच्या तिसऱ्या दिवसापर्यंत वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभागाने निवासी डॉक्टरांसोबत कोणतीही चर्चा केली नाही. राज्य सरकारच्या या उदासीनतेमुळे सेंट्रल मार्डच्या बैठकीत संप अधिक तीव्र करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मार्डच्या प्रतिनिधींबरोबर बैठक घेतली. राज्यातील सर्व निवासी डॉक्टरांच्या कार्याचा सन्मान म्हणून सन्माननिधी देण्यात येईल, शैक्षणिक शुल्क माफी तांत्रिक कारणामुळे शक्य नसल्यामुळे तज्ञांसोबत चर्चा करून यावर निर्णय घेतला जाईल, असे मुख्यमंत्र्यांनी या बैठकीत सांगितले. मुंबई पालिकेच्या निवासी डॉक्टरांच्या टी.डी.एस. माफीबाबत चर्चा करून करून सकारात्मक निर्णय घेतला जाईल असेही आश्वासन दिले. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील वसतीगृहात आवश्यक सुधारणा करण्यात येतील, असे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिल्यानंतर अखेर मार्डने संप मागे घेत असल्याचे जाहीर केले. मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या आश्वासनांनी बाकी काही नाही पण संप मोडण्याचे काम नक्की केले आहे.

निवासी डॉक्टर्स हे सरकारी रुग्णालयांमध्ये कामगार-कष्टकरी वर्गाला सेवा देण्यात गुंतलेले असतात. इतर आरोग्य कर्मचाऱ्यांच्या तुलनेत त्यांना जास्त सुविधा दिल्या जात असल्या, तरीही त्यांच्या अनेक मागण्या अनेक वर्षांपासून प्रलंबित आहेत. परंतु कर्मचारी म्हणून आपल्या अधिकारांची मागणी करत असताना हे लक्षात घेणे आवश्यक आहे की निवासी डॉक्टर्स एखाद्या वेगळ्या जगात नाही तर त्याच आरोग्य व्यवस्थेत काम करतात जिच्यात इतर कर्मचारी आणि पेशंट्स सुद्धा सामील आहेत. भांडवली बाजारी व्यवस्था काम करणाऱ्यांचे स्तर निर्माण करून भेदभाव करते आणि "बौद्धिक" कामांना जास्त महत्व देऊन जास्त वेतनाच्या मार्गाने त्यांना व्यवस्थेच्या समर्थकांच्या रूपात उभे करण्याचे काम करते. परंतु खाजगीकरण उदारीकरणाच्या काळात, जिथे सरकार आरोग्यव्यवस्थेला वाऱ्यावर सोडत आहे, जर पेशंट्स, आणि कर्मचाऱ्यांच्या समस्यांना सोडवणे हे सरकारचे प्राधान्य नसेल तर स्वतंत्रपणे निवासी डॉक्टरांच्या सर्व समस्या सुटणे शक्य नाही हे त्यांनी लक्षात घेणे आवश्यक आहे. तेव्हा डॉक्टरांनी स्वकेंद्रित मागण्यांपासून सर्व आरोग्य कर्मचाऱ्यांच्या, पेशंटसच्या आणि व्यापक कामगार-कष्टकरी जनतेच्या आरोग्यसेवेविषयक मागण्यांकडे जाणे याच मार्गाने रोग्य राजकीय दबाव निर्माण होऊ शकतो आणि न्यायाची खरी अपेक्षा होऊ शकते. त्यासाठी सर्वांना वैद्यकीय शिक्षणासहीत सर्व शिक्षण आणि आरोग्य सुविधा मोफत व दर्जेदार देणे ही सरकारची जबाबदारी आहे, हा प्रस्थानबिंदू असायला हवा.

नजीकच्या काळात एकीकडे देशभरात सर्वत्र कोरोनाच्या दुसऱ्या लाटेचे थैमान सुरू होते. शहरांमध्ये आणि गावांमध्येही रुग्णसंख्या झपाट्याने वाढत होती. रुग्णालयात बेड्स आणि ऑक्सिजन चा तुटवडा होता. अशा काळात रुग्णाच्या नातेवाईकांची रुग्णालयात बेड मिळण्यासाठी आणि ऑक्सिजन मिळण्यासाठी प्रचंड धावपळ आणि ओढाताण झाली; योग्य उपचाराअभावी, बेड्स आणि ऑक्सिजन अभावी रुग्णांचे मृत्यूचे प्रमाण वाढत गेले. बेड उपलब्ध नसल्यामुळे रुग्णांचा आजार अंगावर ओढवून अचानक रुग्णाचे फुफ्फुसे निकामी होऊन रुग्ण मृत्यूमुखी पडले व दुसरीकडे डॉक्टर्स,वार्डबॉय, नर्सेस, व इतर कर्मचारी यांना गाव ते शहर पातळीवर "कोविड योद्धा" म्हणवत तुटपुंज्या मानधनावर आणि सुविधांच्या अभावात काम करावे लागले. तरी देखील सुरक्षेपासून मानधनापर्यंत सरकारने नाममात्र दखल घेतली होती. मुख्यमंत्र्यांनी कोरोना काळात वैद्यकीय कर्मचाऱ्यांचा उल्लेख "कोविड योद्धा" म्हणून करून "रियल हिरो (real hero)" असा उल्लेख करून देखील पगार वाढ नाही, आरोग्य सुविधा नाही, विमा योजनेत सुरक्षा नाही! एवढेच काय पीपीई किट, सॅनिटायझर सारख्या मूलभूत सुविधा देखील मिळाल्या नाहीत. आवश्यक त्या मूलभूत सुविधा न मिळाल्याने डॉक्टरांसहित कित्येक वैद्यकीय कर्मचाऱ्यांना आपला जीव गमावावा लागला. इतके असूनही जनतेचा जो आरोग्य सेवेवर अविश्वास निर्माण झाला आहे, त्यापायी अनेकदा तणावात काम करणाऱ्या डॉक्टर्स-कर्मचाऱ्यांना पेशंट्सच्या रोशाचाही सामना करावा लागला. पेशंट्सच्या अविश्वासामागचे मूलभूत कारण सरकारी आरोग्यव्यवस्थेचे झालेले खाजगीकरण, नफेखोरी व खाजगी आरोग्यव्यवस्थेला चालना देण्यासाठी सरकारी आरोग्यव्यवस्थेवर केलेला तुटपुंजा खर्च आणि खुद्द वैद्यकिय व्यावसायिकांनी स्विकारलेले बाजारीकरणहृ हे आहे.

आज लाखो-कोटींची फी घेऊन चालणारे वैद्यकिय महाविद्यालये असेच डॉक्टर्स निर्माण करतील जे वैद्यकीय सेवेकडे व्यापार म्हणूनच पाहतील. खाजगी प्रॅक्टिसच्या लोभापायी डॉक्टर्स सुद्धा धंदेवाईक पद्धतीने विचार करणारे बनत आहेत. सर्वत्र बाजाराचीच व्यवस्था लागू असल्यामुळे निवासी डॉक्टर्स सरकारी सेवेत असले तरी त्यांच्या अपेक्षा सुद्धा खाजगी डॉक्टरांसारख्या सुविधांच्या बनत आहेत. हॉस्पिटल्सची भरमसाठ बिलं आणि अनावश्यक उपचाराच्या घटना सुद्धा व्यापारी मानसिकतेचाच परिणाम आहेत. परंतु बाजाराची, नफ्यासाठी चालणारी वैद्यकीय व्यवस्था बहुसंख्यांक जनतेची आरोग्याची गरज भागवू शकत नाही. दुसरीकडे वैद्यकिय सेवेमध्ये काम करणाऱ्या कर्मचारी-डॉक्टरांची एकजूट बनू नये म्हणून सरकारही त्यांना वेगवेगळी धोरणे लागू करून भेद निर्माण करते, कर्मचाऱ्यांची कामांची स्थिती जास्त बिकट करत जाते आणि परिणामी आरोग्य सुविधा कमजोर होत जाते. याचाच परिणाम आहे पेशंट-डॉक्टर संघर्ष निर्माण होणे.

डॉक्टर्स-कर्मचाऱ्यांना सन्मानजनक रोजगारासहीत प्रत्येक व्यक्तीला मोफत आणि दर्जेदार आरोग्य सुविधा देणे हे आज जगातील सर्वाधिक संपन्न देशांमध्ये मोजल्या जाणाऱ्या भारताला अजिबात अशक्य नाही, परंतु त्याकरिता नफा आणि बाजार केंद्रित आरोग्य सुविधेवर प्रश्न निर्माण करावेच लागतील. मार्डच्या दुखण्याचे सुद्धा पूर्ण आणि दूरगामी निराकरण त्याशिवाय अशक्य आहे.

# जालियनवाला बाग नूतनीकरणाच्या नावाने इतिहासाचे विकृतीकरण

पान 16 वरून

बांधणारा सेंट्रल विस्टा प्रकल्प, सरदार पटेल ची 300 कोटी रुपयांची एकतेची मूर्ती व त्यासाठी बळजबरीने हडपलेल्या स्थानिक जनतेच्या जागा यातून बघितलेच आहे. आर. एस.एस चा मुख्य अजेंडा नेहमी अंधराष्ट्रवाद पसरवून जनतेत जातीय, धार्मिक तेढ निर्माण करणे हाच राहिलेला आहे. भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात देखील आर. एस. एस. च्या "वीरांनी" ब्रिटिश दरबारी मागितलेले माफीनामे, कधीही ब्रिटिश वसाहत वाद्यांविरुद्ध न लढलेले लढे यांसोबतच आजचे जालियनवाला बागेचे पालटलेले स्वरूप आर.एस एस चे ब्रिटिश सरकार प्रती असलेले 'प्रेम' दाखवून देते. जालियनवाला बाग हत्याकांडानंतर ती घटना जनतेच्या विस्मृतीत टाकण्यासाठी ब्रिटिश सरकारने तिथे कपड्यांची मोठी बाजारपेठ सुरु केली कारण ब्रिटिशांना हा इतिहास कायमसाठी पुसून टाकायचा होता! आज जालियनवाला बागेच्या इतिहासाच्या शेवटच्या अवशेषांना मिटवून, त्यांचे सुशोभीकरण करून आर.एस.एस.च्या वारसांनी ब्रिटिशांप्रती असलेली 'स्वामीनिष्ठा' पुन्हा सिद्ध केली आहे. भारत छोडो आंदोलनाच्या वेळी संघाने देशव्यापी जन उभारात शून्य भागीदारी केली. उलट आंदोलनाचा बहिष्कार करून इंग्रज सरकारला साथ दिली. शामाप्रसाद मुखर्जी, अटल बिहारी वाजपेयी यांनी देखील खुलेआम ब्रिटिश सरकारच्या समर्थनात वक्तव्य केलीत. ब्रिटिश सरकारने देखील फॅसिस्टांच्या ह्या 'स्वामीनिष्ठे'च्या बदल्यात हिंदू सांप्रदायिक गुंडांना कधीच आपल्या निशाण्यावर धरले नाही. आज हेच लोक सत्तेत आहेत. संघाने, योगी-मोदीने, स्वतःच्या राष्ट्र भक्तीचे कितीही गुणगान गायले तरी ब्रिटिशांना साथ देऊन भारतीय जनतेसोबत केलेल्या विश्वासघाताचा डाग कधीच मिटवू शकत नाही. इतिहासाला ह्या प्रकारे विकृत करून नव्याने काल्पनिक इतिहास घडवण्यामागचं मुख्य कारण हेच आहे की संघ स्वतःच्या काळ्या आणि गद्दारीच्या इतिहासाला घाबरतो. हिम्मतपूर्ण संघर्ष संघाने कधीच केला नाही आणि करणारही नाही. भ्याड हिंसक हल्ले करणं, हिंदू-मुस्लिम दंगे भडकवणे आणि भांडवलदारांची मनोभावे सेवा करणे हेच संघाचे सूत्र राहिलेलं आहे. पंजाब, यू.पी. निवडणुका जवळ आहेत आणि त्याच पार्श्वभूमीवर बीजेपी अंधराष्ट्रवादाची लाट पसरवत आहे. योगी-मोदी जोमात अनेक 'महापुरुषांच्या' मूर्त्यांची स्थापना करत आहेत. ब्रह्मलीन महंत दिग्विजय नाथ, राजा सुहेल देव, महाराणा प्रताप, राजा रुद्रेंद्र विक्रम सिंग, राजा मिहिर भोज, हेमवती नंदन बहुगुणा, विरांगना उदा देवी पासून ते आंबेडकरांची मूर्ती! अस्मितेचे राजकारण करण्यासाठी भाजपने कुणालाही सोडले नाही. हे इतकं आवश्यक आहे की प्रधानमंत्री, मुख्यमंत्री प्रत्येक मूर्ती उद्घाटनाला जातीने हजर असतात. शिवाय ह्या मूर्त्यांच्या संरक्षणासाठी विशेष फौज निर्माण केली आहे. जालियनवाला बाग स्मारकात बसवण्यात आलेल्या अनेक मूर्त्या ह्याच शृंखलेचा भाग आहेत.

या सर्व क्रियाकलापामागे कारण हे आहे की जनतेच्या इतिहास निर्मितीच्या शक्तीला फॅसिस्ट घाबरतात आणि मग इतिहासाला वास्तवापासून तोडून जनतेत आपली विचारधारा आणि राजकारण योग्य असल्याचे भासवतात.

सध्या सततच्या आर्थिक मंदीमुळे भांडवलशाही संकटग्रस्त असताना फॅसिस्ट शक्तींची भांडवलशाहीला स्वतःचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी नितांत आवश्यकता आहे. ऐतिहासिक रित्या फॅसिस्टांनी नेहमी कामगार वर्गाच्या शत्रुची भूमिका निभावली आहे. कामगार कष्टकरी जनतेला आज फॅसिस्टांद्वारे होणाऱ्या इतिहासाच्या विकृतीकरणाचा विरोध करणे, पुढच्या पिढ्यांसाठी इतिहासातील वास्तव जतन करून ठेवणे गरजेचे आहे कारण हा इतिहासच आपल्याला सांगतो की फॅसिस्ट उभाराला प्रतिरोध निर्माण करणं अशक्य नाही! धूळ आणि राखेच्या हजारो थरांखाली सत्य दाबून ठेवले तरी सत्य मिटवणे शक्य नाही. क्रांतीचा वारसा मागच्या पिढ्यांकडून येणाऱ्या पिढ्यांमध्ये प्रवाहित होत असतो. कामगार वर्गीय दृष्टिकोनातून तर्क, विज्ञान, लोकशाही मूल्य यांचा प्रचार प्रसार करत, कामगार वर्गाच्या संघर्षांच्या इतिहासाचे संरक्षण करत, फॅसिस्टांविरोधातला लढा मजबूत करणे आज अनिवार्य आहे.

# जालियनवाला बाग नूतनीकरणाच्या नावाने इतिहासाचे विकृतीकरण

पूजा


13 एप्रिल 1919 रोजी जालियनवाला बाग येथे जमलेल्या शेकडो निःशस्त्र आणि निरपराध भारतीयांवर ब्रिटिश सरकारने बेधुंद गोळीबार करून हजारो भारतीयांची हत्या केली. हा दिवस ब्रिटिश कालीन भारतीय इतिहासातील एक काळा दिवस मानला जातो. ब्रिटिश सरकारने तेव्हा नुकत्याच काढलेल्या रौलेट कायद्याविरोधात तसेच डॉ. सैफुद्दीन किचलु आणि डॉ.सत्यपाल यांच्या अटके विरोधात शांततेत आंदोलन करण्यासाठी बैसाखीच्या दिवशी सुमारे 10,000 भारतीय जालियनवाला बागेत उपस्थित होते. ह्या कायद्यानुसार ब्रिटिश सरकारला कुणालाही, केव्हाही अटक करून, त्या व्यक्तीवर खटला न चालवता कितीही दिवस तुरुंगात डांबण्याचा अधिकार मिळाला होता (ठीक त्याचप्रकारे ज्याप्रमाणे आज देशात फॅसिस्ट मोदी-योगी सरकारने यु.ए.पी.ए. सारख्या कायद्यांच्या आधारे राजकीय विरोधकांना पुराव्याशिवाय, खटला न चालवता तुरुंगात डांबण्याचे सत्र चालवले आहे)! आंदोलकांना चिरडण्यासाठी ब्रिगेडियर जनरल रेगिनाल्ड एडवर्ड हॅरी डायर जालियनवाला बाग मैदानाच्या एकमेव निमुळत्या प्रवेशद्वारातून आत आला व बाहेर जाण्यासाठीचा तो एकमेव मार्ग त्याने अडवून धरला. शांततेत आंदोलन करणाऱ्या जमावाला कसलीही पूर्वसूचना न देता, लहान मुले, वयस्क, महिला-पुरुष काहीही न बघता त्याने सोबत आणलेल्या सैन्याला गोळीबाराचा आदेश दिला. सुमारे 100 सैनिकांनी जवळजवळ 1650 फेऱ्यांचा गोळीबार न थांबता केला. ब्रिटिश सरकारी आकड्यानुसार 379 लोकं मारली गेली आणि 1200 जखमी झाले, पण इतर आकडे सांगतात की मरणाऱ्यांची संख्या ही हजारावर होती! गोळीबारानंतर जखमींना रक्ताच्या थारोळ्यात तसंच सोडून डायर आणि त्याचं सैन्य मैदानातून निघून गेलं. त्यानंतर अमृतसरसह संपूर्ण पंजाब मध्ये मार्शल कायदा लागू करण्यात आला. ज्यामुळे जखमींना दवाखान्यात नेणे, उपचार करणे देखील शक्य झाले नाही. संपूर्ण भारतात ही बातमी वाऱ्यासारखी पसरली. ब्रिटिश सरकार च्या विरोधात भारतीय जनतेच्या मनात प्रचंड असंतोष निर्माण झाला. अनेक भारतीयांच्या मनात ह्या घटनेची जखम खोलवर कोरली गेली, ज्याचा परिणाम म्हणून देशभरात असहकार चळवळीने जोर धरला. भारताचे क्रांतिकारी शहीद भगतसिंह आणि त्यांच्या इतर क्रांतिकारी साथींवर देखील ह्या घटनेचा गंभीर प्रभाव होता. ह्या घटनेच्या निषेधार्थ रवींद्रनाथ टागोरांनी ब्रिटिश सरकारने त्यांना बहाल केलेला 'नाईटहूड' चा किताब परत केला. काही इतिहासकारांच्या मते ब्रिटिश राजवटीच्या भारतातील अस्ताची ती पहिली पायरी होती, जिने कोटी भारतीयांना स्वातंत्र्य लढ्यात उतरण्यासाठी प्रेरित केले. एकीकडे जालियनवाला बाग हत्याकांडामुळे भारतात ब्रिटिश सत्तेविरुद्ध असंतोष वाढत होता तर दुसरीकडे जनरल डायर ला 'हाऊस ऑफ लॉर्ड्स' कडून 'पंजाबचा रक्षणकर्ता' लिहिलेली तलवार भेट दिली गेली. आजही अनेक भारतीय ह्या घटनेच्या आठवणीत अस्वस्थ होतात, ह्या घटनेला कधीही भरुन न निघणारी खोल जखम मानतात.

### जालियनवाला बाग नूतनीकरणाच्या वेळी करण्यात आलेले बदल

जालियनवाला बाग मैदानाला 13 एप्रिल, 1961 रोजी शहीद स्मारक बनवण्यात आले. जिथे गरजेपुरती डागडुजी करून 13 एप्रिल 1919 च्या दुपारी घडलेल्या जालियनवाला बाग हत्याकांडातील वेदना, आक्रोश जतन करण्याचा प्रयत्न केला गेला, परंतु नुकतेच नरेंद्र मोदी सरकारने या स्मारकाला आधुनिक चेहरा देत इतिहासाचे विकृतीकरण केले आहे. लॉकडाऊन मध्ये मोठ्या थाटामाटात 'देशाला समर्पित जालियनवाला बाग स्मारकाचे नवे रूप' म्हणून या स्मारकाचे 'व्हर्च्युअल उद्घाटन' मोदीने केले. जालियनवाला बाग हत्याकांडाच्या 100 वर्षानिमित्त 2019 मध्ये 20 कोटी रुपये खर्च करून एका खाजगी कंपनीला कंत्राट देऊन जालियनवाला बागेचे मूळ स्वरूप मोदी सरकार कडून पालटण्यात आले आहे. ह्या नवीन रुपात अनेक असे बदल करण्यात आले ज्यामधून जालियनवाला बागेच्या इतिहासाचे स्वरूपच बदलवून टाकले आहे. फक्त देशभरातूनच नाही तर अनेक विदेशातील इतिहासकारांकडून मोदी सरकारवर टीकेची झोड उठवली जात आहे. ज्या निमुळत्या व्हरांड्यातून जनरल डायर आणि त्याचे सैन्य आत आले होते त्याला सोनेरी रंगाचे आकर्षक छत आणि टाइल्स बसवल्या आहेत व दोन्ही बाजूंना हसत खेळत मैदानात प्रवेश करणाऱ्या लोकांच्या मूर्त्या बसवल्या आहेत. व्हरांड्याची रुंदी यात वाढवली गेली आहे. पूर्वी हा निमुळता व्हरांडा, ज्यातून डायर ने मैदानात प्रवेश घेतला होता, त्या दिवशी मैदानात उपस्थित हजारो भारतीयांच्या बलिदानाची जाणीव करून द्यायचा. आज त्याचे पालटलेले रूप उत्सव साजरे करण्याची भावना उत्पन्न करते. शिवाय जनरल डायरच्या सैन्याने चालवलेल्या गोळ्यांचे निशाण जतन केलेल्या भिंतींपैकी एक भिंत काढून टाकण्यात आली आहे तर एक भिंत दर्शनी भागापासून मागे लोटण्यात आली आहे. जनरल डायरच्या गोळ्यांपासून वाचण्यासाठी अनेकांनी मैदानातील एका खोल विहिरीत उड्या घेतल्या. ती विहिर त्या दिवशी माणसांनी खच्च भरली होती जिला पुढे 'शहीद विहीर' नाव देण्यात आलं. त्या विहिरीला मोठ्ठाल्या काच लावून बंदिस्त करण्यात आले असून तिला 'मॉडर्न' बनवण्यात आले आहे. पूर्वी विहिरीची खोली बघून घटनेची जाणीव तीव्र होत असे, आता विहिरीला एखाद्या उच्चभ्रू, श्रीमंत मंदिरातील भाविकांच्या दर्शनासाठी असलेल्या जागेचे स्वरूप आले आहे. बागेत ठिकठिकाणी फुलांचे ताटवे उभे केले गेले आहेत, गवताला आकार देऊन विविध प्रकारची सजावट केली आहे, मूळ शहीद स्मारकाभोवती कमळांचा तलाव बनवला गेला आहे. जालियनवाला बाग हत्याकांडाचे वर्णन करणारा 28 मिनिटांचा लाईट आणि साउंड शो देखील बनवण्यात आला आहे जो दररोज त्या ठिकाणी दाखवला जाईल जे ठिकाण शांततेत बसून शहीदांना स्मरण करण्यासाठी बनवले गेले होते! मैदानातील खोल्यांमध्ये 4 नवीन संग्रहालय देखील सुरू करण्यात आली आहेत ज्यात पंजाबच्या, भारतीय स्वातंत्र्य युद्धाच्या घटनांचे वर्णन करण्यात आले आहे. जागेला एक लोभस-ग्लॅमरस रूप देऊन, महागडे तिकीट ठेवून जालियनवाला बाग मैदानात कैद हजारो भारतीयांच्या आक्रोशस्थळाला एक पर्यटकांचे आकर्षण केंद्र, सेल्फी पॉइंट म्हणून विकसित करण्याचा मानस मोदी सरकारचा आहे. जर्मनी मध्ये ज्यू लोकांच्या प्रचंड मोठ्या नरसंहाराला कधीही विसरले जाऊ नये म्हणून बांधलेल्या स्मारकाला अश्याच प्रकारे सुशोभित केले गेले आणि आज त्या जागेला तरुण मुला मुलींना टाईमपास करण्यासाठी, सेल्फी, फोटोज काढण्यासाठी असलेल्या जागेचे स्वरूप आले आहे. ज्यू नरसंहाराची साक्ष देणाऱ्या त्या स्मारकाचा आवाज दाबून टाकण्यात आला आहे. याचप्रकारे भारतीय इतिहासातील अत्यंत प्रखर आणि संवेदनशील घटनेला विकृत करून, खऱ्या इतिहासावर भंपकपणा चा सोनेरी मुलामा चढवून फॅसिस्ट मोदी सरकारने स्वतःची असंवेदनशील बाजू पुन्हा एकदा दाखवून दिली आहे.



नवीन प्रवेशद्वार



जुने प्रवेशद्वार

इतिहासकार आणि जे.एन.यु चे माजी प्राध्यापक चमन लाल यांच्या मते ही घटना म्हणजे इतिहासाचे विकृतीकरण आहे. जालियानवाला बाग मैदानाला भेट दिल्यानंतर दुःख आणि वेदना यांची जाणीव व्हायला हवी. परंतु आता त्या जागेला एका सुंदर बागेचे रुप देण्यात आले आहे, जेणे करून लोकं तिथे येऊन मौज-मजा करू शकतील. जलियनवाला बाग एक सुंदर बगिचा नव्हता! इतिहासकार इरफान हबीब यांनी जालियनवाला बाग स्मारकाच्या ह्या नव्या रूपाला इतिहास आणि ऐतिहासिक वारश्याच्या किमतीवर करण्यात आलेले कंपनीकरण म्हटले आहे. डॅनिश-ब्रिटिश इतिहासकार किम वॅगनर, जे वसाहतकालीन भारतीय इतिहासाचे अभ्यासक आहेत, यांनी ह्या 'सौंदर्यीकरणा' बाबत मांडले की जालियनवाला बाग हत्याकांडाचे शेवटचे अवशेष प्रभावी पणे मिटवण्यात आले आहेत. येणारी पिढी हा इतिहास आहे तसा कधीच समजू शकणार नाही. इतिहासकार पुष्पेश पंत यांनी म्हटले की प्रत्येक भारतीयाने सरकारच्या या कृत्याला विरोध केला पाहिजे. जालियनवाला बाग ही जागा इतिहासाच्या आठवणीने प्रत्येकाला विचलित, अस्वस्थ करणारी जागा होती, आनंद देणारं प्रेक्षणीय स्थळ नव्हती. भिंतीवर फॅन्सी मूर्त्या लावून एका वेदनादायक घटनेची खिल्ली उडवली गेली आहे. एकंदरीत देशस्तरावर तसेच जागतिक स्तरावर देखील जालियनवाला बाग नूतनीकरणामुळे झालेले इतिहासाचे विकृतीकरण आणि मोदी सरकारची कॉर्पोरेटपरस्त मानसिकता ह्यावर प्रश्नचिन्ह उभे केले आहे. यात शोबाजी, भपकेदार, दिखाऊपणामागे मोदी सरकारचे मूळ उद्दिष्ट जनतेला खऱ्या इतिहासाच्या वास्तवापासून तोडून जनतेपुढे एक काल्पनिक इतिहास उभा करणं हेच आहे!

सौंदर्यीकरणाच्या नावाखाली विकासाची दवंडी पिटवून वास्तव लपवण्याचे मोदी सरकारचे कसब आपण ट्रम्पच्या गुजरात भेटीवेळी गरीब वस्त्यांसमोर बांधलेली भिंत, 20 कोटी रुपयांचा मोदीच्या राहण्यासाठी घर

पान 15 वर

• संपादक मंडळ – निखील एकडे, बबन ठोके • संपादकीय कार्यालय- रूम नंबर 209, हीरानंदानी बिल्डिंग, 7-बी, लल्लुभाई कंपाऊंड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई 400043
मो. नं. 8669735643 , 9619039793 • जागृति प्रिंटर्स, 12-ए, ग्राउंड फ्लॉर, भायखला सर्विसेज इंडस्ट्रीज, भायखळा, मुंबई - 9820017588 येथे मुद्रित